पुणे आवृत्ती

बातम्यांचा राजा

# जनप्रवास

मुंबई, पुणे, अ.नगर येथून एकाच वेळी प्रसिद्ध.

RNI NO. MAHMAR/2013/57952

गुरुवार, दि. २४ जुलै, २०२५ | वर्ष : १३ | अंक : १९८ | पाने ८ | किंमत २ रुपये | www.janpravaslive.in | E-mail : dainikjanpravas@gmail.com

आतील पानात...

३ 'एक पेड माँ के नाम' उपक्रम शिरोली बुद्रुक येथे साजरा

४ मदारींना हद्दपार करा : निघोज ग्रामस्थांचा ठराव

५ शिवछत्रपतींच्या पादुका शिवनेरीवर स्वस्थानी



पान ८ वर..

# आम्ही शत्रू नाही... देवेंद्र फडणवीस यांनी मानले उद्धव ठाकरे-शरद पवारांचे आभार

**जनप्रवास । प्रतिनिधी**

मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांचे आभार मानले आहेत. 'महाराष्ट्र नायक' या कॉफी टेबल बुकमध्ये फडणवीसांचं कौतुक करणारी प्रतिक्रिया या दोन्ही नेत्यांनी दिली होती. महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी राधाकृष्णन यांनी फडणवीसांच्या ५५ व्या वाढदिवशी 'महाराष्ट्र नायक' नावाचे एक कॉफी टेबल बुक प्रकाशित केले. त्यात उद्धव ठाकरे यांच्या प्रतिक्रियेने सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले.

काही दिवसांपूर्वी फडणवीसांनी उद्धव ठाकरेंना सोबत आल्यास विचार करू असं म्हटले होते. त्यात उद्धव ठाकरेंनी देवेंद्र फडणवीसांची प्रशंसा केल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले. फडणवीसांनीही आम्ही शत्रू नाही, वैचारिक विरोधक आहोत असं सांगत उद्धव ठाकरेंचे आभार मानले आहेत.

उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांनी केलेल्या कौतुकावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्रकारांनी प्रश्न विचारला. त्यावेळी ते म्हणाले की, मी त्यांच्या शुभेच्छांसाठी आभारी आहे. महाराष्ट्रात आपण सगळे वैचारिक विरोधक



आहोत. कुणीच कुणाचा शत्रू नाही. त्यामुळे उद्धव ठाकरे यांनी दिलेल्या शुभेच्छांबद्दल मी आभार व्यक्त करतो. तर शरद पवारांचा मोठेपणा आहे. ते ज्येष्ठ नेते आहेत त्यांनी माझ्याबद्दल विधान करणे हे माझ्यासाठी अतिशय मोलाचं आहे असं सांगत फडणवीसांनी शरद पवारांचेही आभार मानले आहेत.

फडणवीसांच्या कार्याची गती अफाट आहे हे कसे काय नाकारता येईल? त्यांच्या कामाचा झपाटा, उरक पाहिला की, मला मी पहिल्यांदा मुख्यमंत्री झालो तो कार्यकाळ आठवतो. फडणवीसांची ही गती ते माझ्या वयाचे होईपर्यंत राहो आणि कालचक्रमानाने ती वृद्धिंगत होत राहो. आम्हा दोघांतील साम्य लक्षात घेता आमच्या कार्यक्षमतेत स्थूलपणा कधी आडवा आला नाही. विनोदाचा भाग सोडला तर त्यांचे कष्ट पाहून ते थकत कसे नाहीत? असा प्रश्न मलाही पडतो. वागण्यात आणि बोलण्यात कमालीचे तारतम्य ही त्यांची जमेची बाजू आहे. विविध विषयांची उत्तम जाण, प्रशासनावरील मजबूत पकड, आधुनिकतेची कास धरणारा नेता असं कौतुक शरद पवार यांनी देवेंद्र फडणवीस यांचे केले आहे.

तर देवेंद्र फडणवीस एक हुशार आणि प्रामाणिक राजकारणी आहेत. त्यांची समजून घेण्याची जिद्द, प्रश्न सोडवण्याची तळमळ, राज्याला न्याय देण्याचा प्रयत्न जवळून पाहता आला. त्यांचा अभ्यासू स्वभाव, कायदेशीर, आर्थिक तसेच प्रशासकीय विषयांवरील सखोल ज्ञान त्यांना भाजपातील इतर सदस्यांपासून वेगळे ठरवते. फडणवीस यांनी नेहमीच सर्वसामान्य नागरिकांना केंद्रस्थानी ठेवून काम केले. फडणवीस यांना भविष्यात राष्ट्रीय पातळीवर महत्त्वाची जबाबदारी मिळण्याची शक्यता आहे. फडणवीस यांची भाजपामधील प्रतिमा ही एक गतिमान, अभ्यासू आणि पक्षनिष्ठ नेते अशी आहे असं कौतुक उद्धव ठाकरे यांनी देवेंद्र फडणवीस यांचे केले होते.

# चौफुला येथील कलाकेंद्रात गोळीबार

## चार जणांवर गुन्हा दाखल

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पाटस : दौंड तालुक्यातील न्यू अंबिका कलाकेंद्रात गोळीबार झाल्याची चर्चा सोमवारी रात्रीपासून सुरू आहे. मात्र, २४ तास उलटूनही पोलिसांकडून या प्रकरणाची स्पष्ट माहिती मिळालेली नाही. स्थानिकांनुसार, लावणी की डीजे गाणी वाजवायची यावरून दोन गटांत वाद झाला आणि त्यातून गोळीबार झाल्याची चर्चा आहे.

अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार यांनी सांगितले की, सोमवारी रात्री साडे दहाच्या सुमारास गोळीबार झाल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. या संदर्भात पुढील चौकशी सुरू



आहे. पत्रकारांनी या प्रकरणात राजकीय हस्तक्षेप आहे का, असा प्रश्न विचारला असता पोलिसांनी त्यास नकार दिला. या प्रकरणी बाळासाहेब मांडेकर यांच्यासह गणपत जगताप,चंद्रकांत मारणे सह एका व्यक्तीवर गुन्हा दाखल झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार अंबिका कलाकेंद्रात डान्स सुरु होता. हा डान्स सुरू असतानाच एका आमदाराच्या भावाने हवेत गोळीबार केल्याचे म्हटले जात आहे. विशेष म्हणजे या गोळीबारत नृत्य करणारी तरुणीही जखमी झाल्याचे सांगितले जात आहे. अंबिका कला केंद्रात ही घटना घडली आहे. या प्रकरणात पुण्यातील यवत पोलिसांकडून तपास सुरू आहे. या प्रकरणी तपास करण्यासाठी अतिरिक्त पोलीस अधीक्षक थेट कला केंद्रावर गेले असून चौकशी केली जात आहे.

दरम्यान, या प्रकरणी पुणे ग्रामीणच्या एसींनी प्रतिक्रिया दिली आहे. कलाकेंद्राच्या रूममध्ये फायरींग झाल्याची माहिती मिळाली होती.२१ किंवा २२ जुलै रोजी ही बातमी बाहेर आली होती. आम्हाला ठोस माहिती मिळाली नव्हती. २१ तारखेला रात्री १०.३० वाजता हवेत फायर झाल्याची घटना घडली. याबाबत आता अंबिका कलाकेंद्राच्या मालकाने तक्रार दिली आहे. या घटनेत कुणीही जखमी नाही. पुढील तपास पोलीस करत आहेत, अशी प्रतिक्रिया पोलीस अधिकाऱ्याने दिली आहे.

# संक्षिप्त

## पूजा खेडकरचे ओबीसी नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र रद्द

जनप्रवास । प्रतिनिधी

पुणे: गेल्या काही महिन्यांपूर्वी सर्वत्र चर्चेत आलेल्या पुजा खेडकरचे नॉन क्रिमीलेअर सर्टिफीकेट रद्द करण्याचा निर्णय नाशिक विभागाचे विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांनी दिला आहे. ओबीसी आरक्षणाचा लाभ मिळवण्यासाठी नॉन क्रिमीलेअर सर्टिफीकेट आवश्यक असते. पुजा खेडकरचे नॉन क्रिमीलेअर सर्टिफीकेट रद्द झाल्याने तिला ओबीसी आरक्षणाचा लाभ घेण्याचा अधिकार नव्हता हे स्पष्ट झालं आहे. केंद्र सरकारकडून नाशिकच्या विभागीय आयुक्तांना पुजा खेडकरच्या नॉन क्रिमीलेअर सर्टिफीकेटची चौकशी करण्याचे आदेश दिले होते.

पुजा खेडकरने ओबीसी असल्याचा दावा करत ओबीसी कोट्यातून आत्तार्यंत नऊ वेळा युपीएससीची परिक्षा दिली होती. त्यात अपयश आल्यानंतर पुजाने ओबीसी आणि दिव्यांग असल्याचा दावा करत नव्या नावाने परिक्षा देण्यास सुरुवात केली होती. मात्र तिच्या दिव्यांग प्रमाणपत्रांबाबत वाद निर्माण झाल्यानंतर तिला आयएएस सेवेतून बडतर्फ करण्यात आले होते. त्यानंतर पुजा खेडकरच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून सध्या सर्वोच्च न्यायालयात या प्रकरणाची सुनावणी सुरु आहे.

## राज्यात १४ लाखांवर अकरावीच्या जागा रिक्तच

जनप्रवास । प्रतिनिधी

पुणे: राज्यातील अकरावीच्या केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेतील दुसऱ्या फेरीत कॅप आणि कोटा मिळून एकूण २ लाख १५ हजार १५७ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. आता तिसऱ्या फेरीसाठी विद्यार्थ्यांना २२ आणि २३ जुलै रोजी प्रवेश अर्जाचा भाग दोन भरून महाविद्यालयांचे पसंतीक्रम नोंदवता येणार असून, दुसऱ्या फेरीअखेर राज्यात अकरावीच्या १४ लाख २० हजार ७६४ जागा रिक्तच असल्याचे स्पष्ट झाले आहे.

अकरावी प्रवेशासाठी राज्यात ९ हजार ५११ महाविद्यालयांमध्ये १७ लाख ६६ हजार ३७ जागा कॅप प्रवेशाच्या तसेच ३ लाख ७५ हजार ३९३ जागा कोटा प्रवेशाच्या अशा एकूण २१ लाख ४१ हजार ४३० जागा उपलब्ध आहेत. त्यासाठी १४ लाख १९ हजार ८६१ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. त्यापैकी ६ लाख ४४ हजार ६ विद्यार्थ्यांनी कॅपद्वारे तसेच १ लाख १६ हजार २६० विद्यार्थ्यांनी विविध कोटा अंतर्गत अशा एकूण ७ लाख २० हजार ६६६ विद्यार्थ्यांनी आतापर्यंत प्रवेश घेतला आहे. आता प्रवेशासाठी कॅप प्रवेशाच्या ११ लाख ६१ हजार ६३१ आणि कोटा प्रवेशाच्या २ लाख ५९ हजार १३३ अशा एकूण १४ लाख २० हजार ७६४ जागा उपलब्ध असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# हिंजवडी आयटी पार्क कोंडीमुक्त करण्यासाठी अतिरिक्त 'वॉर्डन'

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पिंपरी : हिंजवडी आयटी पार्कमधून पुणे-पिंपरी-चिंचवड व ग्रामीण भागासह मुंबई-बंगळुरू महामार्गावर इन-आउटच्या ठिकाणी होणारी वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी आवश्यकतेनुसार अतिरिक्त वॉर्डन नियुक्ती करण्याची मागणी वाहतूक पोलिस प्रशासनाने करावी. त्यासाठी पीएमआरडीए'ने मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे, असे आदेश विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी मंगळवारी दिले.

डॉ. पुलकुंडवार यांनी हिंजवडी आयटी पार्क आणि परिसर वाहतूक कोंडीमुक्त करण्यासाठी आढावा बैठक घेतली. यावेळी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पीएमआरडीए'चे महानगर आयुक्त योगेश म्हसे यांच्यासह महावितरण, एमआयडीसी, पीएमआडीए, जिल्हा प्रशासन, प्रदूषण नियंत्रण महामंडळ, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, पुणे प्रादेशिक परिवहन महामंडळाचे अधिकारी उपस्थित होते.

१. प्रशासकीय कामांना दिरंगाई होत असेल, तर अधिकाऱ्यांनी आपल्या स्तरावर क्शन प्लॅन' तयार करावा.२. वाहतूक वॉर्डन मागणी केल्यानुसार, पीएमआरडीए उपलब्ध करून देईल. पुणे आणि पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तांनी तशी मागणी करावी.३. महावितरणचे ट्रान्सफार्मर आणि ओव्हर हेड वायर वाहतुकीला अडथळा ठरत असतील, तर ते स्थलांतरित करणे.४. वाहतूक समस्या निर्माण होणाऱ्या ठिकाणी आवश्यकतेनुसार एकेरी वाहतूक व्यवस्था करणे.५. भूसंपादनाचे काम गतिमान करावे. शेतकऱ्यांना विश्वासात घेणे आणि रस्त्याची जागा ताब्यात घेणे.६. पीएमपीएमएल बसथांबे योग्य ठिकाणी निश्चित करणे.

# अजितदादा, एकवेळ तुम्ही कृषिमंत्री व्हा,पण त्यांचा राजीनामा घ्या

## आ. रोहित पवार यांचा मंत्री माणिकराव कोकाटेंवर निशाणा

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे - शेतकऱ्यांचे गंभीर प्रश्न असताना कृषिमंत्र्यांचा रमी खेळतानाचा व्हिडिओ प्रचंड व्हायरल झाला. हा व्हिडिओ रोहित पवार यांनी टीका केली. यानंतर विरोधकांनी माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्याची मागणी लावून धरली आहे.

याच मुद्द्यावर रोहित पवार बोलतांना म्हणाले, गेले काही महिने कृषी मंत्री सातत्याने शेतकऱ्यांच्या विरोधात बोलत आहेत, तुम्ही कुठेही खेळा आम्हाला काही घेणे नाही, कृषिमंत्री आहात तर शेतकऱ्यांचे प्रश्न मांडा त्यांचे प्रश्न सोडवा, दुसऱ्या दिवशी पत्रकार परिषद घेऊन अहंकाराने बोलत आहात



अहंकार बाजूला ठेवून बोला, सरकारला शेतकऱ्याला भिकारी म्हटला आहात, राजीनामा द्यावा लागेल, तुमचे नेते काय करतात ते पाहावे लागेल. असेही ते म्हणाले.

रोहित पवार पुढे म्हणाले,अजित दादाला मला सांगणं आहे की, कृषिमंत्री बदला एक वेळ तुम्ही कृषिमंत्री व्हा पण त्यांचा राजीनामा घ्या, अशी मागणी त्यांनी केली. अजितदादांवर ज्यावेळी आरोप केले होते त्यावेळेस ते खोटे आरोप होते त्यावेळी अजित पवार यांनी राजीनामा दिला होता ते कराडला जाऊन यशवंतराव चव्हाण यांच्या समाधी जवळ बसले होते. तर आता दादा एका पक्षाचे प्रमुख झाले आहेत तेव्हा तुमचे मंत्री अशा पद्धतीने वागत असतील तर,दादांचे स्वतःवर कंट्रोल आहे पण त्यांच्या मंत्र्यांवर कंट्रोल नाही असं म्हणायचं का? असा प्रश्नही रोहित पवार यांनी उपस्थित केला.

# टँकरची दुचाकीला जोरदार धडक, तरुण-तरुणीचा तडफडून अंत

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे: सासवड - नारायणपूर रस्त्यावर भिवडी गावाजवळील एका हॉटेलसमोर एक भीषण अपघात झाला असून यामध्ये दोघांना आपला जीव गमवावा लागला आहे. बुधवारी (२२ जुलै) सकाळी साडे अकरा वाजण्याच्या सुमारास हा भीषण अपघात झाल्याची माहिती आहे. यामध्ये एका तरुणाचा आणि तरुणीचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. हे दोघे दुचाकीवर असल्याची माहिती आहे. या घटनेने त्यांच्या कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. तर, परिसरातून हळहळ व्यक्त केली जात आहे.

या अपघातात मृत्यूमुखी पडलेल्या युवतीचे नाव अपुर्वा रविंद्र कुंभारकर (वय २३, रा. कुंभारवळण) आणि युवकाचे नाव नंदु रत्नाकर होले (वय २२, रा. खानवडी) अशी आहेत. या अपघातात दोघांचाही घटनास्थळीच दुर्दैवी मृत्यू झाल्याची माहिती आहे. याप्रकरणी पोलिसांनी दिलेल्या अधिक माहितीनुसार, मयत अपूर्वा कुंभारकर आणि नंदू होले हे दोघेही सासवडहून नारायणपूरकडे निघाले होते. यावेळी वाटेत विरुद्ध दिशेने येणाऱ्या टँकर ( क्र. एम. एच. १२ आर. एन. ६८४३ ) ने दुचाकीला समोरून जोरदार धडक दिली. ही धडक इतकी जबर होती की नंदु आणि अपुर्वा हे दोघेही गंभीर जखमी झाले आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला.

# ५७ हजार किलो गोमास लोणावळ्यात जप्त

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : गोमातेच्या हत्येवर बंदी असणारे कायदे धाब्यावर बसवून जेएनपीटी बंदरातून तब्बल ५७ हजार किलो गोमांस परदेशात पाठवले जात असल्याची धक्कादायक घटना उजेडात आली आहे.



तेलंगणातील कत्तलखान्यात गाईना कापून अवयवांची तस्करी करणाऱ्या दोन कंटेनर्सची माहिती गोसेवा आयोगाच्या कार्यकर्त्यांना मिळाली. मनिष वर्मा हे गोसेवा आयोगाचे सदस्य आहेत. गोवंशाची सेवा करणे हे त्यांचे ब्रीद आहे. देशभरातून या संदर्भात येणाऱ्या तक्रारींवर ते लक्ष ठेवून असतात. आंध्रप्रदेशात होणाऱ्या गोहत्या कमी झाल्या असल्या, तरी तेलंगणात मात्र मोठ्या प्रमाणात कत्तलखाने आहेत. तेथून तस्करी करणारी वाहने हैद्राबादहून नवी मुंबईतील जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्टकडे नवी मुंबईला पोहोचतात अशी चर्चा असे.

यावेळी दोन कंटेनरमधून अवैध मांस जेऐनपीटीकडे निघाली होती. ही माहिती मिळताच कायद्यातील तरतुदीचा वापर करुन ही दोन्ही वाहने लोणावळ्याला थांबवली गेली. पोलिस स्थानकाकडे ही वाहने वळवण्यात आली.

गोसेवा कायद्यातील तरतुदींनुसार वाहनातील माल तपासण्याची मागणी करण्यात आली. वाहकांनी म्हशीचे मांस पाठवले जाते आहे , असे सांगत दोन आईसबॉक्स तपासणीसाठी देण्याची तयारी दाखवली. मात्र गोसेवा कायद्यातील तरतुदींच्या आधारे रँडम सैंपलिंगसाठी कंटेनरमधील सामान ताब्यात घेतले गेले.

पुणे येथील गृहखात्याच्या फॉरेन्सिक प्रयोगशाळेत मांसाची तपासणी करण्यात आली. तेव्हा हे मांस म्हशीचे नसून गाईचे असल्याचे आढळून आले. ही धक्कादायक माहिती मिळालेल्या गो सेवा आयोगाच्या सदस्यांनी मुख्यमंत्री कार्यालयातील प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकर परदेशी आणि विशेष कार्यकारी अधिकारी चंद्रशेखर वझे यांच्यामार्फत देवेंद्र फडणवीस यांच्यापर्यंत पोहोचवली, त्यानंतर लगेच गोमांसबंदी कायद्याअंतर्गत कारवाई करुन मासांची तस्करी थोपवण्यात आली.

# धनकवडी परिसरात २० ते २५ वाहनांची दोघांकडून तोडफोड




**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : पुणे शहरातील धनकवडी परिसरात २० ते २५ वाहनांची दोन गुंडांकडून तोडफोड केल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे धनकवडी परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

पोलीस उपायुक्त मिलिंद मोहिते यांनी दिलेल्या माहितीनुसार, धनकवडी परिसरातील केशव कॉम्प्लेक्स,सरस्वती चौक, नवनाथनगर या भागात रात्री ११ ते १ वाजण्याच्या सुमारास दोन गुंडाकडून रिक्षा,कार,स्कूल बस,पियागो टेम्पो असे एकूण २० ते २५ या वाहनांच्या काचा फोडून नुकसान केल्याची घटना घडली आहे. या घटनेतील आरोपींची नाव समोर येत आहे. आम्ही लवकरच आरोपीपर्यंत पोहोचू,असे त्यांनी सांगितले.

# समाविष्ट १६ गावांतील सांडपाणी व्यवस्थेच्या कामासाठी सरकारची ५३३ कोटी ८५ लाख रुपयांच्या निधीला मंजुरी

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : महापालिकेमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या २३ गावांपैकी १६ गावांतील सांडपाणी व्यवस्था आणि सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पासाठी (एसटीपी) केंद्र सरकारच्या अमृत दोन योजनेअंतर्गत राज्य शासनाने ५३३ कोटी ८५ लाख रुपयांच्या निधीला मान्यता दिली आहे. उर्वरीत सात गावांसाठीचा ८५६ कोटी ९१ लाख रुपयांचा प्रकल्प अहवाल तयार असून तांत्रिक मान्यतेच्या प्रतिक्षेत आहे. यामुळे लवकरच पूर्वी समाविष्ट करण्यात आलेल्या ११ गावांसोबतच २३ गावांतील सांडपाणी वाहीन्या आणि सांडपाण्यावरील प्रक्रिया प्रकल्पांच्या कामांना गती मिळेल, असा विश्वास महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी व्यक्त केला आहे.

महापालिकेमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या २३ गावांतील सांडपाणी वाहीन्या आणि एसटीपी प्रकल्पांसाठी प्रशासनाने दोन स्वंतत्र आराखडे तयार केले आहेत. या २३ गावांमधील जुन्या वाहीन्या बदलणे आणि नव्याने वाहीन्या टाकाव्या लागणार आहेत. सुमारे ४७१ किलोमीटरच्या जोडवाहीन्या आणि ९०. ५ कि.मी.च्या मुख्यवाहीन्या टाकण्यात येणार आहेत. तसेच सात गावांमध्ये ८ एसटीपी उभारण्यात येणार आहेत. या आठ एसटीपी प्लांटमध्ये २०१ एमएलडी सांडपाण्यावर प्रक्रिया होणार असून या सर्व प्रकल्पासाठी १ हजार ४३७ कोटी ९४ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे.




या प्रकल्पासाठी केंद्र सरकारच्या अमृत दोन योजनेअंतर्गत निधी मागितला होता. मागील वर्षी ऑगस्टमध्ये महाराष्ट्र जीवन प्राधीकरणाकडे तांत्रिक मान्यतेसाठी प्रकल्प अहवाल सादर केला होता. यापैकी त्यापैकी १६ गावांतील सांडपाणी वाहीन्या आणि एसटीपी प्रकल्पासाठी ३४३ कोटी १३ लाख आणि एसटीपीसाठी १९० कोटी ७२ लाख रुपये अशी ५३३ कोटी ८५ लाख रुपयांच्या निधीला महाराष्ट्र जीवन प्राधीकरणने सोमवारी मंजुरी दिली. तर आज झालेल्या नगरविकास विभागाच्या तांत्रिक समितीच्या बैठकीमध्ये त्यावर अंतिम मोहोर उमटविण्यात आली. लवकरच यासंदर्भातील शासन आदेशही निघतील, अशी माहिती महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी दिली.

या गावांमधील कामाला मिळाली मंजुरी : सूस, म्हाळुंगे, नर्हे, पिसोळी, सणसनगर, कोंढवे धावडे, किरकिटवाडी, नांदोशी, खडकवासला, न्यू कोपरे, नांदेड, भिलारेवाडी, गुजर निंबाळकरवाडी, जांभूळवाडी, कोळेवाडी, मांगडेवाडी आदी.

या गावांतील प्रकल्प प्रशासकीय मान्यतेसाठी : बावधन, औताडेवाडी-हांडेवाडी, होळकरवाडी, वडाचीवाडी, वाघोली, शेवाळेवाडी, मांजरी बु. या सात गावांतील सांडपाणी वाहीन्या आणि एसटीपी प्रकल्पासाठी ८५६ कोटी ९१ लाख रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला आहे. त्याचा प्रस्तावही प्रशासकीय मान्यतेसाठी ठेवण्यात आला आहे. लवकरच या प्रस्तावा मान्यता मिळेल. या प्रकल्पाअंतर्गत ९५० कि.मी.च्या सांडपाणी वाहीन्या आणि ४ एसटीपी प्लांट उभारण्यात येणार आहेत. म्हाळुंगे, पिसोळी, नांदेड व गुजर निंबाळकरवाडी हे प्रकल्प उभारण्याचे नियोजन आहे.

# अग्रलेख : अंमली पदार्थांचा जीवघेणा विळखा

विधानसभा अधिवेशन नुकतेच संपले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची भेट, एकमेकांवर शाब्दिक टीका, विधानसभा परिसरातील हाणामारी, हनी ट्रॅप, लेडीज बार, बनावट औषध विक्री रॅकेट, मिठी नदी गाळ उपसा, असे अनेक विषय गाजले. यासोबतच राज्यात अमली पदार्थ, गुटखा विक्री गल्ली ते दिल्लीपर्यंत, अगदी ग्रामीण भागापर्यंत पोहोचल्याबाबत सत्ताधारी आणि विरोधी पक्षांच्या आमदारांनी सरकारला धारेवर धरले. यासाठी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मकोका) अंतर्गत कारवाई करण्याचे आश्वासन सरकारने दिले आहे. मात्र अमली पदार्थ, गुटखा यावरील बंदीची जबाबदारी असलेले प्रशासनातील अधिकारीच कोणतीही भीडभाड न ठेवता विक्री रॅकेटमध्ये सहभागी झाले असल्याने इथे कुंपणच शेत खात असल्याचे उघड झाले आहे. त्यामुळे सरकारची 'बंदी' कागदावरच राहणार असल्याचे दिसत आहे. अमली पदार्थांच्या सेवनाने माणसाला नशा, धुंदी येते. अफू व तीपासून तयार केलेले मॉर्फीन, हेरॉईन, कोकेन, भांग, गांजा, चरस (हशिश) यांचा अंमली पदार्थांमध्ये समावेश होतो. या पदार्थांचे दीर्घकाळ सेवन केल्यास प्रथम त्यांची सवय जडते व नंतर व्यसन लागते. त्यामुळे जागतिक पातळीवर यावर नियंत्रण आणण्यासाठी १९१२ ते १९३६ या काळात संयुक्त राष्ट्रांच्या विद्यमाने आंतरराष्ट्रीय करार झाले आहेत. यामध्ये १०० हून अधिक देश सहभागी झाले आहेत. मात्र काही देशांनी अधिकृतपणे अंमली पदार्थांना बंदी घातली आहे. यानंतरही काही देश याचा चोरीच्या मार्गाने व्यापार करत आहेत. काही देशांनी यावरील बंदी उठवली आहे. त्यामुळे या पदार्थांवर नियंत्रण मिळविण्यात यश आलेले नाही.


देशाच्या काही बंदरांवर करोडो रुपये किमतीचे अंमली पदार्थ जप्त करण्यात आल्याच्या बातम्या येतात. तसेच राज्याच्या काही भागात अंमली पदार्थ तयार करण्याचे कारखाने पोलिसांनी उद्धवस्त केले आहेत. यामागील आंतरराष्ट्रीय कनेक्शनही पोलिसांनी समोर आणले आहे. श्रीमंतांपासून गरीब मुलांमध्ये निर्माण झालेली लाट मुलांचे आयुष्य उध्वस्त करत आहे. श्रीमंत मुले हेरॉईन, कोकेन याकडे वळतात, तर गरीब मुले व्हाईटनर, खोकला सिरप, गांजा अशा व्यसनांकडे वळत आहेत. यासोबतच शहरी भागातील झोपडपट्टी भागात गुटखा, सुगंधी सुपारी याच्या आहारी तरुण-तरुणी गेल्या आहेत. यामुळेही तरुणाई व्यसनांच्या विळख्यात सापडली आहे.

राज्यात ड्रग्जचा वापर वाढला असून शाळा, महाविद्यालये तसेच धार्मिक स्थळांजवळ त्यांची खरेदी-विक्री होत असल्याच्या तक्रारी आहेत. ड्रग्ज विक्रीसाठी शाळकरी मुले, महाविद्यालयीन विद्यार्थी, महिलांचा वापर होत होता. याबाबतची प्रकरणे उघडकीस आल्यानंतर ड्रग्ज माफियांनी आपली रणनीती बदलली. एकेकाळी केवळ उच्चभ्रू यात होते, पण आता मध्यमवर्गीय, ग्रामीण भागातील लोकही याच्या आहारी गेले असल्याचे समोर येऊ लागले आहे. गेल्या काही वर्षांत ड्रग्जने शहरी भागासोबतच ग्रामीण भागाला वेढा घातला आहे. राज्यातील लहान-मोठ्या शहरांमध्ये ड्रग्जची पाळेमुळे रुजली असल्याने समाजापुढे मोठे आव्हान निर्माण झाले आहे. शिक्षणासाठी घराबाहेर पडणारी मुले नवनवीन व्यसनांच्या आहारी जाऊ लागली आहेत. पालकांच्या नजरेआड तरुण व्यसनाधीन होऊ लागला आहे. आमच्या आई-वडिलांनी चांगले संस्कार केले म्हणणाऱ्या पिढीची मुले आज कोणत्या मार्गाने चालली आहेत याची हमी आज ठामपणे कोणी देऊ शकत नाही, अशी भीषण अवस्था तरुण पिढीची झाली आहे. उच्चवर्गीयांसोबतच मध्यम-गरीब घरातील ही परिस्थिती 'घरोघरी मातीच्या चुली' अशी झाली आहे. भारताची जगात तरुणांचा देश म्हणून ओळख आहे. देशातील सुमारे ६५ टक्के लोकसंख्या ३५ वर्षांखालील आहे. देशाचे सामर्थ्य असलेला हाच वर्ग अमली पदार्थांच्या आहारी जाऊ लागल्याने देशासमोर नवे आव्हान उभे राहिले आहे. देश महासत्ता होण्याच्या दिशेने मार्गक्रमण करत असताना तरुणाई यामध्ये आहे कुठे, याचा शोध घेण्याची वेळ आली आहे.

थायलंड आणि अमेरिकेतून हायड्रो गांजा देशात कुरियरच्या माध्यमातून येत आहे. यामध्ये पोस्ट, कस्टम आणि दोन पोलिसांचा सहभाग आढळून आला आहे. अंमली पदार्थ देशात आणि राज्याच्या विविध भागात पोहोचविण्याच्या विविध पद्धती तस्करांकडून वापरण्यात येत आहेत आणि याला प्रशासकीय यंत्रणांमधील अधिकाऱ्यांचा सहभाग असल्याने अमली पदार्थांची विक्री रोखण्यात प्रशासन यशस्वी ठरणे महाकठीण आहे. ज्या यंत्रणेवर कायद्याच्या अंमलबजावणीची जबाबदारी आहे, तेच तस्करीला खतपाणी घालत असतील तर अशा अधिकाऱ्यांवर प्रशासनाने कठोर कारवाई करणे गरजेचे आहे. अन्यथा ही कीड राज्य खिळखिळे करण्यास कारणीभूत ठरेल.

अधिवेशनात अंमली पदार्थांच्या विषयावर जशी चर्चा झाली तशीच राज्यात गुटखा व पानमसालाजन्य पदार्थांची वाहतूक व विक्री राजरोसपणे सुरू असल्याबाबत झाली. काही गुंड पोलीस संरक्षणात गुटखा विक्री राजरोसपणे करत असल्याचा आरोप झाला. यामध्ये एफडीए, पोलीस आणि आयपीएस अधिकाऱ्यांचा सहभाग असेल तर कितीही कायदे केले तरी ते निरर्थक ठरणार आहेत. यासाठी स्वच्छ प्रतिमेचे मंत्री आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांची नितांत गरज आहे. घेतलेल्या शपथेप्रमाणे सत्ताधारी आणि प्रशासनाने इमानेइतबारे काम केल्यास यामध्ये निश्चितच सुधारणा होऊ शकते.

# 'त्या' लाडक्या बहिणींचा हफ्ता लवकरच बंद होणार?




## राजकारण



लोकसभा निवडणुकीतील महायुतीच्या निराशाजनक कामगिरीनंतर, राज्य सरकारने 'लाडकी बहीण' योजना सुरू केली, ज्यामुळे विधानसभा निवडणुकीत त्यांना दणदणीत यश मिळाले. महायुतीच्या २३० जागा निवडून आल्या. पण लाडक्या बहिणींना दरमहा १५०० रुपये देताना आता सरकारी तिजोरीचा ताळमेळ बिघडला आहे. परिणामी आता निकषांच्या कात्रीचा बडगा आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेसाठी अडचणीचा ठरू शकतो. त्यामुळे ती कात्री सध्या थांबली असली तरी निवडणुकीनंतर प्राप्तीकरात येणाऱ्या महिलांची यादी तयारच आहे. ते हप्ते निवडणुकीनंतर बंद होण्याची शक्यता आहे. लोकसभा निवडणुकीत सत्ताधारी महायुतीची धूळधाण उडाली. पण विधानसभा निवडणुकीत महायुतीनं दणदणीत यश मिळवलं आणि सत्ता राखली. महायुतीच्या यशात मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा मोलाचा वाटा होता. लोकसभेच्या निकालानंतर सरकारनं लाडकी बहीण योजना आणली. त्याचा लाभ सरकारला विधानसभेला झाला. पण विधानसभा निवडणुकीनंतर सरकारनं योजनेसाठी घालून दिलेल्या अटी, शर्तींनुसार लाभार्थ्यांची संख्या कमी करण्यास सुरुवात केली. त्यामुळे हजारो महिलांना मिळत असलेला लाभ बंद झाला. आता याच लाडकी बहीण योजनेसंदर्भात महत्त्वाची अपडेट आहे.

माझी लाडकी बहीण योजनेतील लाभार्थी महिलांची छाननी करुन ही संख्या कमी करण्याचा निर्णय सरकारनं घेतला होता. पण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही संपूर्ण प्रक्रिया थांबवल्याची माहिती आहे. येत्या चार ते पाच महिन्यांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लागू शकतात. त्यासाठी खबरदारी म्हणून सरकारनं छाननी प्रक्रिया थांबवल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

लाडकी बहीण योजनेच्या अंतर्गत २१ ते ६५ वर्ष वयोगटातील अर्ज मंजूर झालेल्या महिलांना महिन्याकाठी १५०० रुपये आर्थिक लाभ दिला जातो. लाभार्थ्यांची संख्या २ कोटी ३४ लाख इतकी आहे. या योजनेमुळे सरकारच्या तिजोरीवर वर्षाला ५० हजार कोटी रुपयांचा ताण पडतो. त्यामुळे अन्य विभागांच्या योजनांना, प्रकल्पांना कात्री लावावी लागते. सामाजिक न्याय विभागापासून ते बांधकाम विभागापर्यंत सर्वच निधीला कात्री लावण्याची वेळ आली आहे. यातून सरकारमध्ये मतभेद सुरू आहेत. याचे खापर उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्यावर फोडण्यात येते. वास्तविक थोडे हप्ते थकले की विरोधकांसह लाडक्या बहिणींतून नाराजी व्यक्त होते. त्यामुळे हा ताळमेळ घालण्यासाठी अजित पवारांना निधीला कात्री लावण्याशिवाय पर्याय नाही.

लाडकी बहीण योजनेवरील खर्च कमी करण्यासाठी लाभार्थ्यांची संख्या कमी करण्यासाठी सरकारनं अर्जांची छाननी सुरु केली. अपात्र महिलांना योजनेतून वगळण्याची घोषणादेखील सरकारकडून करण्यात आली. अपात्र महिलांना योजनेतून वगळण्यासाठी प्राप्तिकर भरणाऱ्या महिलांच्या कुटुंबाचा तपशील केंद्रीय अर्थ खात्याकडून राज्य सरकारनं मागवला.

राज्य सरकारला लाभार्थी महिलांच्या कुटुंबांचा आर्थिक तपशील उपलब्ध झाल्यानं अडीच लाखांपेक्षा अधिक उत्पन्न असलेल्या महिलांना बाद ठरवण्यात येईल, अशी शक्यता निर्माण झाली. पण पुढील काही महिन्यांत होऊ घातलेल्या महापालिका, नगरपालिका, नगर परिषदा, जिल्हा परिषदा, पंचायत समित्यांच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून छाननी प्रक्रिया रोखण्यात आलेली आहे. निवडणुका संपेपर्यंत नोंदणी केलेल्या सर्व महिलांना लाभ दिला जाणार आहे. निवडणुका संपल्यावर सरकार छाननीबद्दल पावलं उचलण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे त्या बहिणींच्या हप्त्यावर टांगती तलवार आहे.

### हप्ता २१०० करण्याचे काय झाले?

लोकसभेच्या फटक्याने सरकारने लाडक्या बहिणीची योजना आणलीच. त्यातून अडीच कोटींहून अधिक बहिणींना या योजनेचे लाभार्थी बनविण्यात आले. सुरुवातीला १५०० रुपये हप्ते दिले. त्याचा परिणाम दिसू लागताच निवडणूक झाल्यावर महायुतीची सत्ता आल्यास हा हप्ता वाढवून २१०० रुपये करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. आता १५०० रुपये देताना नाकीनऊ आले आहे. मात्र लाडक्या बहिणींना २१०० रुपये देण्याच्या आश्वासनाचे काय झाले, याची विचारणा होत आहे.

## अंतरंग



### उपराष्ट्रपतींचे अचानक आलेले आजारपण

देशाचे उपराष्ट्रपती आणि राज्यसभेचे अध्यक्ष जगदीप धनखड यांनी प्रकृती अस्वास्थ्यामुळे आपल्या पदाचा राजीनामा दिला आणि राष्ट्रपतींनीही तो स्वीकारला. प्रकृती अस्वास्थ्य हे कारण जरी धनखड यांनी समोर केले असले तरी त्यात फारसे तथ्य नाही. सोमवारी संसदेचे पावसाळी अधिवेशन सुरू झाले तेव्हा जगदीप धनखड अगदी व्यवस्थित होते. सकाळी नेहमीप्रमाणे त्यांनी सभागृहाचे कामकाज चालविले; परंतु दुपारी अचानक काही घडामोडी घडल्या आणि धनखड यांनी तडक आपला राजीनामाच राष्ट्रपतींकडे पाठविला.

त्यांच्या राजीनाम्यानंतर संसद परिसरात आणि माध्यमांमध्येही धनखड यांना भाजप श्रेष्ठींची नाराजी भोवल्याची चर्चा सुरू होती. उपराष्ट्रपती म्हणून आपला कार्यकाळ पूर्ण होण्यापूर्वीच राजीनामा देणारे धनखड हे तिसरे राष्ट्रपती असले तरी आधीच्या दोघांनी राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी उपराष्ट्रपतिपदाचा राजीनामा दिला होता. प्रकृती अस्वास्थ्य किंवा अन्य कारणासाठी राजीनामा देणारे धनखड हे पहिलेच उपराष्ट्रपती आहेत. मागच्या काही दिवसांपासून जगदीप धनखड आणि भाजपच्या शीर्ष नेत्यांमध्ये मतभेद निर्माण झाल्याचे बोलले जात होते. विशेषतः सभागृह चालविण्याच्या धनखड यांच्या शैलीबद्दल भाजप नेत्यांची नाराजी होती. विरोधकांना अधिक स्वातंत्र्य आणि संधी ते देतात, असा एक आक्षेप होता. सोमवारी सुरु झालेल्या अधिवेशनात राज्यसभेत विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांनी 'ऑपरेशन सिंदूर 'वर चर्चा करण्यासाठी नियम २६७ अंतर्गत नोटीस दिली होती. याच मुद्यावरून सभागृह नेते आणि सध्या भाजपचे अध्यक्ष असलेल्या जे. पी. नड्डा आणि खर्गे यांच्यात खडाजंगी झाली. त्यावेळी नड्डांनी आम्ही सांगू त्याचीच कामकाजाच्या इतिवृत्तात नोंद होईल. असे ठासून सांगितले, त्यातूनच काही वेगळे संकेत मिळाले होते. हा प्रसंग घडण्यापूर्वीच भाजप नेतृत्वाकडून धनखड यांना पद सोडण्याचा सल्ला देण्यात आला होता, अशी चर्चा आहे; परंतु धनखड पद सोडण्याच्या मनःस्थितीत नव्हते.

त्यामुळे सत्ताधारी पक्षच त्यांच्या विरोधात अविश्वास ठराव आणण्याची तयारी करीत होता. त्यासाठी केवळ भाजपच नव्हे तर रालोआत सामील असलेल्या इतर घटक पक्षांच्या खासदारांच्याही स्वाक्षऱ्या घेतल्या जात होत्या. तसे काही झालेच तर आपली अप्रतिष्ठा होईल, हे लक्षात आल्यावर धनखड यांनी पद सोडण्याचा निर्णय घेतला. तत्पूर्वी त्यांनी कामकाज सल्लागार समितीची बैठक बोलावली होती, या बैठकीत 'ऑपरेशन सिंदूर 'वरील चर्चेचा कालावधी निश्चित केला जाणार होता; परंतु या बैठकीला जे. पी. नड्डा आणि संसदीय कामकाज मंत्री रिजिजू उपस्थित झाले नाहीत. त्यामुळे बैठक दूपारपर्यंत पुढे ढकलण्यात आली; परंतु दुपारीदेखील हे दोन्ही नेते बैठकीला आले नाहीत. एकंदरीत धनखड यांच्यावर पद सोडण्यासाठी दबाव निर्माण करण्यात आला होता, त्यातूनच त्यांचे राजीनामा नाट्य घडले. जगदीप धनखड भाजप नेत्यांसाठी डोईजड झाले होते, असा आरोपविरोधक करीत आहेत.

नुकतेच राज्यसभेचे कामकाज सुरु झाल्यानंतर पहिल्याच दिवशी उपराष्ट्रपती धनखड यांनी न्या. यशवंत वर्मा यांच्या विरोधात महाभियोग चालवण्यासंदर्भात विरोधी पक्षांचा प्रस्ताव स्वीकारला. हा प्रस्ताव केंद्र सरकारमधील वरिष्ठांच्या अनुमतीविना स्वीकारला गेल्याचे बोलले जात आहे. न्या. वर्मा यांच्याविरोधातील कारवाई सत्ताधारी भाजप आघाडीच्या पुढाकाराने झाली पाहिजे, अशी भूमिका केंद्र सरकारमधील नेतृत्वाने घेतली होती. विरोधकांचा प्रस्ताव मान्य करून धनखड यांनी घोडचूक केल्याचे केंद्र सरकारमधील नेतृत्वाचे मत झाले. आधीपासूनच धनखड यांच्याविषयी असलेल्या नाराजीत ही चूक उंटाच्या पाठीवरील शेवटची काडी ठरली. धनखड यांनी विरोधकांचा प्रस्ताव स्वीकारल्यानंतर संसदभवनामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांची बैठक झाली. या बैठकीनंतर राजनाथसिंह यांच्या कक्षामध्येदेखील बैठकांचे सत्र सुरू होते. या बैठकांमध्येच धनखड यांच्या राजीनाम्याची पटकथा निश्चित करण्यात आल्याची चर्चा आहे. अखेर त्या पटकथेनुसार धनखड यांनी प्रकृती अस्वास्थाचे कारण समोर करीत भाजप नेतृत्वापुढे शरणागती पत्करल्याच्या चर्चेचा सूर पुढे येत आहे.

अर्थात याबरोबरच बिहारमध्ये पुन्हा नितीशकुमार यांनाच मुख्यमंत्री करणे हे तसे वयोमानाबरोबरच भाजप वाढीसाठीही अडचणीचे आहे. एवढेच नव्हे तर त्यांच्या बदलत्या भूमिकाही मारक आहेत. अशा परिस्थितीत नितीशकुमारांना उपराष्ट्रपतीपदावर वर्णी लावून खुश करीत मुख्यमंत्रीपदाचा मार्ग भाजपसाठी आणि एकूणच वाढीसाठीही मोकळा होऊ शकतो. त्यासाठीही धनगड याच्या ऐनवेळच्या आजारपणाची आणि राजिनाम्याची टुम निघाल्यानेही तर्क-वितर्क लढविले जात आहेत. अर्थात याला नितीशकुमार सहजासहजी तयार होतील असेही शक्य नाही. त्यामुळे आजारपणाचे आणि राजीनाम्याचे गूढ गुलदस्त्यातच आहे.

**– सुहास बस्तवडेकर**

## पंचांग

विक्रम संवत्- २०८१ आषाढ शके संवत्- १९४७
संवत्सर - विश्वावसूनाम अयन- दक्षिणायान मास- आषाढ
ऋतु- सौर वर्षा कृष्ण पक्ष तिथि : अमावस्या २४:४०:५८+
नक्षत्र : पुनर्वसु १६:४३:३३ योग : हर्षण ०९:५०:१७
करण : चतुष्पाद १३:३१:४० करण : नाग २४:४०:५८+
सूर्य : कर्क चन्द्र : कर्क१०:५८:५५ हिजरी सन् - १४४६ मुस्लिम मास - मोहरम
तारीख - २८ विशेष गुरुपुष्यामृतयोगी सायं ४.४३ पासून दुसऱ्या दिवास (शुक्रवारी) सकाळी ६.१५ पर्यंत विश्वनाथबाबा फडके पुण्यतिथी - अकोट (अकोला) दर्श अमवास्या दीपपूजन
अमावास्या समाप्ती उ. रात्रौ ००.४०

## राशी भविष्य...

**मेष** – आर्थिक अडचण सहजासहजी दूर होईल. प्रतिष्ठीत लोकांच्या संबंधामुळे फायदा होईल. धार्मिक प्रवास घडण्याची शक्यता. व्यापार चांगला चालेल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

**वृषभ** – कामामध्ये भागीदार सहकार्य करतील. मुलांच्या चिंता दूर होईल. महत्वपूर्ण विषयांवर चर्चा कराल. आर्थिक स्थिती चांगली राहिल्याने बचतीमध्ये वाढ कराल. खाजगी समस्या दूर होतील.

**मिथून** – आगोदर केलेल्या कामाचे चांगले परिणाम दिसून येतील. कोणतेही काम विचार पूर्वक करा. व्यापारात आपल्या निर्णयामुळे फायदाच होईल. मुलांच्या प्रगतीमुळे सुखकारक दिवस जाईल.

**कर्क** – आर्थिक आवक वाढणार आहे. साहित्यीक क्षेत्रात रुची वाढेल. प्रवास सुखकारक होईल. घरातील वयस्कर माणसांच्या तब्बेतीची काळजी घ्या. मुलांची प्रगती राहील.

**सिंह** – केलेल्या कामात फायदा मिळेल. व्यवसायामध्ये वाढ होईल. चोरांपासून सावध रहा. कुटुंबातील सदस्यांची प्रगती होईल. रोजगारात परिवर्तन किंवा नवीन संधी चालून येईल.

**कन्या** – नोकरी व कामामध्ये कौतुक होईल. अडकलेले कामे पूर्णत्वास जाण्याचे योग्य आहे. प्रतिष्ठीत लोकांची भेट होऊ शकेल. नव्या योजनांची आखणी कराल. दुसऱ्यांच्या कामात नाक खूपसू नका.

**तूळ** – पूर्वी केलेल्या कामाचे फळ मिळेल. व्यापार चांगला चालेल. आर्थिक लाभ होण्याचे योग आहेत. कुटुंबाकडून सहकार्य मिळेल. जोखमीचे कामे करू नका.

**वृश्चिक** – नवीन योजना आमलात आणण्याचे प्रयत्न कराल. प्रेमात यश मिळेल. आळस सोडून द्या. आर्थिक आवक वाढेल. कौटुंबिक सहकार्य मिळाल्याने आजचा दिवस आनंदी जाईल.

**धनू** – उत्साह राहणार नाही. योग्य वेळी निर्णय न घेतल्यामुळे नुकसान होण्याची शक्यता. कार्यात, व्यवसायात अडचणी येण्याची संभावना. स्थावर मालमत्तेचे प्रकरण मिटेल.

**मकर** – आर्थिक देण्याघेण्यामध्ये सावधानीने वागा. कोणावरही जरूरीपेक्षा जास्त विश्वास ठेवू नका. स्वत:चे निर्णय स्वत:च घ्या. कौटुंबिक सुख शांती मिळेल.

**कुंभ** – दिवस चांगला जाईल. ध्येय समोर ठेवून काम करा. मोठ्या लोकांशी सलगी वाढेल. शुभचिंतकाची भेट झाल्यामुळे आनंदी रहाल. कौटुंबिक व सामाजिक स्तरावर मान सन्मान व प्रतिष्ठा मिळेल.

**मीन** – व्यापारामध्ये फायदा झाल्यामुळे मन प्रसन्न राहील. आपल्या बुध्दीचातुर्याने समस्या दूर कराल. जोखमीचे कामे करू नका. जामीन कोणाला राहू नका.

## पारावरचा फड



राज्यभर महापालिका, जिल्हा परिषद, नगरपालिका निवडणुकीच्या तोंडावर भाजपमध्ये प्रवेशाचा सपाटा सुरूच आहे. यात दुसऱ्या-तिसऱ्या फळीतील नेत्यांसह आजी-माजी नगरसेवक, जि. प., पंचायतसमिती सदस्यांसह इच्छुकांच्या कोलांटउड्या सुरू आहेत. वास्तविक काहीजणांनी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत इकडून तिकडे उड्याही मारल्या होत्या. एवढेच काय, तर विरोधकात कामही केले होते. परंतु दुर्दैवाने ते सर्व मतभेद विसरून आता भाजप बाहुबली झाल्याने तिकडे उड्या मारण्याचा सपाटा सुरू आहे. यामागे निवडणुकीसाठी साम-दामची रसद विजयाचा मार्ग सोपा करणारी ठरेल असे सर्वांना वाटत आहे. पण या होणाऱ्या 'भाऊगर्दी'मुळे मूळनिवासी कार्यकर्त्यांना मात्र आपण तयार केलेले निवडणुकीचे मैदान दुसऱ्याच्या तावडीत देण्याची भीती वाटू लागली आहे. पत्येक प्रभाग, गट-गणनिहाय ही चर्चा सुरू आहे. यामुळे भाजपनेत्यांसमोर नवा प्रश्न उभा ठाकला आहे. यातूनही या इच्छुकांनी वेळ पडलीच तर निष्ठेची ऐशी-तैशी म्हणत आपणही अजितदादा, शिंदे गट नाहीतर काँग्रेस-राष्ट्रवादीकडे जावून मैदानात उतरायचाही पर्याय सुरु ठेवला आहे. यासंदर्भात रंगलेला फड ...!

**बाबूराव :** ह्या मुन्शिपाल्टी, झेडपीच्या इलेक्शानचं वारं नुसतंच वाहू लागलंया, पन तारका काय निगंनात.

**पांडूनाना :** आरं, त्या झेडपीच्या परभागरचना आन् आरक्शनं बी निगाय लागल्याती न्हवं.

**बाबूराव :** खराय तुजं, पन आजून इलेक्शान कदी हुत्याल हेचा आंदाज येईना. त्यात पक्शपरवेशाचा भाजपचा सपाटा सुरूच हाय.

**पांडूनाना :** ते मातुर खराय, पन त्यातनं जे वरसान वरसं भाजपसाटी खस्ता खात्यात त्येंची गोची हुवू लागलीया मातुर.

**बाबूराव :** आरं तसं काय नसतंया, भाजपमदी न्हायतर निष्टावंतानं पद-पक्शाची आपेक्शा ठेवायची न्हाय. राबत न्हायाचं, कधीतरी कल्यान हुईलच ध्येनात ठेवायाचं.

**पांडूनाना :** मग कसला ह्यो समद्या जगात मोटा पक्श; हितं समदी भाईरची हायत कारभारी.

**बाबूराव :** ह्ये म्हजी कुनी बी या आन् आमचं मालक व्हा असाच झाला ना!


**पांडूनाना :** आरं ह्यामुळंच आता भाजप नेत्यास्नी इच्छुक जाब विचाराय लागल्याती. आता किती भरती कताय, आमी कुटं जायचं?

**पांडूनाना :** आरं तेला बी पर्याय हाय न्हवं, आजित दादा, शिंदे गट न्हायतर काँगरेस, राष्टरवादी पवार गट हायच की

**बाबूराव :** म्हजी काय, आजून कोन कुटं हे सांगता येनार न्हाय. इलेक्शान लागंल तेवा बगू म्हंत्यात समदी.

**बाबूराव :** हे म्हजी बेस झालं साहा पक्श झालं तेचा फायदाच झाला म्हनायचं. **– अमृत चौगुले**


## उपदेश कथा



**श्रध्देचं फळ**

सुप्रसिध्द निर्माता-दिग्दर्शक मेहबूब खान 'मदर इंडिया'ची निर्मिती करीत होते तेव्हा त्यांच्यावर बऱ्याच संकटाचा वर्षाव झाला. त्यांची स्वत:ची तब्येत बिघडली. चित्रपटाचं बजेटही वाढलं. वितरकांशी पूर्वी त्यांनी कधी लेखी करार केले नव्हते. केवळ विश्वास-ावर व्यवहार केले होते. चित्रपटाची किंमत वाढवली नव्हती पण खर्चाचं पारडं जड झालेलं होतं. मेहबूब खाननं पैशाच्या पूर्ततेसाठी आपली सर्व मालमत्ता गहाण टाकली. स्टुडिओ तारण ठेवून पैसे उभे केले आणि निष्ठापूर्वक चित्रपटाचं काम पूर्ण केलं. मेहबूब खान यांची कामावर आणि परमेश्वरावर पूर्ण श्रध्दा होती. ठरल्याप्रमाणे मेहबूब खान चित्रपटाच्या निगेटिव्हज घेऊन पवित्र मक्केच्या यात्रेला गेले व तेथून लंडनला जाऊन चित्रपटावरच्या रासायनिक प्रक्रिया पूर्ण केल्या. ढासळणाऱ्या तब्येतीकडे आणि गुंतवलेल्या पैशाकडे दुर्लक्ष करून श्रध्देने काम पूर्ण केलं. १९५८ मध्ये 'मदर इंडिया' प्रदर्शित झाला आणि एकट्या महाराष्ट्राला पंचवीस लाख मनोरंजन करपरतीमुळं मिळाले. महाराष्ट्र सरकारनं करमणूक कर माफ केला होता आणि उत्पन्नाचे विक्रम मोडले गेले होते.

## दिनविशेष...



**आंतरराष्ट्रीय**


१२१६ - ऑनरियस तिसरा पोपपदी.
१४८७ - नेदरलँडच्या लीयुवार्डेन शहरातील नागरिकांनी परदेशी बीयरवरील बंदीविरुध्द आंदोलन सुरू केले.
१५६७ - मेरी क्वीन ऑफ स्कॉटस पदच्युत. १ वर्षाचा जेम्स सहावा स्कॉटलंडच्या राजेपदी.
१७०१ - आँत्वान दि ला मॉथ कॅडिलॅकने फोर्ट पॉन्टचारट्रेन ही दुकानवजा वसाहत स्थापन केली. याचेच पुढे डेट्रॉईट शहर झाले.
१८३२ - बेन्जामिन बॉनिव्हिलच्या नेतृत्त्वाखाली बैलगाड्यांचा पहिला तांडा वायोमिंगमधील घाट चढून रॉकी माउंटन्स पर्वतरांगेच्या पश्चिमेस पोचला. अमेरिकेच्या पश्चिमेकडील विकासातील ही महत्त्वाची घटना होती.
१८४७ - आयोवातून १७ महिने पश्चिमेकडे वाटचाल केल्यावर ब्रिगहॅम यंग व १४८ इतर मोर्मोन व्यक्ती सॉल्ट लेक सिटी येथे पोचले.
१८६६ - टेनेसी परत अमेरिकेत दाखल.
१९०१ - प्रसिध्द अमेरिकन लेखक ओ. हेन्रीची बँकेतील पैश्यांच्या अपहाराबद्दलची ३ वर्षांची शिक्षा संपून सुटका.
१९११ - हायराम बिंगहॅम तिसऱ्याने पेरूतील माचु पिच्चु हे प्राचीन कालीन इंका संस्कृतीचे शहर शोधले.
१९१५ - ईस्टलँड हे प्रवासी जहाज शिकागो जवळ बुडाले. ८४५ मृत्युमुखी.

## सरकारी यंत्रणांचे अपयश

११ जुलै २००६ रोजी मुंबई लोकल बॉम्बस्फोट प्रकरणातील सर्वच्या सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली. या बॉम्बस्फोटात २०० हून अधिक नागरिकांचा जीव गेला होता. निर्दोष सोडण्यात आलेल्या आरोपींपैकी काही आरोपींना कनिष्ठ न्यायालयाने मृत्यदंडाची शिक्षा सुनावली होती तर काहींना जन्मठेपेची. कनिष्ठ न्यायालयाने दिलेला निकाल उच्च न्यायालयातही कायम राहील अशी अपेक्षा असताना असा निकाल आल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. हा निकाल धक्कादायक आहे. या आरोपींना दोषी सिध्द करण्यात सरकारी यंत्रणेला अपयश आले. या आरोपींना दोषी सिध्द करण्याइतपत पुरावे सरकारी यंत्रणा न्यायायलयापुढे सादर करू शकले नाही त्यामुळेच आरोपी निर्देश सुटले. आता प्रश्न पडतो की हे आरोपी निर्दोष तर मग दोषी कोण? दोषी कोणच नाही तर मग बाँबस्फोट झालाच कसा? जर यांनी बॉम्बस्फोट केला नाही तर कोणी केला? या बाँबस्फोटात जे लोकांचा जीव गेला त्याला जबाबदार कोण? असे एक नो अनेक प्रश्न मनात आल्याशिवाय राहात नाही. सरकारी यंत्रणा हा बॉम्बस्फोट यांनीच केला या मतावर ठाम आहेत मग आता सरकारी यंत्रणेने न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल करून आरोपींविरुध्दचे सबळ पुरावे न्यायालयात सादर करावेत.

**–श्याम ठाणेदार, पुणे**

## जन की बात...



### विवाह संस्कार आता करार होतोय!

अलिकडील काळात विवाहाला एका कराराचे स्वरुप आलेले आहे. जे कधीही होतात व कधीही तूटत असतात. ज्यातून त्यांना अपत्य असलं की त्यांचं नुकसानच होत असतं. पुर्वी असं नव्हतं. विवाह हा एक संस्कार होता व त्याला संस्कारासारखंच जपलं जायचं. तो संस्कार होता, आपल्या पुर्वजांनी बनविलेला. आपल्यानंतर आपल्या मुलाला चांगलं आनंददायी जीवन जगता यावं म्हणून आपले पुर्वज बालपणातच वधू शोधत असत. तिला बालवयातच आपल्या घरी आणत असत. तिच्यावर संस्कार करीत असत व वारंवार सांगत असत की तिनं भविष्यात कितीही संकट आली तर घाबरु नये. पतीला साथ द्यावी. अन् पुरुषालाही सांगणं असायचं की त्यानं तिला सोडू नये. त्यानंही तिला साथ द्यावी. अशाच संस्कारात वाढणारे ते जोडीदार. पूर्वी स्त्रीया जोडीदार गेला कि, स्वखुशीनं आपल्या पतीसोबत सती जात असे. तशी सती जाण्याची अनेक कारणं होती. त्यातील एक कारण म्हणजे त्यांच्यातील प्रेमाची भावनाच त्यांना सती जायला प्रेरणा देत असे. म्हणून पूर्वी घटस्फोटाचे प्रमाण कमी होते. घटस्फोट होत नव्हते असे नाही. त्या काळातही घटस्फोट होतच होते. परंतु ते घटस्फोट किरकोळच स्वरुपाचे असायचे. एखाद्या घरात कोणी जोडीदाराला त्रास देत असेल तर संयुक्त कुटुंब असल्यामुळे त्यांना समजविण्याची कृती घडत असे. कारण बालविवाहच जास्त प्रमाणात व्हायचे. ज्यात आपली स्नुषा कशी घडावी? आपल्या मुलासोबत तिनं कसं वागावं?हे शिकविणारी त्या काळातील बालविवाह पद्धती असताना ज्यापध्दतीने समजून घेतले जायचे तसे आज घेतले जात नाही. याचे मुख्य कारण म्हणजे मुलगी आणि सून यांच्यात केला जाणारा फरक. त्यामुळे आजच्या मुलींच्या जीवनात सासू सासरे आणि सासरकडील मंडळींबद्दल आत्मीयता नसते. माझ्या मुलाचा संसार चांगला चालावा. तो शेवटास जावा. यासाठी त्या काळातील सासू आपल्या सुनेचा राग न करता तिला मुलगी समजून रहायची. आज ती परिस्थती नाही. सासूला सुनेविषयी आत्मीयता राहीली नाही. मग त्या सुनेला सासूविषयी आपलेपणा वाटावा हा हट्ट धरला जातो तो नक्कीच चुकीचा आहे. त्यातच सासू जर तिला त्रास देत असली तर आताच्या मुली शैक्षणिकदृष्ट्या आपल्या पायावर उभ्या असल्याने त्या या गोष्टींचा विचार सोडून देतात. त्यात चुकीचे असे काहीच नाही. अशा सासूपणानी मुलाचा संसार तुटत जातोय याची भिती बाळगली जात नसल्याने आज विवाहाला कराराचे स्वरुप प्राप्त झाले आहे.

**–प्रेरणा खेडेकर, सांगली**

## सोशल मिडिया वापरात सतर्कता हवी

आजवर देशात अनेक मुली या सायबर गुन्हेगारांच्या कारस्थांनाना बळी पडल्या आहेत. विशेष म्हणजे हे ब्लॅकमेलर सायबर गुन्हेगार अदृश्य असल्याने सायबर क्राईमकडे तक्रार करूनही यांचा छडा लागेलच असे नाही. अशा अनेक केसेस पोलिसांच्या सायबर क्राईम सेल कडे दाखल असूनही अनेक गुन्हेगार मोकाट फिरत आहेत. अशा सायबर गुन्हेगारांचा छडा लावणे पोलिसांसाठी डोकेदुखीची बाब बनली आहे. पोलिसांच्या सायबर सेलकडून अशा आमिषाला बळी पडू असे आवाहन केले जाते तरीही अनेक तरुण आमिषाला बळी पडतात. अलीकडे तर हे प्रमाण खूप वाढले आहे त्यामुळे सोशल मिडियावर वावरताना खूप सतर्क राहणे आवश्यक आहे. सायबर गुन्हेगारांची ही टोळी आपली सोशल मिडियामध्ये आपण टाकत असलेल्या पोस्टवरुन आपली मानसिकता ओळखून पध्दतशीरपणे जाळे टाकतात व फसवतात त्यामुळे सोशल मिडियावर पोस्ट टाकताना काळजी घ्यावी. सोशल मिडियावर ओळखीच्याच लोकांना फॉलो करावे. अनोळखी लोकांच्या फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारू नये. अनोळखी लोकांच्या मेल आणि फोन कॉलला उत्तर देऊ नये. स्वतःच्या कौटुंबिक आणि वैयक्तिक बाबी सोशल मिडियावर टाकू नये. सोशल मिडियावर वावरताना जर सतर्क रहावे.

**–वैशाली सोलापूरे, सांगली**

# शिरूरमध्ये महावितरणच्या हलगर्जीपणामुळे ट्रान्सफॉर्मर फुटला; तिघे जखमी

■ जनप्रवास प्रतिनिधी

जांबूत : शिरूर शहरातील सिटी बोरा कॉलेजसमोर मंगळवारी (दि. १७ जुलै) रात्री ९:४० वाजता महावितरणच्या डिपीचा (ट्रान्सफॉर्मर) भीषण स्फोट होऊन गजानन गणपत लकडे यांच्यासह तीन जण अपघातग्रस्त झाले. लकडे यांच्यावर श्री गणेशा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

या दुर्घटनेची सर्वस्वी जबाबदारी महावितरण कंपनीवर असून, कंपनीकडून सातत्याने बेजबाबदारपणा होत असल्याची नागरिकांची तक्रार आहे. सदर ठिकाणी असलेल्या डिपीवर क्षमतेपेक्षा जास्त भार (लोड) असल्याने डिपी फुटण्याची ही पहिलीच वेळ नाही. वर्षातून किमान दोन वेळा या ठिकाणी अशा घटना घडत असल्याचे समोर आले आहे.

हा ट्रान्सफॉर्मर शिरूर शहर आणि नव्याने विकसित होणाऱ्या बाबुराव नगरला जोडणाऱ्या मुख्य वर्दळीच्या रस्त्यालगत आहे. या मार्गावरून दररोज शाळकरी मुले, नागरिक, अबालवृद्ध यांची ये-जा सुरू असते. अपघाताचा काळ रात्रीचा असल्यामुळे मोठा अनर्थ टळला, मात्र ही घटना दिवसा घडली असती तर मोठी जीवितहानी झाली असती, असा नागरिकांचा सूर आहे.

या घटनेनंतर अपघातग्रस्त गजानन लकडे यांचे मित्र यांनी लोकनेते नाथाभाऊ पाचर्णे यांच्याशी संपर्क साधून मदतीची विनंती केली. त्यांनी तत्काळ बारामती परिमंडळाचे अधीक्षक अभियंता यांना फोन करून परिस्थितीचे गांभीर्य लक्षात आणून देत अपघातग्रस्तांना तातडीने मदत करण्याचे निर्देश दिले.

शहरातील वाढत्या वीजभाराचा विचार करून महावितरणने वेळेत उपाययोजना न केल्यास भविष्यात अधिक गंभीर घटना घडू शकतात, अशी जनतेत चिंता आहे. त्यामुळे या ठिकाणी कायमस्वरूपी तोडगा काढण्याची मागणी जोर धरत आहे.

> सदर ठिकाणच्या डिपीवरचा ओव्हरलोड कमी करून नव्या ट्रान्सफॉर्मरची तत्काळ स्थापना. अपघातग्रस्त नागरिकांना भरपाई व मोफत उपचार. जबाबदार महावितरण अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई. शहरातील इतर धोकादायक ट्रान्सफॉर्मरची तत्काळ पाहणी.
>
> - नाथाभाऊ पाचर्णे, राज्य संयोजक ,भारतीय बहुजन पालक संघ

> ज्या ठिकाणी ट्रान्सफॉर्मर फुटला तो ट्रान्सफॉर्मर उद्ध बोरा या मोठ्या कॉलेज समोर रहदारीच्या रस्त्याच्या कडेला आहे,तो आत मध्ये स्थलांतरित करने गरजेचे आहे. सदर ठिकाणी शिरूर शहराचे दानशूर व्यक्ती मा.प्रकाशभाऊ धारीवाल यांची जागा आहे तरी प्रकाशभाऊ यांनी मोठे मन करून ही धोकादायक ट्रान्सफॉर्मर स्थलांतरित करण्यास मदत करने गरजेचे आहे.शिरूर शहर व शिरूर ग्रामीण भागातील सर्व ट्रान्सफॉर्मर वरती प्रमाणापेक्षा जास्त विद्युत भार आहे यामुळे अश्या घटना घडत आहेत. नवीन विज कनेक्शन देताना मोठ्या विकसकांना जुन्या ट्रान्सफॉर्मर वरून विज जोड न देता नवीन ट्रान्सफॉर्मर टाकायला लावने.तसेच जुन्या ट्रान्सफॉर्मर वरचा लोड चेक करून मोठ्या क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर बसवने गरजेचं आहे.
>
> - सागर घोलप, सामाजिक कार्यकर्ते

## कपर्दिकेश्वर देवधर्म संस्थेच्या सचिवपदी महेंद्र (गांधी) पानसरे यांची निवड

■ जनप्रवास प्रतिनिधी

ओतूर : ओतूर (ता. जुन्नर) येथील ग्रामदैवत श्री कपर्दिकेश्वर देव- धर्म संस्थेच्या सचिवपदी महेंद्र (गांधी) पानसरे यांची नुकतीच निवड करण्यात आली असल्याची माहिती श्री कपर्दिकेश्वर देवधर्म संस्थेचे अध्यक्ष अनिल तांबे यांनी दिली.

पानसरे हे अनिल तांबे यांचे ते अत्यंत विश्वासू व निकटवर्तीय आहेत.त्यांच्या या निवडीबद्दल ओतूर आणि पंचक्रोशीतून, त्यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव केला जात आहे.



पानसरे यांच्या निवडीनंतर श्री कपर्दिकेश्वर स्विमिंग अँड वॉकिंग ग्रुपचे सदस्य श्री विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे संचालक धनंजय डुंबरे, अशोक काशीद, संपत तांबे, गणेश डुंबरे, शशिकांत तांबे, रूपेश तांबे, दीपक तांबे, रायचंद्र शेटे, दादू ठोंगीरे, संतोष कर्डीले, रोहिदास गाढवे, दिलीप काशिनाथ डुंबरे, अरूण वाकचौरे, गोरख जाधव, संदीप इसकांडे, सुशांत बावबंदे, सचिन पानसरे, शप्पी मोमीण, विजय कर्डीले, शब्बीर तांबोळी, प्रकाश शेटे, सुदाम गायकर, शांताराम घाडगे, अविनाश ताजणे, यश येंधे, प्रकाश मोधे, पोपट मालकर, प्रकाश हिंगणे आदींनी त्यांचे स्वागत केले.

## न्यू इंग्लीश स्कुल मध्ये लोकमान्य टिळक जयंती साजरी

■ जनप्रवास प्रतिनिधी

टाकळीभान : रयत शिक्षण संस्थेच्या, टाकळीभान येथील न्यू इंग्लिश स्कूल व आण्णासाहेब पटारे पाटील कनिष्ठ महाविद्यालयामध्ये भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील जहालमतवादी नेते लोकमान्य टिळक यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली .यावेळी व्यासपीठावर विद्यालयाचे मुख्याध्यापक आर. एम . शिंदे , पर्यवेक्षक एस.एस . जरे तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे उपशिक्षक बी.व्ही .देवरे ,ए .ए . पाचपिंड , श्रीमती डी . ए पांढरे आदी मान्यवर उपस्थित होते .

कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यालयाचे मुख्याध्यापक आर . एम .शिंदे , पर्यवेक्षक एस .एस . जरे , कार्यक्रमाचे अध्यक्ष बी .व्ही . देवरे ,प्रमुख वक्ते संदिप जावळे यांच्या हस्ते लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले .यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष बी.व्ही देवरे म्हणाले की, लोकमान्य टिळक यांनी स्वातंत्र्यलढ्यात



दिलेले योगदान अमूल्य असून त्यांचे कार्य देशातील लोक कधीच विसरणार नाही. .कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते संदिप जावळे यांनी लोकमान्य टिळक हे भारतीय स्वातंत्र्य लढयातील प्रेरणास्त्रोत होते असे सांगून त्यांनी भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी भारतीयांमध्ये स्फूल्लिंग पेटवले असे सांगितले. यावेळी विद्यालयाचे विद्यार्थी सिद्धार्थ शिंदे ,कु. दिव्या पैठणपगारे , कु . श्रेया शिंदे, कु. अलिशा भैलिमकर, कु. संस्कृती निंबाळकर यांनी मनोगत व्यक्त केले . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. पलक कोकणे हिने तर आभार कु. श्रद्धा शेरकर यांनी व्यक्त केले.

## कोळगाव फाटा ते ग्रामीण रुग्णालय रस्ता कधी करणार ? : प्रतीक लगड

■ जनप्रवास प्रतिनिधी

श्रीगोंदा : कोळगाव फाटा ते ग्रामीण रुग्णालय रस्त्याची अक्षरशः चाळण झाली असून वाहनधारकांना शारीरिक, मानसिक, आर्थिक मनस्ताप सहन करावा लागत आहे. रस्त्याचे टेंडर मंजूर होऊनही अद्याप पर्यंत रस्त्याचे कामकाज का सुरू करण्यात आले नाही असा सवाल करून प्रतीक लगड यांनी सदर रस्त्याचे काम लवकर सुरू न झाल्यास आंदोलनाचा इशारा दिला आहे.

श्रीगोंदा तालुक्यातील कोळगाव फाटा ते ग्रामीण रुग्णालय रस्त्याची टेंडर मंजूर होऊनही संबंधित ठेकेदाराने अद्याप पर्यंत रस्त्याचे काम सुरू केले नाही. पळसा नदीवरील पुलाचे बांधकाम रेंगाळत ठेवले .सध्या या रस्त्याची मोठ्या प्रमाणात चाळण झाली असून



> कोळगाव फाटा ते ग्रामीण रस्त्याचे कामावर ठेकेदारांनी निकृष्ट दर्जाचं स्टील आणलं होतं त्या ठेकेदाराला सांगितले की अंदाजपत्रका चांगल्या दर्जाचं काम करा तसेच मागील आठ वर्षांपूर्वी राष्ट्रीय पेजजल योजना याच ठेकेदाराने निकृष्ट दर्जाचा करून कोट्यावधी रुपयाचीअर्धवट ठेवून गेला हे दोन्ही काम अंदाजपत्रका प्रमाणे व्हावे ही योजना देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेबांनी हर घर जल योजना आणली आहे परंतु बी एच पवार या ठेकेदारामुळे अपुरी राहिली.
>
> – लोकयुक्त सरपंच

असंख्य खड्ड्यांनी नागरिकांचे हाल होत आहेत. आज सकाळी वयोवृद्ध दोन व्यक्ती खड्ड्यात मोपेड स्कूटर पडल्याने जखमी झाले. सार्वजनिक बांधकाम विभाग या रस्त्यावर कोणाच्या मरणाची वाट पाहत आहे का म्हणजे रस्ता पूर्ण करण्यास सुरुवात करेल ? या रस्त्यावरून दररोज हजारो वाहने गावात येतात व जातात. एसटी महामंडळाच्या बसेस व मालवाहतूक करणाऱ्या मोठ्या गाड्या आत येतात. बसच्या चालकांनाही मोठी कसरत करावी लागत आहे. रस्त्यावर मुरूमही टाकण्यात आला. परंतु पावसाने पुन्हा खड्डे तयार झाले आहे. खड्डेही मोठ्या प्रमाणात पडल्याने वाहन चालकांना खड्ड्यांचा अंदाज न आल्याने वाहने एकमेकांना धडकत आहेत. शिवाय वाहनांच्या नुकसानीमुळे वाहन चालकांमध्ये वादाचे प्रसंग निर्माण होत आहेत .

सदर रस्त्याचे टेंडर मंजूर असूनही ठेकेदाराने या रस्त्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे .त्यामुळे कोळगाव, कोथूळ, ढोरजा भानगाव येथील वाहन चालकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. रस्त्याचे काम पूर्ण न झाल्याने मुख्यमंत्री

## पुणे - नाशिक महामार्गावर पिकअप व एसटी बस चा अपघात; दोघेजण जखमी

■ जनप्रवास प्रतिनिधी

निरगुडसर : एकलहरे ता. आंबेगाव गावच्या हद्दीत पुणे नाशिक महामार्गावर पुण्यावरून नाशिक कडे निघालेली एस टी बस क्रमांक एम एच १४ बी टी ४९९९ या प्रवासी बसला मालवाहतूक पिक अप क्रमांक एम एच ०६ ए जी ४३७७ या पिकअपने मागून जोरदार धडक दिल्याने अपघात झाला आहे. या अपघातात पिकप मधील चालक व त्यांच्याबरोबर असलेला एक सहकारी जखमी झाले आहेत. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.




याबाबत अधिक माहिती अशी पुणे नाशिक महामार्गावरील एकलहरे गावच्या हद्दीत एसटी बस गतिरोधका जवळ आली असता एसटीबस चालक संतोष कारभारी गायकवाड यांनी एसटीचे वेग सावकाश केला असता मागून किराणामाल घेवून येणारी पिकअप बसला धडकली. पिकअप चा ड्रायव्हर संदेश अजित गुप्ता रा. शिनोली ता. आंबेगाव याला पुढे चाललेली एस सावकाश झाल्याचा अंदाज न आल्यामुळे एस टी ब ला मागून जोरात पीकअप धडकली असून यामध्ये एसटी बसचे मागील बाजूचे व पिकअप चे पुढील बाजूचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या अपघातात पिकप चालक संदेश अजित गुप्ता, वय २२ वर्षे रा. शिनोली व सोबत असणारा दुसरा व्यक्ती तुषार कचर साबळे वय २० वर्षे रा. फुलवडे हे दोघे जखमी झाले आहेत. मंचर पोलिसांनी घटनास्थळी भेट देत पाहणी करत रस्त्यावरील अपघाताची पिकअप व एसटी रस्त्याच्या बाजूला घेत वाहतूक सुरळीत केली आहे.

## ग्रामोन्नती मंडळ शिक्षणशास्त्र महाविद्यालयाची उत्कृष्ट निकालाची परंपरा यावर्षीही कायम

■ जनप्रवास प्रतिनिधी

नारायणगाव : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्न ग्रामोन्नती मंडळ शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नारायणगाव या महाविद्यालयाचा बी.एड. सन २०२४-२५ यावर्षीचा निकाल ९८% इतका लागला असल्याची माहिती प्राचार्य डॉ. बी. एस. मुरादे यांनी दिली.

महाविद्यालयातील छात्राध्यापिका साधना शिंदे यांनी ७८% गुण मिळवून विशेष प्राविण्यासह प्रथम क्रमांक मिळवला. याबरोबरच सविता सोमवंशी, अश्विनी गवारी, धनश्री चव्हाण, राजश्री घोडेकर यांनीही विशेष प्राविण्यासह यश संपादित केले.

ग्रामोन्नती मंडळाचे विश्वस्त व कार्याध्यक्ष अनिलतात्या मेहेर, अध्यक्ष सुजित खैरे, कार्यवाह रविंद्र पारगावकर,चेअरमन ऋषिकेश मेहेर, डॉ. राहुल गोंगे, प्राचार्य डॉ. बी. एस. मुरादे प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी या सर्वांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. प्रथम आलेल्या साधना शिंदे व सर्व यशस्वी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील

अभिनव अशा उपक्रमांमुळे तसेच गुणवत्ताधारक प्राध्यापकांच्या मार्गदर्शनामुळे यश संपादन केल्याची भावना व्यक्त केली. परीक्षा विभाग प्रमुख प्रा. वैभव खराडे यांनी कठोर मेहनत आणि शिस्तीमुळे हे यश संपादन झाल्याचे स्पष्ट केले.

## कोळगावची कन्या नीतू भापकर यांना ग्लोबल आयकॉन अवॉर्ड प्राप्त

■ जनप्रवास प्रतिनिधी

श्रीगोंदा : तालुक्यातील कोळगाव येथील नीतू शरद भापकर यांनी गेल्या पंधरा वर्षापासून सॅनिटरी नक्की व मॅटरनिटी नॅपकिन च्या हायजिन इंडस्ट्रीमध्ये उत्कृष्टपणे कार्य केल्याने त्यांना ग्लोबल आयकॉन अवॉर्ड २०२५ प्राप्त झाला असून त्यांना डॉक्टरेट ही मानद पदवी मिळाली आहे.

नीतू शरद भापकर या कोळगाव येथील रहिवासी असून द्रोपदाबाई भापकर आणि भैरू शंकर भापकर यांच्या लहान सुनबाई आहेत त्यांनी केडगाव, अहिल्यानगर येथे फेमी हेल्थ हब या हायजिन इंडस्ट्री मार्फत गेल्या पंधरा वर्षापासून गरजू, घरगुती व सोसायटीमधील महिलांकडून हायजिन इंडस्ट्रीमध्ये सॅनिटरी नॅपकिन व मॅटरनिटी नॅपकिन तयार करून महिलांना रोजगार उपलब्ध करून दिला. तसेच पुणे येथे सध्या त्या हायजिन इंडस्ट्री चालवत असून तेथेही मॅटरनिटी नॅपकिन हा उपक्रम सुरू केला आहे. ग्रामीण भागातील महिलांना साठी वुमन एम्पॉवरमेंटचे काम केले. त्यामध्ये सदर महिलांना




सॅनिटरी नॅपकिन वापरायची कसे, घरी राहून बिजनेस कसा सुरू करायचा ,त्याचे प्रशिक्षण व माहिती वेळोवेळी दिली. या कार्याची दखल घेऊन त्यांना नुकताच जागतिक दर्जाचा वर्ल्ड वाईड ग्लोबल आयकॉन अवॉर्ड २०२५ हा पुरस्कार चीन येथे देण्यात आला. तसेच मॅजिक बुक ऑफ रेकॉर्ड, दिल्ली या अंतर्गत या यापूर्वीही वुमन एमपॉवरमेंटचे काम केल्यामुळे दोन पुरस्कार प्राप्त झाले होते. जागतिक स्तरावर त्यांना पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल कोळगावचे सरपंच पुरुषोत्तम लगड, माजी सरपंच हेमंत नलगे, सोसायटी चेअरमन विश्वास थोरात, मार्केट कमिटी संचालक नितीन डुबल, सामाजिक कार्यकर्ते भैरू भापकर जेष्ठ नागरिक संघटनाचे अध्यक्ष दत्तात्रय जाधव, ग्रामपंचायत सदस्य व सोसायटी संचालक भापकरवाडी, कोळगाव येथील ग्रामस्थ अभिनंदन केले आहे.

## 'एक पेड माँ के नाम' उपक्रम शिरोली बुद्रुक येथे साजरा

■ जनप्रवास प्रतिनिधी

नारायणगाव : जुन्नर तालुक्यातील न्यू इंग्लिश स्कूल शिरोली बुद्रुक विद्यालयामध्ये महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त मुख्याध्यापक प्रसाद हांडे यांचे मार्गदर्शनानुसार विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सामाजिक वनीकरण परिक्षेत्र जुन्नर यांच्या माध्यमातून वनमहोत्सव योजना २०२५ - २६ अंतर्गत "एक पेड माँ के नाम" हा केंद्र शासनाचा उपक्रम सामाजिक वनीकरण जुन्नरचे वनपरीक्षेत्र अधिकारी समीर इंगळे यांच्या माध्यमातून राबविण्यात आला.

सामाजिक वनीकरण जुन्नर यांच्या मार्फत यावेळी ४५० वृक्षांची रोपे प्रत्येक विद्यार्थ्याला वाटप करण्यात आली. वाढदिवसानिमित्त शालेय परिसरात वृक्षारोपण, तसेच विद्यार्थ्यांना आई साठी एक झाड लावण्या चा निर्णय घेतला. प्लास्टिक संकलन, चित्रकला प्रदर्शन, रांगोळी प्रदर्शनाचे भव्यदिव्य आयोजन केले. रांगोळी प्रदर्शनाचे उद्घाटन वनपाल मनिषा काळे व वनपाल संतोष आगरकर यांच्या हस्ते तर छायाचित्र प्रदर्शनाचे उद्घाटन माजी सैनिक वनरक्षक रमेश खरमाळे, शौकत अली मोमिन यांच्या हस्ते करण्यात आले.




रांगोळीचे नियोजन शिक्षिका शोभा कवडे व कविता ढेरंगे, रेंगडे शैला,बांगर सुरेखा, पवार रेश्मा यांनी केले.

तसेच चित्रकला प्रदर्शनाचे नियोजन शिक्षक अक्षय पाटोळे, कैलास बोभाटे व विकास गोंजारी यांनी केले. विद्यालयामध्ये वृक्षारोपणाचे नियोजन राष्ट्रीय हरित सेना,वनराई अंतर्गत इको क्लब चे प्रमुख संतोष देवकुळे यांनी केले. वृक्षारोपण शिरोली गावचे सरपंच प्रदीप थोरवे, पालक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष सचिन थोरवे, शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष सुनील विधाटे, डॉ. भिवसेन राऊत, स्काऊट गाईड विभाग खेडकर जनार्दन, प्रियांका पादिर, रूपाली नलावडे यांच्या हस्ते करण्यात आले. गावातील प्लास्टिक संकलनाचे काम विरणक सुनील, नलावडे किशोर, आनंदा सांगडे, मयूर जगताप यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तुकाराम निदन यांनी केले.सांस्कृतिक विभाग प्रमुख रामचंद्र अय्यर यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. आभार विद्यालयाच्या पर्यवेक्षक अनघा घोडके यांनी मानले.

## संक्षीप्त वृत्त

### शेल्कलचा वारसा आता ॲडल्ट न्यूट्रिशन पावडर क्षेत्रात – टॉरेंट फार्माने 'शेल्कल टोटल' लाँच केले

■ जनप्रवास प्रतिनिधी

पुणे : टॉरेंट फार्मास्युटिकल्स लिमिटेड (एनएसई: टीओआरएनटीपीएचएआरएम / बीएसई: ५००४२०) ने शेल्कल टोटल हे नवीन ॲडल्ट न्यूट्रिशन सप्लिमेंट पावडर लाँच केल्याची घोषणा केली आहे. हे पावडर वैज्ञानिक पद्धतीने तयार केले असून झपाट्याने वाढत असलेल्या न्यूट्रिशन क्षेत्रात त्यांच्या शेल्कल या प्रसिद्ध ब्रँडचा विस्तार करत आहे. शेल्कल हा ब्रँड गेली तीन दशके भारतीय नागरिकांचा विश्वास संपादन करत असून, २०१३ मध्ये टॉरेंट फार्माने तो विकत घेतल्यापासून भारतातील नंबर १ कॅल्शियम सप्लिमेंट ब्रँड म्हणून ओळखला जात आहे. त्यानंतर शेल्कलच्या पोर्टफोलिओमध्ये ग्राहकांसाठी शेल्कल प्रो गमीज आणि शेल्कल प्रो किड्स गमीज यांसारखे उपयुक्त आणि वापरण्यास सोपे पर्याय बाजारात आणले गेले आहेत. यामुळे हा ब्रँड सर्व वयोगटांसाठी आणि बदलत्या आरोग्य गरजांसाठी उपयुक्त ठरतो. आता शेल्कल टोटल हा ब्रँड एक आधुनिक, ग्राहक-केंद्रित न्यूट्रिशन पोर्टफोलिओ म्हणून विकसित होत आहे.


### पिंपरी-चिंचवडमध्ये आदित्य बिर्ला हॉस्पिटलचे आयसीयू आरोग्यसेवेत आघाडीवर

■ जनप्रवास प्रतिनिधी

पुणे : चिंचवड येथील आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटल (एबीएमएच) चे अतिदक्षता विभाग (आयसीयू) आरोग्य क्षेत्रात अग्रणी ठरत आहे. अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणे, कृत्रिम बुद्धिमत्ता (अख) तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, आणि अनुभवी तज्ज्ञांच्या सतत देखरेखीमुळे रुग्णालयाने आयसीयू आरोग्यसेवेत नवीन मानदंड प्रस्थापित केले आहेत. ७५-बेड क्षमतेच्या या विभागात दरमहा सरासरी ३५० ते ४०० रुग्णांवर उपचार केले जातात.हॉस्पिटल मधील हा आयसीयू विभाग केवळ गंभीर रुग्णांच्या देखरेखीतच मर्यादित नसून, तो अचूक निदान, रिअल-टाइम डेटा विश्लेषण, मिनिमली इन्वेसिव्ह उपचार आणि जीवनरक्षक तंत्रज्ञानाने युक्त आहे. आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटल येथील अतिदक्षता विभागाच्या संचालिका डॉ. उर्वी शुक्ला म्हणाल्या की, प्रत्येक आयसीयू बेड आधुनिक मॉनिटरिंग सिस्टम्सने सुसज्ज असून हृदयाचे ठोके, ऑक्सिजन सॅच्युरेशन आणि रक्तदाब सतत मोजले जातात.

### जीतेश्री डमाळे महिला अंडर १९ क्रिकेट स्पर्धेसाठी निवड

■ जनप्रवास प्रतिनिधी



पाथर्डी : पाथर्डी तालुक्यातील डमाळवाडी येथील जीतेश्री विष्णू डमाळे हिची महाराष्ट्र राज्य निमंत्रित क्रिकेट स्पर्धेत धुळे येथे होणाऱ्या महिला अंडर १९ क्रिकेट स्पर्धेसाठी निवड झाली आहे जीतेश्री डमाळे ही महिला क्रिकेटर पाथर्डी येथील एस व्ही नेट क्रिकेट अकॅडमीची अष्टपैलू खेळाडू आहे जीतेश्री डमाळे हिचे वडील विष्णू डमाळे हे पाथर्डी येथील राज्य परिवहन महामंडळ आगारात नोकरीस आहेत जीतेश्रीने भविष्यात भारतीय महिला क्रिकेट संघाचे नेतृत्व करावे यासाठी पाथर्डीकर जीतेश्रीला शुभेच्छा देत आहेत.

### बंदी असताना डिजे सुरु; गुहा येथे दोघांवर गुन्हा

■ जनप्रवास प्रतिनिधी

राहुरी : डिजे वाजविण्यास बंदी आहे, हे माहित असताना आरोपींनी राहुरी तालुक्यातील गुहा येथे रात्रीच्या सुमारास कर्ण कर्कश आवाजात डिजे वाजवीला. या प्रकरणी राहुरी पोलीस पथकाने डिजे जप्त करून दोन जणांवर गुन्हा दाखल केला. राहुरी तालुक्यातील गुहा येथील कमानी जवळ दि. २० जुलै २०२५ रोजी रात्री ८.३० वाजे दरम्यान कर्ण कर्कश आवाजात डिजे वाजत होता. त्या आवाजाने स्थानिक रहिवाशांना त्रास होत होता. पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या आदेशानुसार पोलिस हवालदार देविदास कोकाटे, प्रविण अहिरे, चालक शकुर सय्यद यांनी तेथे जाऊन कारवाई केली. पोलिस हवालदार देविदास कोकाटे यांच्या फिर्यादीवरून आरोपी प्रमोद मच्छिंद्र सांळुखे, रा. नगिना पिंपळगाव, ता. वैजापुर, व निरज सोमनाथ मदने, रा. गुहा, ता. राहुरी, यांच्यावर गुन्हा रजि. नं. ८००/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम २७०, २७१ प्रमाणे गुन्हा दाखल करून डिजे जप्त करण्यात आला.

### 'आयसीएमएआय'च्या राष्ट्रीय उपाध्यक्षपदी पुण्याच्या सीएमए नीरज जोशी यांची निवड

■ जनप्रवास प्रतिनिधी



पुणे : संसदीय कायद्यान्वये स्थापित दी इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अकाउंटंट्स ऑफ इंडियाच्या (आयसीएमएआय) राष्ट्रीय उपाध्यक्षपदी पुण्यातील नामवंत सीएमए नीरज जोशी यांची निवड झाली आहे. ही निवड २०२५-२६ या कालावधीसाठी करण्यात आली आहे. संस्थेच्या अध्यक्षपदी सीएमए टी. सी. ए. श्रीनिवास प्रसाद यांची निवड झाली आहे. सीएमए नीरज जोशी यांची राष्ट्रीय उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल 'आयसीएमएआय'च्या पश्चिम विभागीय समितीचे खजिनदार सीएमए चैतन्य मोहरीर, तसेच पुणे चॅप्टरचे अध्यक्ष सीएमए श्रीकांत इप्पलपल्ली, उपाध्यक्ष सीएमए राहुल चिंचोळकर, सचिव सीएमए हिमांशू दवे, खजिनदार सीमए तनुजा मंत्रवादी यांच्यासह व्यवस्थापन समिती सदस्यांनी आनंद व्यक्त करत सीएमए नीरज जोशी यांचे अभिनंदन केले. सीएमए नीरज जोशी हे सध्या 'आयसीएमएआय'च्या केंद्रीय कार्यकारिणी सदस्य आहेत. त्यांनी याआधी वेस्टर्न इंडिया रिजनल कौन्सिल (डब्ल्यूआयआरसी), तसेच कॉस्ट अकाउंटिंग स्टँडर्ड्स बोर्डच्या अध्यक्षपदाची जबाबदारीही यशस्वीरित्या सांभाळली आहे. पुण्यातील नामांकित 'धनंजय व्ही. जोशी अँड असोसिएट्स' या फर्मचे ते भागीदार आहेत. सीएमए नीरज जोशी म्हणाले, "दी इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अकाउंटंट्स ऑफ इंडिया संस्थेच्या राष्ट्रीय उपाध्यक्षपदी काम करण्याची संधी मिळणे ही गौरवाची बाब आहे.

# मदारींना हद्दपार करा : निघोज ग्रामस्थांचा ठराव




गायी गोठा जळीत प्रकरणातील दोन आरोपींना अटक केली असून त्यांच्या हद्दपारीचा प्रस्ताव पाठवला आहे तसेच आणखीन चार आरोपींना लवकर अटक करुन त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल अशी माहिती पोलीस उपनिरीक्षक खंडागळे यांनी दिली आहे.

■ जनप्रवास प्रतिनिधी

पारनेर : पुनर्वसन जागेवरील अतिक्रमण करणारे मदारी हे गुन्हेगारी पद्धतीने काम करीत निघोज आणी परिसरातील लोकांना त्रासदायक ठरत असल्याने त्यांची कायमची हकालपट्टी करुन या परप्रांतीय मदारींना हद्दपार करा असा ठराव निघोज ग्रामस्थांच्या ग्रामसभेत घेण्यात आला. या ग्रामसभेच्या अध्यक्षस्थानी उपसरपंच ज्ञानेश्वर वरखडे होते. निघोज येथील प्रगतिशील शेतकरी व बैलगाडा शौकीन निलेश भगवान भुकन यांचा गोठा जाळून तेथील जनावरांना जखमी करण्यात आले या प्रकरणी मुलिका देवी महाविद्यालय परिसरातील पुनर्वसन जमीनीवर अतिक्रमण करणारे मदारी हे यामधील काही लोकांनी हा गुन्हा केला असून भुकन यांनी फिर्याद देताना या गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांनी हा गोठा जाळण्याचे काम केले असून यांना अटक करण्याची मागणी केली होती. मात्र एक महिना होऊनही हे आरोपी मोकाट फिरत होते. यावेळी या ग्रामसभेला मोठ्या प्रमाणात ग्रामस्थांनी गर्दी केली होती. यावेळी संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन पाटील वराळ, माजी सरपंच ठकारामशेठ लंके, शिवबा संघटनेचे अध्यक्ष अनिल शेटे, माजी उपसभापती बबुशा वरखडे, खंडूजी भुकन, कांता लंके, ग्रामपंचायत सदस्या सुधामती कवाद, भिमराव लामखडे, विलासराव हारदे, पैलवान सुभाष वराळ, लहू निचीत, मेजर ढवळे, मच्छिंद्र लंके, निलेश लंके, रुपेश ढवण, देवराम लामखडे, सतिष ढवळे, दिलीप ढवण, गोकुळ शिंदे, निवृत्ती वरखडे, पोपटराव मंजाभाऊ लंके आदिंनी विविध सुचना मांडीत ग्रामसभेत आक्रमक भूमिका घेत तेथील गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांना लगेच हद्दपार करा तसेच सर्वांचे आधार कार्ड पडताळणी करुन सर्वावर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

या लोकांचा त्रास मोठ्या प्रमाणात गाव व परिसरातील लोकांना होत असून हद्दपार करणे हाच यावरील उपाय आहे. याची जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक, तहसीलदार, पोलिस निरीक्षक यांनी दखल घेऊन त्वरित कार्यवाही करावी अन्यथा दि.१५ ऑगस्ट रोजी रस्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. प्रगतीशील शेतकरी व बैलगाडा शौकीन निलेश भगवान भुकन यांचा गोठा जाणूनबुजून या लोकांनी जाळला आहे. मात्र या गुन्हेगारी लोकांना अद्याप पोलीसांनी अटक न करता मोकळीक दिली आहे. या घटनेचा ग्रामस्थांनी निषेध केला तसेच लवकरात लवकर या आरोपींना अटक करण्यात यावी तसेच प्रशासकीय यंत्रणेने या परप्रांतीय लोकांची चौकशी करुन लवकरात लवकर हद्दपार करण्याची मागणी केली.

## कर्जमाफीसाठी २४ जुलै रोजी प्रहार जनशक्ती पक्षाच्यावतीने चक्काजाम आंदोलन

### दौंड – जामखेड रोड येथे आंदोलन

■ जनप्रवास प्रतिनिधी




श्रीगोंदा : भाजप सरकारने विधानसभा निवडणुकीत आम्हाला मते द्या ,आमची सत्ता आल्यास सरसकट कर्ज माफी करू असे आश्वासन दिले होते मात्र सरकार सत्तेवर आले तरी अजून शेतकऱ्याना कर्ज माफी नाही त्यामुळे

राज्यातील शेतकऱ्याना तात्काळ कर्ज माफी द्यावी या मागणीसाठी दिनांक २४ जुलै रोजी श्रीगोंदे प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने चक्काजाम आंदोलन करण्यात येणार आहे अशी माहिती तालुका अध्यक्ष सुरेश सुपेकर यांनी दिली.

राज्यातील शेतकरी ,कष्टकरी ,दिव्यांग ,शेतमजूर मेंढपाळ, मच्छिमार व कामगार यांच्या न्याय मागणीसाठी तसेच कर्ज माफी साठी राज्यात प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने राज्यव्यापी चक्काजाम आंदोलन दिनांक २४ जुलै रोजी करण्यात येणार आहे.

श्रीगोंदे येथे देखील दौंड जामखेड रोड वर सिध्देश्वर मंदीर लगत या ठिकाणी आंदोलन करण्यात येणार आहे. या बाबतचे निवेदन श्रीगोंदे पोलीस स्टेशन व तहसीलदार यांना देण्यात आले आहे. या आंदोलनासाठी तालुक्यातील मोठे संख्येने शेतकरी बांधवांनी उपस्थीत राहावे असे आवाहन प्रहार चे तालुका अध्यक्ष सुरेश सुपेकर यांनी केले आहे.

## आंतरशालेय कथाकथन 'समर्थ'च्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

■ जनप्रवास प्रतिनिधी



अहिल्यानगर : बॅकस्टेज आर्टिस्ट्स असोसिएशन आयोजित स्व.सेठ श्यामसुंदर बिहाणी (बंगडीवाला) स्मृती राज्यस्तरीय आंतरशालेय कथाकथन स्पर्धेत श्री समर्थ विद्यामंदिर प्रशाला सावेडी अहिल्यानगर येथील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले.

विविध स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांनी सर्वात जास्त बक्षीस मिळवत सांघिक विजेतेपद पटकावल्यामुळे शाळेला फिरता चषक मिळाला. या स्पर्धेत जिल्हयासह इतर जिल्हयातूनही मोठा सहभाग होता.

लहान गटात प्रथम क्रमांक विभागून कु. आकृती असनीकर,कु स्वरा सभारंजक, तृतीय क्रमांक कु. स्वरा आकडकर,मोठा गटात उत्तेजनार्थ कु. कृष्णाली तागड, कु अदिती जाधव या सहभागी विद्यार्थ्यांचे प्रशालेच्या वतीने शालेय समितीचे चेअरमन किशोर देशपांडे व संस्थेचे सचिव सुरेश क्षीरसागर यांनी अभिनंदन केले.

प्रशालेच्या मुख्याध्यापिका श्रीमती संगीता जोशी , पर्यवेक्षक सुनील कानडे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

शिक्षक सौ. सारिका बोठे व सौ. ज्योती कोहकडे यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

## राहाता तालुक्यात सरपंच पदाच्या आरक्षणाची सोडत २४ जुलैला

■ जनप्रवास प्रतिनिधी

राहाता : तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या सरपंच पदासाठी २०२५ ते २०३० या कालावधीतील आरक्षण सोडत २४ जुलै रोजी होणार आहे. तहसील कार्यालय, राहाता येथे दुपारी १२ वाजता ही विशेष सभा होईल, अशी माहिती तहसीलदार अमोल मोरे यांनी दिली.

ग्रामविकास विभागाच्या आदेशानुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग व सर्वसाधारण प्रवर्गासाठी चक्रानुक्रमाने (रोटेशन पद्धतीने) आरक्षण निश्चित करण्यात आले आहे. यासाठी २०११ च्या जनगणनेच्या आकडेवारीचा आधार घेतला जाईल. सर्वसाधारण सोडतीनंतर दुपारी १ वाजता महिला उमेदवारांसाठी (अनुसूचित जाती महिला, अनुसूचित जमाती महिला, नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला व सर्वसाधारण महिला) आरक्षण सोडत काढली जाणार आहे. ही प्रक्रिया उपविभागीय अधिकारी शिर्डी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार आहे. तालुक्यातील ग्रामपंचायत सदस्य, जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य तसेच नागरिकांनी या सभेला उपस्थित रहावे, असे आवाहन तहसील कार्यालयातर्फे करण्यात आले आहे.

## शहरातील विनापरवाना फलक महानगरपालिकेने कारवाई करून हटवले अनधिकृत फ्लेक्स प्रकरणी गुन्हे दाखल करणार; आयुक्त यशवंत डांगे यांचा इशारा

■ जनप्रवास प्रतिनिधी




अहिल्यानगर : महानगरपालिका क्षेत्रात परवानगी न घेता मोठ्या प्रमाणात बॅनर, फलक, मोठे जाहिरात बोर्ड लावल्याचे प्रकार समोर आले आहेत. अशा अनधिकृत फलकांवर व फ्लेक्स बोर्डवर महानगरपालिके मार्फत कारवाई सुरू करण्यात आली आहे. काही महिन्यांपूर्वी महानगरपालिका प्रशासनाने गुन्हे दाखल केले होते. दंडही वसूल करण्यात आला होता. आता पुन्हा फलक हटवण्याची कारवाई सुरू करण्यात आली असून, गुन्हेही दाखल करणार असल्याचे आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी सांगितले.

अनधिकृत फ्लेक्स बोर्ड संदर्भात कारवाईसाठी न्यायालयाने आदेश दिलेले आहेत. या पार्श्वभूमीवर महानगर पालिका प्रशासनामार्फत सातत्याने आढावा घेऊन अनधिकृत फलकांवर कारवाई करण्यात आली आहे. शहरातील प्रमुख रस्ते, चौक अशा ठिकाणी काही संस्था, नागरिक, व्यावसायिक आस्थापना, राजकीय कार्यकर्ते महानगरपालिकेची परवानगी न घेता फ्लेक्स बोर्ड लावत आहेत.

महानगरपालिकेने अशा अनधिकृत फलकांवर कारवाई सुरू केली आहे. मंगळवारी सुमारे ४० पेक्षा अधिक फलक कारवाई करून हटवण्यात आले आहेत. ही मोहीम अशीच सुरू राहणार आहे.

# नगर तालुक्यातील हॉटेल व्यावसायिकाची चाळीस लाखांची फसवणूक

■ जनप्रवास प्रतिनिधी

अहिल्यानगर : गुजरातमधून हवाला फंडींगव्दारे २० कोटींचं कॅश लोन मिळवून देतो, असे आमिष दाखवून येथील एका हॉटेल व्यवसायिकाची तब्बल ४० लाख रूपयांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. विशेष म्हणजे, अहमदाबाद येथे एका बनावट सीएमएस' वाहनातून व्यवहार करण्याच्या बहाण्याने व्यवसायिकाच्या डोक्यावर बंदूक लावून धमकावले.

याप्रकरणी रूईछत्तीसी (ता. अहिल्यानगर) येथील व्यवसायिक विशाल रमेश भांबरे (वय ३३) यांनी सोमवारी (२१ जुलै) कोतवाली पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.भांबरे यांनी फिर्याद दिली आहे की, त्यांनी २०१८ मध्ये पिरामल फायनान्सकडून लोन घेतले होते. त्यावेळी लोनचा हप्ता घेण्यासाठी येणार्या जयंत मधुकर कंठाळे (रा. हातमपुरा, अहिल्यानगर) याच्याशी ओळख झाली. ओळखीच्या माध्यमातून २० कोटींच्या फंडींगसाठी आधी काही पैसे द्यावे लागतील असे सांगून वेळोवेळी सागर उर्णेला १० लाख तसेच गुजरात येथील अनुराग पटेल यांची भेट घेतली त्यानंतर कोर्ट आवारात २० लाख रुपये पुन्हा अहमदाबादमध्ये बोलावून, सीएमएस' वाहन आणि चार बनावट बंदूकधारी गार्डच्या उपस्थितीत डोक्यावर बंदूक ठेवून १० लाख रूपये जबरदस्तीने घेतले गेले. पैसे दिल्यानंतर संशयित आरोपींनी लोन व्यवहार रद्द झाला असे सांगत पळ काढला असल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे.

पोलिसांनी जयंत मधुकर कंठाळे, सागर ऊर्णे, योगेश घुले, गणेश शिंदे, अनुराग पटेल व अहमदाबादमधील अनोळखींविरूध्द गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास पोलीस करीत आहेत.

## सथ्था कॉलेज ऑफ फार्मसीचे २३ विद्यार्थ्यांची बहुराष्ट्रीय कंपनीत निवड

■ जनप्रवास प्रतिनिधी

अहिल्यानगर : येथील आनंदधाम रोडवरील आबासाहेब काकडे शैक्षणिक समुहाच्या एन. एन. सथ्था कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये मायलान (विआत्रीस) लॅबोरेटोरीज लिमिटेड या प्रतिष्ठित बहुराष्ट्रीय कंपनीतर्फे रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाद्वारे अंतिम वर्षात शिकत असलेल्या २३ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली असल्याची माहिती राष्ट्रीय शिक्षण मंडळाचे सचिव डॉ. शिवाजीराव काकडे यांनी प्रसारमाध्यमांमार्फत दिली.

या निवड प्रक्रियेमध्ये अत्यंत काटेकोर आणि स्पर्धात्मक टप्प्यांचा समावेश होता, ज्यामध्ये लेखी चाचणी, गटचर्चा आणि वैयक्तिक मुलाखतीचा समावेश होता. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना कंपनीच्या नाशिक, इंदूर आणि छत्रपती संभाजीनगर येथील शाखांमध्ये क्वालिटी अशुरन्स, क्वालिटी कंट्रोल आणि प्रॉडक्शन विभागात नोकरी देण्यात येणार आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल विद्यार्थ्यांचे, प्राचार्यांचे आणि सर्व प्राध्यापकवर्गाचे संस्थेचे सचिव डॉ. शिवाजीराव काकडे, मा. जिल्हा परिषद सदस्या हर्षदाताई काकडे, विश्वस्त पृथ्वीसिंह काकडे,भाग्यश्रीताई काकडे पाटील आणि मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. लक्ष्मण बिटाळ यांनी हार्दिक अभिनंदन केले आहे.

# गणेश विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची गौरी गौतम पोल्ट्री फार्मला शैक्षणिक क्षेत्रभेट

■ जनप्रवास प्रतिनिधी

राहता : तालुक्यातील गणेशनगर येथील रयत शिक्षण संस्थेच्या गणेश विद्यालयातील विद्यार्थ्यांची गुरुकुल अंतर्गत खंडोबाची वाकडी येथील गौरी गौतम पोल्ट्री फार्मला व्यावसायिक शिक्षणाचा परिचय होण्यासाठी क्षेत्रभेट आयोजित केली होती

सदर क्षेत्रभेट वाकडी शिवारातील गुगळ परिवाराच्या गौरी गौतम पोल्ट्री फार्म या पोल्ट्री फार्मवर कुक्कुटपालन व्यवसाय पाहण्यासाठी व मुलांना शालेय वयातच व्यवसायाचे धडे मिळावे व्यवसायाचे महत्त्व समजावं यासाठी आयोजित केली होती. यावेळी पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.संदीप आहेर यांनी पक्षांचे आरोग्य व काळजी कशी घ्यावी याविषयी मार्गदर्शन केले जर कुक्कुटपालन हा व्यवसाय प्रामाणिकपणे आणि जिद्दीने केला तर शेतीपूरक व्यवसायाला या व्यवसायाची जोड मिळू शकते शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम बनू शकतो.भारतातील नागरिकांनी अंडी सेवन करायला पाहिजे म्हणून संडे हो या मंडे रोज खाऊ अंडे असे आव्हान विद्यार्थी व पालकांना केले

यावेळी पोल्ट्री फार्मचे प्रमुख कारभारी घोगळ , रवींद्र कारभारी घोगळ, किरण कारभारी घोगळ यांनी विद्यालयातील सर्व सेवकांचा सन्मान करून विद्यार्थ्यांच्या चहा -नाश्त्याची व्यवस्था केली . विद्यालयाचे मुख्याध्यापक वसावे के.के.सर यांनी घोगळ परिवाराने क्षेत्रभेटीला येण्यासाठी परवानगी दिली आणि विद्यार्थ्यांना मिष्ठान्न भोजन दिले याबद्दल घोगळ परिवाराला धन्यवाद देऊन आभार मानले. दुपारच्या सत्रात वनभोजन झाल्यानंतर सांस्कृतिक विभाग प्रमुख भांगरे मॅडम यांनी वेगवेगळ्या प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रम घेतले यामुळे विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित झाला.



यावेळी गुरुकुल विभाग प्रमुख कैलास भोये सर व विश्वेश्वर लाव्हारकर सर यांनी सर्वांचे आभार मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले.

# भाविकांच्या सोयीसाठी १७ तास राबले पोलिस व नगरपंचायत प्रशासन

■ जनप्रवास तालुका वार्ताहार

नेवासा : ''कामिका एकादशी यात्रोत्सवानिमित्त नेवासा पोलिस प्रशासन, नगरपंचायत, आरोग्य विभाग, विद्युत विभाग व संत ज्ञानेश्वर मंदिर संस्थानाने केलेल्या योग्य नियोजनामुळे यात्रा उत्सव उत्साहात संपन्न झाला.

कामिका आषाढी एकादशी निमित्त संत ज्ञानेश्वर मंदिरात पैस' खांबाच्या दर्शनासाठी लाखोंच्या संख्येने भाविक हजेरी लावतात. या यात्रा उत्सवात गर्दीवर नियंत्रण मिळविणे, वाहतुकीचे नियोजन, मंदिर परिसर, दिंड्या, पालखी सोहळ्यासोबत आलेल्या वारकऱ्यांसह येणाऱ्या प्रत्येक माऊली भक्ताला सुरक्षित वाटावे यासाठी नेवासा पोलीसांनी पोलिस निरीक्षक धनंजय जाधव यांनी विविध पथके प्रत्येक तैनात केली होती.यामुळे वाहतूक कोंडी न होता भाविकांना दर्शन सुलभ झाले.



भाविकांच्या सोयीसाठी शहरातील सर्व प्रशासकीय यंत्रणेने यात्रा काळात केलेले काम उल्लेखनीय असून शहरातील तरुणांनी ही विविध ठिकाणी स्वयंसेवकांची भूमिका रवबल्याने यात्रा उत्सव उत्साहात पार पडला.
- भैय्या कावरे जनसंपर्क अधिकारी संत ज्ञानेश्वर मंदिर संस्थान नेवासा

वारी काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.आमचा प्रत्येक अधिकारी, कर्मचारी हा तहान, भूक, विश्रांती न घेता सेवा बजावत असल्याचे नेवाशाचे पोलीस निरीक्षक धनंजय जाधव यांनी सांगीतले.

पोलिस यंत्रणेच्या खांद्याला खांदा लावून काम करणाऱ्या नगरपंचायत प्रशासनाचे सत्तरहून अधिक कर्मचारी भाविकांच्या सोयीसाठी शहरात विविध उपाययोजना करण्यासाठी तैनात असल्याचे पाहायला मिळाले.भाविकांना पायी मंदिराकडे जाण्यात अडथळा होवू नये यासाठी ठिकाणी वाहनांसाठी रस्ता बंद करण्याचे काम, जेंतूनाशकाची विविध ठिकाणी फवारणी, यात्रा मार्गावर स्वच्छता तसेच यात्रा उत्सवाच्या दुसऱ्या दिवशी मार्गावर केलेले स्वत:चा अधियानात तीन ते चार टन कचरा गोळा करून स्वच्छता करण्यात आली. यामध्ये नगरपंचायत अधिकारी कार्यालयीन कर्मचारी तसेच आरोग्य व पाणीपुरवठा विभागतील सत्तर कर्मचारी दिवसभर तैनात होते.

नेवासा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वतीने नेमणूक केलेल्या पथकाने सहाशे भाविकांना वैद्यकीय सेवा दिली महावितरणचे सहायक अभियंता वैभव कानडे, रवी कांबळे, निलेश गायकवाड, भैय्या शेख यांनी शहर व मंदिर परिसरातील वीज पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी विशेष लक्ष दिले.

त्याच प्रमाणे मंदिर देवस्थान व शहरातील तरुणांनी ठीक ठिकाणी स्वयंसेवकांची भूमिका राबविल्याने भाविकांचे दर्शन सुकर होवून यात्रा उत्सव ही उत्सवात संपन्न झाला.

# ६ ग्रामपंचायतींसाठी १.५ कोटींचा निधी मंजूर

## विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे यांच्या पाठपुराव्याला यश

■ जनप्रवास प्रतिनिधी

जामखेड : केंद्र शासनाच्या पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानातून कर्जत तालुक्यातील भांबोरा, सिध्दटेक, गुरव पिंपरी आणि जामखेड तालुक्यातील हळगाव, साकत, अरणगाव या सहा ग्रामपंचायतींच्या कार्यालयीन इमारती व नागरी सुविधा केंद्र उभारण्यास सरकारने १ कोटी ५० लाख रूपयांचा निधी मंजूर केला आहे. सदरचा निधी प्राप्त व्हावा याकरिता विधानपरिषद सभापती प्रा राम शिंदे यांनी सरकारकडे पाठपुरावा केला होता. त्यांच्या या प्रयत्नांना यश मिळालं आहे. या निधीमुळे गावपातळीवर दर्जे दार पायाभूत सुविधा निर्माण करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.



नागरिकांना गावपातळीवर एका छताखाली आवश्यक शासकीय सेवा मिळाव्यात यासाठी केंद्र सरकारने नवीन ग्रामपंचायत इमारती व 'सीएससी रूम' बांधण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार सरकारने महाराष्ट्रातील ५०० ग्रामपंचायतींच्या प्रस्तावास मंजूरी दिली आहे. यामध्ये जामखेड तालुक्यातील हळगाव, साकत, अरणगाव तर कर्जत तालुक्यातील भांबोरा, सिध्दटेक, गुरव पिंपरी या सहा ग्रामपंचायतींचा समावेश आहे. प्रत्येक ग्रामपंचायतला २५ लाख रूपये निधी मंजुर करण्यात आला आहे. यामध्ये ग्रामपंचायत इमारतीसाठी वीस लाख तर नागरी सुविधा केंद्रासाठी पाच लाख रूपये मिळणार आहेत.

कर्जत–जामखेडच्या ग्रामीण भागात दर्जेदार पायाभूत सुविधा निर्माण व्हाव्यात यासाठी सरकारकडे माझा नेहमी पाठपुरावा सुरु असतो. केंद्र सरकारच्या पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानातून निधी मिळावा यासाठी माझा पाठपुरावा सुरु होता. सरकारने त्याची दखल घेतली आणि माझ्या मतदारसंघातील ६ ग्रामपंचायतींसाठी दीड कोटीचा निधी मंजूर केला आहे. सदरचा निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे–पाटील तसेच केंद्र व राज्य सरकारचे मनापासून आभार !
– प्रा राम शिंदे, सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद

ग्रामपंचायतींच्या कार्यालयीन सुविधांबरोबरच डिजिटल सेवांचा प्रसार आणि नागरिकांसाठी सोयीसुविधा वाढवण्यासाठी योजनेचा फार मोठा फायदा होणार आहे. विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे यांच्या नेतृत्वात कर्जत जामखेड मतदारसंघातील गावांमध्ये 'स्मार्ट ग्रामपंचायती' साकारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

# राहुरी रेल्वे स्थानकावर महत्त्वाच्या गाड्यांना थांबा द्यावा – रेल्वे सल्लागार समितीकडून निवेदन

■ जनप्रवास प्रतिनिधी

राहुरी : मध्य रेल्वेच्या पुणे विभागीय सल्लागार समितीची बैठक नुकतीच पार पडली असून, या बैठकीत राहुरी रेल्वे स्थानकावर महत्त्वाच्या रेल्वेगाड्यांना थांबा मिळावा, यासाठी पुणे येथील सल्लागार समितीच्या सदस्यांनी विभागीय रेल्वे वाणिज्य व्यवस्थापक अनिल कुमार पाठक यांना निवेदन दिले.

या शिष्टमंडळात सल्लागार समितीचे सदस्य रणजीत श्रीगोड व डॉ. गोरख बारहाते, तसेच ग्राहक पंचायतीचे दत्तात्रय काशीद सहभागी होते. या वेळी राहुरी स्थानकाचे महत्त्व स्पष्ट करताना त्यांनी सांगितले की, हे स्थानक दौंड – मनमाड रेल्वे मार्गावरील एक महत्त्वाचे स्थानक असून येथे महात्मा फुले कृषी विद्यापीठ, साखर कारखाने आणि सुमारे १५ गावे याच परिसरात आहेत.

माजी खासदार बापूसाहेब तनपुरे यांनी यापूर्वीच राहुरी स्थानकाच्या दुर्लक्षित विकासावर नाराजी व्यक्त करत आंदोलनाचा इशारा दिला होता. ''जिथे आंदोलन होते, तिथेच गाड्यांना थांबा मिळतो.

मग आम्हालाही रेल रोको आंदोलन करावे लागेल का?'' असा सवाल करत त्यांनी रेल्वे प्रशासनाला सजगतेचा इशारा दिला आहे.

निवेदनात साईनगर–दादर, साईनगर–पंढरपूर, पुणे–अमरावती, महाराष्ट्र एक्स्प्रेस या गाड्यांना राहुरी येथे थांबा देण्याची प्रमुख मागणी करण्यात आली आहे. तसेच भविष्यात शनिशिंगणापूर रेल्वे प्रकल्प कार्यान्वित झाल्यास राहुरी स्थानकाचे महत्त्व अधिक वाढणार असल्याचेही नमूद करण्यात आले.

नवीन पॅसेंजर व डेमू गाड्या सुरू कराव्यात, अशीही मागणी ग्राहक पंचायतीचे संघटक दत्तात्रय काशीद यांनी केली आहे. थांब्याच्या मागणीचा प्रस्ताव लवकरच वरिष्ठ कार्यालयाकडे सादर करण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

# प्रवरा बँकेच्या विळदघाट शाखेमुळे औद्योगिक व व्यापारी क्षेत्राला मिळणार आधार : राधाकृष्ण विखे पाटील

## प्रवरा बँकेच्या विळदघाट शाखेचे उद्घाटन

■ जनप्रवास प्रतिनिधी

अहिल्यानगर : सहकारी बँकिंग क्षेत्रात प्रवरा सहकारी बँकेने प्रगतीचा मोठा टप्पा गाठला आहे. विळदघाट येथे नव्याने सुरू झालेली बँकेची शाखा अहिल्यानगरच्या औद्योगिक व व्यावसायिक क्षेत्राच्या यशस्वी वाटचालीत महत्त्वपूर्ण भागीदारी करेल, असा विश्वास जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केला.

प्रवरा सहकारी बँकेच्या विळदघाट येथील नव्या शाखेचे उद्घाटन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते झाले.त्यावेळी ते बोलत होते . यात्रसंगी सौ. शालिनी विखे पाटील, माजी आमदार नंदकुमार झावरे, वसंतराव कापरे, बँकेचे चेअरमन डॉ. भास्करराव खर्डे, व्हा. चेअरमन मच्छिद्र थेटे, सीईओ सौरभ बालोटे, संचालक मंडळातील सदस्य तसेच पद्मश्री डॉ. विखे पाटील फाउंडेशनचे डायरेक्टर डॉ. अभिजीत दिवटे, डॉ. पांडुरंग पवार व महाविद्यालयाचे प्राचार्य उपस्थित होते. विळदघाट शाखा अहिल्यानगरच्या




व्यापारी, उद्योजक व छोट्या व्यावसायिकांसाठी आधार ठरेल. अहिल्यानगरच्या औद्योगिक व व्यापारी क्षेत्राला समृद्ध परंपरा लाभली आहे. नागापूर औद्योगिक वसाहतीच्या अगदी जवळ ही शाखा सुरू झाल्यामुळे उद्योजकांसाठी दैनंदिन आर्थिक व्यवहारांचे विश्वासार्ह ठिकाण निर्माण झाले आहे, असेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे स्वागत बँकेचे चेअरमन डॉ. भास्करराव खर्डे यांनी केले.

# ऊसतोडणी मजूर कामगार पाल्यांच्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

■ जनप्रवास प्रतिनिधी

पाथर्डी : महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच पशुसंवर्धन आणि पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त ऊसतोडणी मजूर व वाहतूक कामगारांच्या पाल्यांना शालेय साहित्य व मिठाईचे वाटप जि.प.प्रा. शाळा भारजवाडी हनुमाननगर येथे देवनाथ फाऊंडेशनच्या वतीने करण्यात आले ऊसतोडणी मजूर वाहतूक कामगारांच्या आरोग्य व शैक्षणिक विषयांवर सातत्याने जागरूकता निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या देवनाथ फाऊंडेशन या सामाजिक संस्थेच्या वतीने भगवानगड परिसरात अनेक सेवाभावी उपक्रम आयोजित



केले जातात ऊसतोडणी मजूर व वाहतूक कामगारांच्या एकुणच अनेक प्रकारच्या प्रश्नांवर उपरोक्त दोन्ही नेत्यांनी सकारात्मक भूमिका घेत महत्वपूर्ण योजना प्रत्यक्ष अंमलात आणण्यासाठी ऊसतोडणी मजूरांचे आगार म्हणून प्रसिद्ध असलेल्या भगवानगड परिसराच्या वतीने विनंती करणार असल्याचे प्रतिपादन देवनाथ फाऊंडेशनचे प्रमुख डॉ ज्ञानेश्वर दराडे यांनी केले.

विशेषत:ऊसतोडणी मजूरांच्या आरोग्यासंबधी प्रत्यक्ष कृती आराखडा राबविण्याची गरज असल्याचे मत व्यक्त करताना यापूर्वी घेतलेल्या विविध मोफत आरोग्य तपासणी शिबिर व इतर कार्याचा आढावा त्यांनी घेतला वही पेन आणि इतर शालेय साहित्य व मिठाई मिळाल्याने विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित झाला होता यात्रसंगी राजन ढोले सुखदेव बटुळे मुख्याध्यापक भरत शिरसाट शंकर बनसोडे महादेव जगताप उपस्थित होते.

# पुणतांबा येथील पंचदिवशीय कीर्तन महोत्सवाची काल्याच्या कीर्तनाने सांगता

■ जनप्रवास वार्ताहार

पुणतांबा : संत शिरोमणी सावता महाराज यांच्या ७३० व्या पुण्यतिथी निमित्त येथे आयोजित केलेल्या पंचदिवशीय कीर्तन महोत्सवाची काल्याच्या कीर्तनाने आज मोठ्या उत्साहात सांगता झाली यावेळी हजारो भाविक उपस्थित होते

सावता महाराज पुण्यतिथी निमित्त सावता महाराज मंदिर समितीच्या वतीने अखंड हरिनाम सप्ताह व पंच दिवसीय कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये कैलास गिरी महाराज ज्ञानेश्वर महाराज जवळेकर अनिल महाराज तुपे लक्ष्मण महाराज नांगरे यांचे कीर्तन झाले या कार्यक्रमास मोठ्या संख्येने भाविक



उपस्थित होते.

बुधवारी पुण्यतिथी निमित्ताने समितीच्या वतीने सकाळी गावातून सावता महाराज प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात आली होती यामध्ये सावता महाराज यांची वेशभूषा केलेल्या अशोक बोरबने यांनी हुबेहूब सावता महाराज साकारल्याने मिरवणुकी मोठे आकर्षण ठरले यानंतर मुक्ताई ज्ञानपीठाचे महंत रामानंद गिरी महाराजांचे काल्याचे किर्तन झाले. त्यांनी या कार्यक्रमाचे स्वरूप वाढवल्याने समितीचे कौतुक केले आणि दक्षिणकाशी म्हणून ओळख असलेल्या पुणतांब्याला धार्मिक क्षेत्रात मोठे महत्त्व असून या क्षेत्राचे महत्त्व वाढवण्यासाठी हरिनाम सप्ताह तसेच धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे आवाहन रामानंद गिरी महाराज यांनी केले महाप्रसाद वाटपाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# सेवा फाऊंडेशन तर्फे आलेगावच्या विद्यार्थ्यांना शिवसृष्टी दर्शन

■ जनप्रवास प्रतिनिधी

न्हावरे : श्री भैरवनाथ माध्य. व उच्च माध्य. विद्यालय, आलेगाव पागा येथील इयत्ता पाचवी ते दहावी मध्ये शिक्षण घेत असलेल्या एकूण ३५ विद्यार्थ्यांना आलेगाव पागा येथील सेवा फाऊंडेशन तर्फे आंबेगाव पुणे या ठिकाणी नवीनच सुरू करण्यात आलेल्या शिवसृष्टी दर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

छत्रपतींचा इतिहास केवळ अफजलखान वधापासून शाहिस्तेखानाची बोटे तोडण्यापुरता मर्यादित न राहता, हिंदवी स्वराज्याचे निर्माते म्हणून महाराजांचे समाज घडवण्यामध्ये बहुमूल्य योगदान विद्यार्थ्यांना शिवसृष्टी च्या माध्यमातून दृकश्राव्य स्वरूपात पाहता आले. त्या काळचे काही थरारक प्रसंग मुलांना अनुभवता आले. शिवसृष्टीतील विविध प्रदर्शनांतून महाराजांच्या कार्याचे, त्यांच्या सहसाचे दर्शन तळागाळातील जनतेपर्यंत



पोहोचवावे हाच यामागचा उद्देश होता. सेवा फाऊंडेशन ने ग्रामीण विद्यालयातील विद्यार्थ्यांना मोठी संधी उपलब्ध करून दिली. शिवसृष्टी दर्शन घडवण्यासाठी फाउंडेशनचे अध्यक्ष श्री. सदाशिव बेनके, सचिव श्री. भरत रासकर, उपाध्यक्ष श्री. रमेश वाघचौरे, खजिनदार श्री. रोहन भोसले आणि सदस्य श्री. सागर भोसले, श्री. हेमंत ढोले, श्री. उत्तम जांभळकर, श्री. सतीश गुंजाळ, सौ. सारिका वाघचौरे यांचे मोलाचे सहकार्य होते. तसेच यापूर्वी ही श्री भैरवनाथ विद्यालयातील गरीब गरजू विद्यार्थ्यांना आर्थिक मदत केलेली असून भविष्यात विद्यार्थ्यांना अभासिका सुरू करण्याचा मानस आहे असे फाऊंडेशन तर्फे सांगण्यात आले. रविंद्र चौधरी , नितीन गरुड ,देविदास कंठाळेया शिक्षकांनी सहलीचे नियोजन उत्तम प्रकारे केले. सेवा फाऊंडेशन सर्व सदस्य हे केंद्र शासन व राज्य शासन यामध्ये विविध पदावर कार्यरत आहेत. गावातील शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि इतर कार्यात फाऊंडेशन नेहमीच अग्रेसर असते. गावातील ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी नेहमीच नव नवीन उपक्रमांचे आयोजन फाऊंडेशन मार्फत केले जाते. मागील वर्षी ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी विविध विषय घेऊन व्याख्यानमालेचे आयोजन सुद्धा फाउंडेशन मार्फत करण्यात आले होते.विद्यालयाचे प्राचार्य तुकाराम बेनके यांनी सर्वांचे आभार व्यक्त करून धन्यवाद दिले.

# आषाढी वारीसाठी पंढरपूरला गेलेल्या शिवछत्रपतींच्या पादुका शिवनेरीवर स्वस्थानी

■ जनप्रवास प्रतिनिधी

ओतूर : संतश्रेष्ठ माऊली श्री ज्ञानेश्वर महाराजांनी प्रारंभ केलेल्या भागवत परंपरेच्या दृष्टीने आत्यंतिक महत्वाच्या समजल्या जाणाऱ्या पंढरपूरच्या आषाढी वारीत सहभागी होण्यासाठी शिवनेरीवरून गेलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पादुकांचे शिवनेरीवर स्वस्थानी आगमन झाले.श्री शिवजन्मभूमी स्थानी पादुकांच्या साक्षीने शिववंदना अभिवादन झाल्यानंतर, मुख्य पुजारी सोपान दुराफे यांनी शिवाई देवीच्या चरणांशी श्रींच्या पादुकांना स्थापित केल्या. यात्रसंगी उपस्थित बालगोपालांच्या हस्ते शिवाई देवी व शिवाजी महाराजांच्या आरतीने या वर्षीच्या सोहळ्याची सांगता झाली.

महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजाभिषेकाच्या ३५१ व्या वर्धापन वर्षात, ज्येष्ठ शुद्ध एकादशीस शिवनेरीहून निघालेल्या शिवरायांच्या या पादुका राजाभिषेक उत्सवासाठी राजधानी रायगडास गेल्या होत्या. तेथून आपल्या निर्धारित मार्गाने पायीच प्रवास करत आषाढी एकादशीस शिवबा–विठोबा भेटीचा सोहळा पार पडल्यानंतर हिंदवी स्वराज्याच्या उभारणीत हौतात्म्य पावलेल्या आपल्या सहकाऱ्यांना दर्शन भेट द्यायला गेल्या होत्या. पावनखिंड, विशाळगड, नेसरी, कापशी, कुरुंदवाड, वडगाव, तळबीड, उमरठ मध्ये आपल्या पराक्रमी सहकारी मावळ्यांशी हितगुज केल्यानंतर जुन्नरखालील बारा मावळांचा प्रवास करुन भीमाशंकर ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेवून शिवजन्मभूमीत परतल्या. शिवछत्रपती पालखी सोहळ्याचे समन्वयक डॉ.संदीपराज महिंद गुरूजी यात्रसंगी बोलताना म्हणाले,कोरोनाचे बिकट संकट असतानाही आपल्या नियमित प्रथा–परंपरा जपताना २०२० व २०२१ लाही शिवरायांचा पालखी सोहळा रायगडाहून पायीच पंढरपूरला विठुरायाच्या भेटीस गेला होता. आषाढी वारीत आपली पायी चालण्याची परंपरा प्रतिकूलतेतही अखंडितपणे जपलेला हा सोहळा आता कात टाकून नव्या जोमाने, मोठ्या



उत्साहात पंढरीची वारी करुन परतला आहे.

आषाढी वारीच्या निमित्ताने भक्तिसागरात सामील होण्यासाठी निघालेल्या या शक्तिपरंपरेतील शिवरायांच्या पादुका दरवर्षी शिवनेरी, संग्रामदुर्ग, लाल महाल, मल्हारगड,पुरंदर, रायरेश्वर असा प्रवास करून रायगडला जातात. तेथून 'नाम घेता वाट चाली || यज्ञ पाऊला पाऊली ||' या भावाने पायी वाटचाल करत पंढरपूरची आषाढी वारी पूर्ण केल्यानंतर दुर्ग तासगाव, दुर्ग सांगली,पन्हाळा, पावनखिंड,विशाळगड,राजगड, प्रचंडगड, सिंहगड, वितंडगड, लोहगड, इंदुरी, संग्रामदुर्ग मार्गाने पुढील साडे दहा महिन्यांच्या कायम वास्तव्यासाठी या पादुका शिवजन्मभूमीत परत येत असतात.

### शिव–समर्थ भेट सांगलीत पहिल्यांदाच संपन्न

गुरूपौर्णिमेच्या पावन मुहूर्तावर सांगलीच्या कोटणीस आश्रमात यावर्षी पहिल्यांदाच इतिहास घडून समर्थ श्रीरामदास स्वामी महाराजांनी वापरलेल्या पादुकांचा व आषाढी वारी करुन आलेल्या छत्रपती श्रीशिवरायांच्या पादुकांचा अगदी हृद्य भेट सोहळा पार पडला.

शिवछत्रपतींच्या पादुकांच्या पालखी सोहळ्याचे हे यंदाचे ११ वे वर्ष तर परंपरेचे ३१ वे वर्ष होते.

शिवनेरीवरील शिवाई देवीच्या चरणांशी शिवछत्रपतींच्या पादुका पुन:स्थापित करण्याची सेवेची संधी यावर्षी बारा मावळातील पौड खोऱ्याला व पिंपरी गावाला प्राप्त झाली होती. रणजीत नाणेकर व अजय दूरकर यांच्या नेतृत्वात बालगोपालांच्या गटाने यावर्षीच्या वारीचा समारोप करताना विशेष मेहनत घेतली.

श्रींच्या पालखी सोहळा समापनास यशस्वी करण्यासाठी स्थानिक पातळीवर गौरीशंकर सामाजिक प्रतिष्ठानचे संदीप ताजणे, हर्षवर्धन कुऱ्हे,अक्षय कुटे,सूरज खत्री,शिवराज संगनाळे यांनी सक्रीय सहभाग घेत परिश्रम घेतले.तर आवश्यक त्या परवानग्या मिळण्यासाठी पुरातत्व विभागाचे अधिकारी बाबासाहेब जंगले, दाभाडे, जुन्नर पोलीस ठाण्याचे अधिकारी लोहकरे, विनोद पवार, अमोल शिंदे तसेच श्री शिवाई देवी मंदिराचे पुजारी पुजारी सोपान दुराफे,जुन्नरचे उपवनसंरक्षक अमोल सातपुते,वनपरिक्षेत्र अधिकारी प्रदीप चव्हाण यांच्यासह इतर शासकीय अधिकारी स्थानिक नागरिक श्री शिवाई देवी मंदिर संस्थान,कुसूरचे सर्व विश्वस्त आणि कुसूर ग्रामस्थांचे सहकार्य लाभले. श्री शिवछत्रपतीच्या आषाढी वारीच्या विगत ३१ वर्षांत निरंतर प्रवासात कधीही शक्य न झालेला नवा पायंडा रूजविणाऱ्या या अनुपम सोहळ्यासाठी ह.भ.प संजयबुवा कोटणीस, शिवभक्त बापू हरदास व अवधूत मिरजकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

# फक्त पैसा कमवूनच सुख मिळत नाही



जर माणसाने स्वत:लाच तुला काय हवे असा प्रश्न विचारला तर उत्तर देता येईल सुख आणि शांती. माणसाला वाटते आपण जर यश मिळवले तर शांत होऊ. परंतु हे खूप मिळवल्यानंतरही जेव्हा त्याला सुख-शांती मिळत नाही तेव्हा कळते, आपल्या मानसांत राहण्यातच खरे सुख आहे.

जरा जास्त वेगाने धावपळ करून आणखी पैसा जमवायला हवा. परंतु फक्त पैसा कमावूनच सुख मिळत नाही कारण ज्या वस्तूंमध्ये माणूस सुख शोधत असतो त्यांच्यात ते नसतेच. संसारिक सुख हेच खरे असते.

जर आपण मनातून सुखी, आनंदी असू तर आपल्याला वाळवंटातही फुले उमलल्यासारखी वाटतील आणि आपण दु:खी असलो तर आपल्याला फुलांच्या बागेतही फक्त काटेच दिसून येतील. आपण आतून आनंदी असलो तर बाहेरचे रणरणते ऊनही आपल्याला आल्हाददायक वाटेल आणि दु:खी असलो तर बाहेरची बहरलेली वनश्रीही दुष्काळी भागासारखी वाटल कारण जसे मनात असते तसेच सृष्टीत दिसत असते. मनाला जाणवत असते. यातून एकच गोष्ट सिद्ध होते ती म्हणजे सुख बाहेरून नव्हे तर आतून बाहेर येत असते. जेव्हा आपण गाढ, सुखद झोपेतून जागे होतो तेव्हा ताजेपणा फ्रेशनेस जाणवतो कारण यश, पैसा मिळवणे हा ऊर्जेचा बाह्यप्रवास असतो तर झोप ही ऊर्जेची अंत्ययात्रा असते. बाहेरचे जेवढे मोठे आहे तेवढेच मोठे ब्रम्हांड आतही असते. आपण दोहोंच्या मध्यभागी उभे असतो. अशावेळी बाहेरचा प्रवास हा फक्त प्रवासच प्रवास असतो पण आपण कोठेच पोहोचत नाही कारण आपले पोहोचण्याचे ठिकाण बाहेर नसून आत आहे. दुसरी गोष्ट म्हणजे आपण समजतो की, आपण सुखाच्या शोधात भरकटत आहोत. ते चुकीचे आहे.

माणसाने सुखाच्या शोधात नव्हे तर आनंदाच्या शोधात फिरायला हवे. परंतु आपले पंतभूतांनी बनलेले शरीर इंद्रियांशी निगडीत आहे. त्यामुळे त्यांच्या सुखालाच आपण सुख समजतो. हा देह म्हणजे फक्त एक वस्त्र आहे. त्यामुळेच जेव्हा आपला आतील प्रवास सुरू होतो तेव्हा हे बाहेरचे पदर हळूहळू गळून पडतात व आपण आपले सुखशांतीचे आगर असलेले स्वरूप ओळखू लागतो.

# आपलं घर सुंदर असावं असं प्रत्येकालाच वाटतं

आपलं घर सुंदर असं प्रत्येकालाच वाटत असतं. ते सजवण्यासाठी आपण तऱ्हेतऱ्हेचे उपाय करत असतो. एखाद्या वेळेस जरा वेगळं काही करायचं असेल तर रंगांच्या मदतीने, आपल्या कल्पनेने, भिंतींवर फुले-पाने, नदीचा किनारा, सरोवर यासारखे आकार देता येऊ शकेल. छोट्या घरांनाही योग्य रंगांच्या वापराने मोठे आणि सुंदर बनवता येऊ शकते. तसेच सोफे-कुशन आणि खिडकी-दरवाज्याचे पडदे यांची निवडही भिंतींच्या रंगांशी मिळती-जुळती असेल तर तुमच्या कल्पनाशक्तीला नक्कीच दाद मिळेल.

भिंतीच्या रंगांबरोबरच घरातील बैठकव्यवस्था थोडी बदलली तर, घराला वेगळेपणा येईल. महागड्या फर्निचरने खोली भरण्यापेक्षा जमिनीवरच गादी अंथरुन बैठक तयार करण्यामुळे एक वेगळा लूक येईल.

ड्रॉईंगरुमचा विचार केला या खोलीच्या भिंतीवर तुम्ही 'ओपन कॅन्हव्हास' बनवू शकतात. आपली कल्पनाशक्ती विस्तारून मनातल्या एखाद्या कोपऱ्यात दडलेले चित्र तुम्ही या भिंतीवर चितारू शकतात. यावर एखादे छानदार झाड रेखाटावे. या चित्राला पुरक असा रंग इतर भिंतींना द्यावा. तसेच खिडकी -दरवाजाचे पडदे, लाईट यांची अॅरेजमेंट अशी करावी की, बसणाऱ्याला कडक उन्हात झाडाच्या शांत सावलीत बसल्याचा आभास होईल. यामध्ये तुम्ही बरेच प्रयोग करू शकता. तुमच्या बोटांमध्ये रंग वापरण्याची जादू असेल, तर हे काम तुम्ही सहज करू शकतात किंवा एखाद्या कलाकाराकडून करून घेऊ शकता.



बैठक सजवण्यासाठी आरामदायक आणि महागडे फर्निचर पाहुण्यांना नक्कीच आकर्षित करतात. परंतु, एक आणखी पर्याय आहे. त्याला 'लो-सिटींग' म्हणतात. ही बैठक व्यवस्था चांगलीच आरामदायक वाटते. तुम्ही निरिक्षण केले असेल तर कलाक्षेत्राशी निगडीत असलेल्या बऱ्याच लोकांच्या घरात 'लो-सिटींग' बघायला मिळते. या बैठक व्यवस्थेच्या मदतीने तुम्ही संपूर्ण खोलीची सजावट बदलू शकता.

खोलीच्या मुख्य भिंतीला गडद रंग द्यावा. पडदे, कुशन कव्हर्स यांचे रंग त्यानुसार ठेवावे. हे कॉम्बीनेशन खोलीला वेगळेच रुप देते. या बैठक व्यवस्थेचा उपयोग फक्त बसण्यासाठीच नाहीतर झोपण्यासाठीही करता येतो. 'लो-सिटींग'साठी गद्या -उशा नवीन घ्याव्यात किंवा घरातील जुन्या गाद्या -उशांना नवे रुप द्यावे. खोलीतील उपयोगात येत नसलेला एखादा कोपरा बाल्कनी, खिडकी जवळचा भाग किंवा टेरेसवरील 'लो-सिटींग'ची अरेंजमेंट पाहुण्यांना नक्कीच प्रभावित करेल. यासाठी लाकडाची मजबूत फ्रेमही बनवता येईल. त्यामुळे गादी हलणार नाही. 'लो-सिटींग'चा आणखी एक फायदा म्हणजे जागा कमी असूनही पाहुण्यांसाठी उत्तम बैठकव्यवस्था उपलब्ध होते. अशा अनेक कल्पना लढवून आपल्या कल्पनाशक्तीच्या जोरावर तुम्ही तुमच्या घराला नक्कीच वेगळे रुप देऊ शकता.

# आईच्या गर्भातच मुला-मुलींवर संस्काराला महत्व असते



आईच्या गर्भातच मुला-मुलींवर होणाऱ्या संस्काराला महत्व असते. मूल जन्मानंतरही आईच दीर्घकाळ काळजी घेत असते. आईने दिलेली प्रेरणा मुलांना आयुष्यभर उपयोगी पडते. आकाश आणि ईश्वर इतकेच आईचे महत्व अनन्यसाधारण आहे. आई या शब्दाचे सामर्थ्य आणि तिची महती खूप न्यारी आहे. आईचे यश हे मुलांना प्रेरणा असते. ही प्रेरणा प्रत्येक मुलाला यशाच्या उंच शिखरापर्यंत पोहचवते. आईत असा काही एक गुण परमेश्वराने ठासून भरलेला आहे तो म्हणजे आपल्या पिलाला उडणाण्यासाठी पंखात बळ देण्यासारखा एक शब्द पुरेसा राहतो. आईच्या शब्दाने अखंड पृथ्वी पादाक्रांत करता येते. इतकं सामर्थ्य आई करु शकते. मुलाची चेतना शक्ती ही वाढविण्याचे काम आईचे यश करु शकते. आईने केलेले कोणतेही कार्य मुलांसाठी पूरक आणि प्रेरणादायीच असते. कुटुंबाच्या विकासाकरिता आईची मानसिकता ज्या पद्धतीत असेल त्या पद्धतीनेच कुटुंबाचा विकास घडू शकतो. मुले आणि आई यांची सांगड ही बाब वेगळी असून मुलांना पूरक आणि पोषक असे विचार आईच देवू शकते त्यामुळे सहजासहजी आईचे विचार मुले स्वीकारतात आणि आईच्याविचाराधीन वागतात. प्रकर्षाने पूर्ण कुटुंबालाच यश प्राप्त होत असते. मुलांच्या यशापयशात घराचा, कुटुंबाचा वाटा तर असतोच; पण सर्वांत महत्वाचा वाटा त्यांच्या आईचा असतो. मुलं आपल्या आईला पाहातच मोठी होतात. अशावेळी आई यशस्वी असेल, तर मुलेही यशाचे रहस्य आपोआपच शिकतात. जर आई नोकरी करीत असेल, तर मुलेही आईचे पाहून घरी व बाहेर सामंजस्य राखायला शिकतात. आईचे साहस, विश्वास व प्रेम तिच्या मुलांना पुढे जाण्याची, प्रगती करण्याची प्रेरणा देतात. मुले आपल्या आईला आपले गुरु बनवू शकते. जर एखाद्या महिलेने व्यवसायात खूप यश मिळवले असेल तर मुलेही तिच्यापासून प्रेरणा घेऊन तोच व्यवसाय स्वीकारु शकतात वा इतर एखाद्या व्यवसायातही आईची मदत घेऊ शकतात.

आईचे कठोर परिश्रम, वक्तशीरपणा व नम्रता हे गुण मुलांमध्ये आपोआप उतरतात.

आपल्या अनुभवांव्दारे आपल्या मुलाला कोणत्या प्रकारचे शिक्षण उत्तम आहे हे आई ठरवू शकते.

बऱ्याचदा यशस्वी आई व मुलांमध्ये मैत्रीचे नाते होते. ज्यामुळे आई आपल्या मुलांना व्यवहारज्ञानाचे धडे देण्यातही यशस्वी होते. हाच दृष्टीकोन मुलांना आत्मविश्वास अचून निर्णयक्षम व स्वावलंबी बनवतो.

प्रत्येक आई आपल्या मुलांना स्वत:पेक्षा जास्त यशस्वी पाहू इच्छित असते. अशावेळी मुलांची आवडत व क्षमता पाहून यशस्वी आई उत्तम निर्णय घेऊ शकते व मुलांना योग्य मार्गदर्शन करु शकते.

आईकडून मुलांना प्रेम व ममता मिळातेच त्यासोबतच त्यांना चांगल्या-वाईटातील फरक ओळखण्याचा गुणाही मिळतो, जो त्यांचे भविष्य घडविण्यात महत्वाची भूमिका बजावतो.

# ...तर काहींचे मध्यम वयातच शरीर वाढते

जसजसे वय वाढू लागते तसतशी महिलांची आपल्या शरीराकडे लक्ष देण्याची प्रवृत्ती कमी होऊ लागते. त्यामुळे त्यांचे शरीर बेढब होऊन वाढत्या वजनावर त्यांचे नियंत्रण राहात नाही. काही महिलांचे वजन प्रसुतीनंतर वाढते, तर काहींचे मध्यम वयात.

अशा महिलांनी हलका-फुलका व्यायाम करून आपले वजन राखायला हवे. खाली सांगितलेला व्यायाम करण्यासाठी फक्त २० मिनिटे हवीत आणि हा व्यायाम आठवड्यातून किमान तीन वेळा करावा. सुरुवातीला दीड किलोचे डम्बेल्स वा वजन खरेदी करावे. नंतर ताकद वाढल्यानंतर आपण जास्त वजनाचे डम्बेल्स खरेदी करू शकता.



* बिनहाताच्या खुर्चीवर बसा. कंबर सरळ ठेवून उजवा हात डाव्या खांद्यावर व डावा हात उजव्या खांद्यावर ठेवा. थोडेसे पुढे वाकून उभ्या राहा. याच स्थितीत खुर्चीत बसा. असे आठ वेळा करा.

* एका खुर्चीसमोर उभ्या राहा व आपले हात व दंड समोर करा. हात असेच ठेवीत खुर्चीवर बसा. पुन्हा हात असेच ठेवीत उभ्या राहा. असे आठ वेळा करा.

* दोन्ही हातात डम्बेल्स घेऊन उभ्या राहा. डम्बेल्स एकमेकांसमोर असावेत. हात पसरत वर या. पुन्हा खाली आणा असे आठ वेळा करा.

* हातात डम्बेल्स घेऊन बिनहाताच्या खुर्चीवर बसा. कंबर थोडीशी पुढे वाकवून कोपर वाकवून वर न्या. खाली आणि असे आठ वेळा करा.

* खुर्चीमागे उभ्या राहा. खुर्चीचा आधार न घेता खुर्चीवर हलकासा हात टेकवा. पंजावर उभे राहण्याचा प्रयत्न करा. ३ सेकंद थांबून पूर्णस्थितीत, या असे आठ वेळा करा.

दक्षता - हा व्यायाम सावकाश करा. सुरुवात नेहमी हलक्या वजनांनी करावी. (दीड किलो वज जास्त वाटत असेल, तर अर्ध्या वा एक किलो वजनानेही सुरुवात करू शकता). जर आठ वेळा व्यायाम करूनही थकवा जाणवत नसेल, तर वजन वाढवू शकता. आठवड्यातून तीनपेक्षा जास्त वेळा हा व्यायाम करू नये. यामुळे आपले बेढब शरीर सुडौल होऊ लागेल.

■■■

# मुलांची जबाबदारी वडीलांपेक्षा आईवर जास्त असते



अनिताचा आठ वर्षांचा सोनू आतल्या खोलीत खेळत होता व अनिता घरातील साफसफाईत व्यस्त होती. जेव्हा ती आपल्या खोलीत गेली तेव्हा तिला काही वेळापूर्वीच नीटनेटके आवरुन ठेवलेले सामान विस्कळीत पडलेले दिसते. खोलीतील पसारा पाहून ती त्याला म्हणाली, तू असा ऐकणार नाहीत. संध्याकाळी पप्पा आले की, त्यांनाच तुझे नाव सांगते.

खरे तर मुलांचा शाळेव्यतिरिक्त बाकीचा सारा वेळ घरातच जातो. त्याचे वडील नोकरी-व्यवसायानिमित्ताने दिवसभर घराबाहेरच असतात. त्यामुळे मुले जास्त वेळ आपल्या आईसोबतच घालवतात. आई घरी असते त्यामुळेच मुले काय करतात एखादी गोष्टी तर शिकत नाही ना या गोष्टींवर आईनेच लक्ष ठेवायला हवे. जर आईने लक्ष दिले नाही, तर मुले व्रात्य होतात. घरीच नव्हे, तर बाहेरही खोड्या करु लागतात. त्यामुळे आईला शेजाऱ्यांच्या तक्रारींही ऐकाव्या लागतात.

बहुतेक आया मुलांना स्वत: न दटावता म्हणतात की, पप्पांलना येऊ दे..असे आईचे म्हणणे योग्य नव्हे. मुलांची जबाबदारी वडिलांपेक्षा आईवर जास्त असते. जर मुले खोड्या करीत असतील, गैर वागत असतील, तर आईने त्यांना प्रथम प्रेमाने समजावून सांगावे. त्याला दटावावे तरीही त्याने ऐकले नाही, तर कधी कधी त्याला शिक्षाही करावी.

बऱ्याच स्त्रिया मुलांनी खोड्या केल्या, तर पती कामावरुन येताच मुलांबद्दलच्या तक्रारींचा पाढा वाचण्यास सुरुवात करतात. पती कामावरुन दमून आला आहे याचेही त्यांना भान रहात नाही.

दमून आलेला पती एकतर पत्नीच्या तक्रारींकडे लक्ष देत नाही किंवा रागाने मुलांना मारु लागतो. ज्या स्त्रिया मुलांना स्वत: न बोलता पप्पांची भीती दाखवतात त्यांची मुले त्यांना घाबरत नाहीत. उलट ती जास्तच व्रात्य होतात.

यासाठी जर त्या मुलांना एक उत्तम नागरिक बनवू इच्छित असतील, तर त्यांनी स्वत: मुलांवर नियंत्रण ठेवायला हवे. आईची एवढी शिस्त व भिती त्याच्यावर हवी की, त्याने तिची प्रत्येक गोष्टी ऐकावी.

# सुगरणीचा सल्ला



0 केक करताना मैदा, बेकिंग पावडर एकत्र करून तीन वेळा चाळा. त्यासाठी जमिनीवर वर्तमानपत्राचा कागद अंथरा, कागदापासून अंदाजे दोन-अडीच फूट वर चाळणी धरून हळूहळू चाळा. यामुळे पिठात हवा मिसळते व केक चांगला फुगून हलकाही होतो.

0 बाजारात मिळतात तसे तिखटमिठाचे मसाला दाणे घरी बनवायला अत्यंत सोपे व स्वस्त पडते. साध्या चणाडाळीच्या कोरड्या पिठात तिखट, मीठ, हळद, धने, जिरे पावडर, ओवा घालावा. नंतर कच्चे शेंगदाणे साधारण भिजतील एवढे पाणी त्याला लावावे. नंतर वरील तयार केलेले कोरड्या डाळीचे पीठ त्यालाचोळावे व भाज्यांप्रमाणे तेलात तळावेत. अत्यंत रूचकर व कुरकुरीत दाणष तयार होतात.

0 तिखट मिठाच्या पुऱ्यांची कणीक टोमॅटोच्या रसात भिजवावी. त्याला वेगळी चव येते.

0 दोन-तीन कोवळी घोसावळी उभी चिरून, किसून घ्यावीत. त्याच्या किसात मावतील (भिजतील) एवढे जाड पोहे घालावेत. साली घेऊ नयेत. पंधरा मिनिटांनी कढईत नेहमीप्रमाणे हिंग वापरून फोडणी करावी. ओल्या मिरच्यांचे तुकडे घालून भिजवलेले पोहे घालून, नेहमीच्या कांदेपोह्याप्रमाणे परतवून खूप वाफ आणावी. कोथिंबीर, ओले खोबरे, आवडत असल्यास लिंबू पिळून गरमच खाण्यास द्यावेत. सुरेख पोपटी रंगाचे व वेगळ्या चवीचे पोहे होतात. याचप्रमाणे कोवळ्या दोडक्यांचेही पोहे होतात.

0 झटपट केक तयार करायचा असेल तर लोणी फेसण्यात वेळ जातो. त्याऐवजी पाव किलो मैद्यासाठी एक वाटी लोणी, पाऊण कप दुधात घालून वितळवावे व मिक्सरमधून काढून घ्यावे. एक कप पिठीसाखर, २ चमचे बेकिंग पावडर व तीन अंडी, एक चमचा इसेन्स असे बाकीचे प्रमाण घेऊन केक तयार करावा. केक पटकन व छान होतो.

0 काही वेळा शिळ्या पोळ्या उरतात, पण त्याचा नवा पदार्थ तयार करायला वेळ नसतो. तेव्हा पोळ्या वाळवल्यानंतर मिक्सरमधून बारीक पूड करून बारीक पूड करून डाळीच्या पिठात तिखट, मीठ, हळद, जिरेपूड घालून पोळीचे कूट घालून शेव करावी. छान खुसखुशीत होते. ही पोळीची पूड घातल्यास मोहन घालावे लागत नाही. दुसरे दिवशीच्या पोळ्यांच्या कणकेतही घालता येते. त्यामुळे पोळ्या मऊ होतात.

0 अळूवड्या करण्यापूर्वी अळूची पाने लिंबाच्या पाण्यात थोडा वेळ बुडवून ठेवावीत. थोड्या वेळाने ती चाळणीत काढून एका वर्तमानपत्रावर पालथी पसरावीत. प्रत्येक पानाच्या पाठीला लिंबाची फोड चांगली चोळून नंतर बेसनाचे सारण भरावे. असे केल्याने वडी अजिबात खाजत नाही.

0 इडली, डोशाच्या नारळाच्या चटणीसाठी खूप नारळ वापरण्याची अजिबात गरज नाही. थोड्याशा नारळाच्या चटणीत ताकात भिजवलेले ब्रेड स्लाईस (प्रमाण आवश्यकतेनुसार) घालून मिक्सरमधून काढल्यास भरपूर चटणी होते. ही चटणी अत्यंत चविष्ट लागतेव त्यात ब्रेड आहेत याचा कोणालाही पत्ता लागत नाही.

# अग्नीच्या साक्षीने सात फेरे घेतल्यानंतर



अग्नीच्या साक्षीने सात फेरे घेतल्यानंतर दोन अपरिचित आयुष्यभरासाठी परस्परांचे जोडीदार होतात. तनमन प्राणाने एकमेकांना समर्पित होतात. आयुष्यभर सोबत राहाण्याच्या आणाभाका घेतात. एकमेकांचा दुरावा त्यांना असह्य होतो.

परंतु नंतर एक दिवस असाही येतो जेव्हा दोहोंमध्ये दुरावा वाढू लागतो. एकमेकांच्या सवयीतील, वागण्यातील दोष काढीत दांपत्य घुसमटते जीवन जगण्यास विवश होतात. प्रत्येक बाबतीत वैताग, भांडण करणे सामान्य होते. स्थिती एवढी बिघडते की, पती विवाहाच्या दिवसाला नावे ठेवू लागतो, तर पत्नी चिडून माहेरी जाण्याची वा आत्महत्या करण्याची धमकी देऊ लागते. कालपर्यंत पत्नीच्या इच्छेसाठी चंद्रतारे तोडून आणण्याची भाषा करणारा पती आणि पत्नीच्या इच्छेसाठी जीव ओवाळून टाकणारी पत्नी आता एकमेकांच्या अस्तित्वाला आपल्यावरील ओझे समजू लागतात. लग्नानंतर दोन-तीन वर्षानंतरच नव्हे तर कित्येक दांपत्यात वैवाहिक जीवनाची २५-३० वर्षे घालवल्यानंतरही अशी स्थिती उद्भवते.

तारूण्यात प्रत्येक तरूण-तरूणी काल्पनिक जगात वावरत तऱ्हेतऱ्हेची इमले बनवीत राहतात; पण लग्नानंतर आपली स्वप्ने सत्यात उतरत नाहीत असे दिसताच दोघांमध्ये दुराव्याची दरी उभी राहाते. जसजशी ही दरी रूंदावत जाते दोघांमध्ये 'मी' ची भावना उभी राहाते. हीच 'मी' पणाची भावना दोघातील वादाचे कारण होते.

पती पत्नीला न आवडणाऱ्या इच्छा तिच्यावर लादू लागतो तर पत्नी पतीला न आवडणारी कामे करू लागते.

जो पती लग्नानंतरच्या सुरुवातीच्या काळात आपली सारी कमाई पत्नीच्या हाती देऊन 'हा पैसा फक्त माझाच नसून यावर तुझाही हक्क आहे' असे सांगत असतो तोच पत्नीला 'तू कोणत्या अधिकाराने माझ्या खिशातले पैसे घेतलेस ?' वा 'तू कोणाला विचारून मैत्रिणींना घरी पार्टी दिलीस' असे फटकारू लागतो.

तसेच पत्नीही, 'तू माझ्या कपाटाला हातच का लावलास ?' वा 'मला न विचारता मित्रांना जेवायला का बोलवलस' असे पतीला धारेवर धरू लागते.

खरे तर दुराव्याची स्थिती निर्माण होताच दोघांची समजुतदारपणे मतभेद दूर करून घ्यायला हवेत. जर सुरुवातीलाच एकमेकांच्या गरजा ओळखून स्वत:ला त्यानुरूप राखले तर संसार विस्कटणार नाही.

होता होई तो एकमेकांबद्दलचे आकर्षण टिकवून ठेवावे. आपल्या व्यस्त जीवनातून व घरकामातून वेळ काढून पतीच्या इच्छेनुरूप स्वत:ला आकर्षक राखावे. पतीनेही तिचे करण्यात कंजुषपणा करू नये. एकमेकांचे कौतुक करून एकमेकांना गिफ्ट देऊन सुख उधळता येऊ शकते व संसारात गोडवा राखता येतो.

# धूळ खात पडलेल्या वस्तूंनी घराचे सौंदर्य खराब होते

हल्ली वेगवेगळ्या प्रकाराचे सुंदर सामान रोजच बाजारात येत असते. हल्लीच्या स्पर्धायुक्त प्रत्येक कंपनी आपली उत्पादने विकण्यासाठी सतत आपल्या उत्पादनांत बदल करीत असतात. या बदलांमुळेच आपणही आपल्या घरातील वस्तू सतत बदलत राखू इच्छित असतो. बाजारात आलेले टी. व्ही. चे लेटेस्ट मॉडेल खरेदी करून ड्राईंग रूममध्ये ठेवल्यानंतर बरेच जण ड्राईंग रूममधील जुना टी. व्ही. आपल्या बेडरूममध्ये वा मुलांच्या रूममध्ये ठेवतात आणि घरातील प्रत्येकजण नवाच टी. व्ही. पाहात असल्यामुळे जुना टी. व्ही. ही धूळखात पडतो.

फक्त टी. व्ही. च्याच बाबतीत होते असे नव्हे तर जुने फर्निचर, जुन्या पेट्या, तेलातुपाचे डबे, जुनी कपाटे इ. सामानांचा ढीगही घरात साठू लागतो. काही जण जुन्या वस्तू त्यामागील भावनांसाठी जपत असतात. विशेषतः महिला माहेराहून मिळालेल्या, सासरकडून मिळालेल्या, पहिल्या पगारात घेतलेल्या वस्तू म्हणून कालबाह्य झाल्या तरी जपत राहतात. भले ते गंजलेले, धूळखात पडलेल्या वस्तूंनी घराचे सौंदर्य खराब होत असते. बऱ्याच घरात, विशेषतः फ्लॅटमध्ये जादा जागाही नसते.

तेथे असे जुने सामान बाल्कनीतच ठेवले जाते. आपले घर कितीही मौल्यवान वस्तूंनी समजवले असले, तरी घराच्या बाहेरच्या खोलीतच जु सामान पडलेले असेल, तर घराचा सारा शो च जातो. जर आपले घर सुंदर, हवेशीर आणि सहजतेने वावरता येईल असे राखायचे असेल, तर जुन्या वस्तूंना घराबाहेर काढा. जुने सामान बाहेर काढल्यानंतरच नवे सामान खरेदी करा. बऱ्याचदा अशा जुन्या सामानांवर धूळ चढते. त्यांना कीड लागते यामुळे ते सामान खराबह होण्याची शक्यता असते. जर आपल्या जुने सामान घरात ठेवायचे असेल तर ते स्वच्छ, नीटनेटके ठेवण्यासाठी त्यांची नियमित देखभाल करावी तसेच गंजलेले, तुटके-फुटके सामान घरात ठेवून घराला भंगाराचे दुकान करू नका.

# पुरुष मंडळी मुळातच उलट्या काळजाची...



लग्नाचा वाढदिवस आणि नवऱ्याचा वाढदिवस बायकोच्याच न चुकता लक्षात राहतो. नवऱ्याच्या मात्र लग्नाचा वाढदिवसही व बायकोचा वाढदिवसही लक्षात राहत नाही. आपला वाढदिवस बायकोच्या लक्षात आहे का ? याची परीक्षा घेणे तेवढे मात्र अचूकपणे लक्षात असते, असे का होते ? पुरुष मंडळी मुळातच उलट्या काळजाची, स्वार्थी आणि ढोंगी असतात म्हणून ? नव्या संशोधनाने पुरुष। मंडळींवरील हे आरोप आणि कलंक साफ धुवून काढले आहेत. महिलांची स्मरणशक्ती मुळातच पुरुषांपेक्षा चांगली असते आणि त्यामुळे वाढदिवस वगैरे त्यांच्या सहजपणे आणि पुरुषांपेक्षा जास्त चांगले लक्षात राहतात, असा या संशोधनाचा निष्कर्ष आहे. केंब्रिज विद्यापीठातील शास्त्रज्ञांनी हे संशोधन केले आहे. ४८ ते ९० वर्षे वयोगटातील सुमारे ४,५०० स्त्री-पुरुष या संशोधनात सहभागी झाले होते. या संशोधनात प्रामुख्याने स्मरणशक्तीच्या चाचण्या घेण्यात आल्या. या चाचण्यांत महिलांनी फक्त सरासरी ५.९ इतक्या चुका केल्या तर पुरुषांमध्ये मात्र या चुकांचे प्रमाण सरासरी १६.२ इतके जास्त असल्याचे आढळून आले. या संशोधनामुळे अल्झायमर्स या विकाराची कारणे जाणून घेण्यासंबंधीच्या संशोधनाला जोरदार चालना मिळेल, असा दावा या शास्त्रज्ञांनी केला आहे.

# पुरूष व महिलांना नपुंसक बनण्यापासून वाचवतात हे ६ पॉवरफुल पदार्थ

## फर्टिलिटी वाढून आई बाबा बनायचं स्वप्न होतं पूर्ण

नपुंसकता ही एक सामान्य समस्या आहे जी पुरुष आणि महिला दोघांनाही होऊ शकते. जेव्हा असे होते तेव्हा आई बाबा होणे कठीण होते. जर तुम्हाला ही समस्या टाळायची असेल तर आजपासूनच या खाली दिलेल्या सुपरफूड्सचे सेवन करायला सुरुवात करा.

संपूर्ण आयुष्याच्या प्रवासात एक टप्पा असा असतो, जेव्हा 'पालक होणं' ही एक सुंदर आणि स्वाभाविक इच्छा मनात डोकावत राहते. पण कधी कधी शरीरही या स्वप्नात अडथळा निर्माण करतं. वंध्यत्वाचा प्रश्न केवळ स्त्रियांसाठीच आहे असा गैरसमज आजही अनेकांच्या मनात घर करून बसलेला असतो. प्रत्यक्षात पुरुषही याच समस्येला तोंड देत असतात. वाढतं वय, जीवनशैलीतील बदल, हार्मोन्सची असंतुलितता हे सगळं मिळून अपत्यप्राप्तीच्या प्रक्रियेला गुंतागुंतीचं बनवू लागतं. पण अशा परिस्थितीत बाजारातील औषधांपेक्षा आयुर्वेदिक मार्ग अधिक स्थायी आणि नैसर्गिक असतो.

काही विशिष्ट आहार घटक नियमित घेतल्यास पुरुष आणि स्त्रिया दोघांच्याही प्रजननक्षमतेत आश्चर्यकारक बदल घडू शकतो. आयुर्वेद तज्ज्ञ डॉ. दीक्षा भावसार सावलिया यांनी सोशल मीडियावर यासंबंधी दिलेल्या माहितीच्या आधारे आज आपण जाणून घेणार आहोत असे ५ घरगुती घटक, जे तुमचं 'आई-बाबा होण्याचं स्वप्न' पूर्ण करण्यास मदत करू शकतात.

**तूप**

तूप केवळ एक खाद्यपदार्थ नाही, तर प्राचीन आयुर्वेदात तो ओजस वाढवणारा घटक मानला जातो. नियमित तुपाचा आहारात समावेश पुरुषांमध्ये स्पर्मची गुणवत्ता वाढवतो, तर स्त्रियांमध्ये ओव्हमची स्थिती सुधारतो. विशेषतः शतावरी घृत हे स्त्रियांसाठी आणि अश्वगंधा घृत हे पुरुषांसाठी लाभदायक आहे. तूप नैसर्गिकरित्या लैंगिक आरोग्य बळकट करतं आणि संतुलित हार्मोन्सची निर्मिती घडवून आणतं.

**मूगडाळ**

मूगडाळ ही डाळींची राणी मानली जाते, कारण ती



पचायला हलकी असून पोषणमूल्यांनी परिपूर्ण असते. यात असलेले प्रोटीन, फॉलिक ॲसिड आणि ॲंटीऑक्सिडंट्स प्रजनन आरोग्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरतात. मूग खिचडी, सूप किंवा थालिपीठाच्या स्वरूपात सहज आहारात समाविष्ट करता येतो आणि हे शरिराच्या उर्जेचं नैसर्गिक साधन ठरतं.

**भोपळ्याच्या बिया**

भोपळ्याच्या बियांमध्ये झिंकचं प्रमाण अधिक असतं, जे हार्मोनल संतुलनासाठी आवश्यक असतं. झिंक थायरॉईड हार्मोनच्या योग्य निर्मितीसाठी आणि शरीरातील पोषक तत्त्वांचं शोषण योग्यरित्या होण्यासाठी अत्यावश्यक असतो. दररोज केवळ १ चमचा भोपळ्याच्या बिया सेवन केल्यास प्रजननक्षमतेत लक्षणीय सुधारणा होऊ शकते.

**नारळ**

नारळ हा सर्वांगाने फायद्याचा आहे, मग तो कोरड्या स्वरूपात असो, नारळपाणी असो वा नारळाचं दूध. यामध्ये असणारे घटक शरीरातील हार्मोन्सचं संतुलन राखण्यास मदत करतात. हार्मोनल बिघाड हा वंध्यत्वामागचा मोठा कारणीभूत घटक असल्यामुळे, नारळाच्या नियमित सेवनाने गर्भधारणेस पोषक वातावरण तयार होतं.

नपुंसकता टाळण्यासाठी आणि फर्टिलिटी वाढवण्यासाठी पदार्थ

**डाळींब आणि खजूर**

डाळींबात असणारे पॉलीफेनॉल्स नावाचे ॲंटीऑक्सिडंट्स पुरुषांमध्ये स्पर्म क्वालिटी सुधारतात आणि स्त्रियांमध्ये गर्भाशयात रक्तप्रवाह वाढवून गर्भधारणेस अनुकूल स्थिती निर्माण करतात. त्याचप्रमाणे खजूर हे आयर्न आणि फोलेटचा उत्तम स्रोत आहे, जे केवळ गर्भधारणेसाठीच नाही तर गर्भावस्थेतही आवश्यक असतात. रोज ३-४ खजूर तुपामध्ये भिजवून खाल्ल्यास शरीराला आवश्यक ऊर्जा आणि पोषण दोन्ही मिळतं. आई-बाबा होण्याची तयारी ही केवळ वैद्यकीय चाचण्यांवर आधारित नसून ती तुमच्या आहारशैलीवरही तितकीच अवलंबून असते. नैसर्गिक आणि आयुर्वेदिक उपाय हे शरीराशी सुसंगत असतात आणि त्यांचे दुष्परिणामही नगण्य असतात. म्हणूनच वेळेवर योग्य आहार निवडा, शरीराचं पोषण करा आणि तुमचं स्वप्न पूर्ण होण्यासाठी एक पायरी जवळ जा.

**टिप :** हा लेख केवळ सामान्य माहितीच्या उद्देशाने आहे. हा वैद्यकीय सल्ला, निदान किंवा उपचारांचा पर्याय नाही. अधिक तपशीलांसाठी नेहमी आपल्या डॉक्टरांचा सल्ला घ्या.

■■■

# घुटेवाडी ता.श्रीगोंदा येथील जवान ज्ञानदेव अंभोरे यांचे अपघाती निधन

जनप्रवास प्रतिनिधी

श्रीगोंदा :

तालुक्यातील घुटेवाडी, ता. श्रीगोंदा येथील १८०३, झछ्ठ रेजिमेंटमध्ये सेवा कार्यरत असणारे जवान ज्ञानदेव सुखदेव अंभोरे यांचे खरगपूर, कोलकाता येथे अपघाती निधन झाले. त्यांच्या निधनाने घुटेवाडी गावावर शोककळा पसरली आहे.



याबाबत अधिक माहिती गावातील सामाजिक कार्यकर्ते संभाजी घुटे यांनी सांगितले की, ज्ञानदेव सुखदेव अंभोरे हे कोलकत्ता येथील युनिटमध्ये कार्यरत असताना सुट्टी घेऊन दिनांक १५ जुलै रोजी हावडा, कोलकाता येथून घुटेवाडी येथे येण्यासाठी रेल्वेने रवाना झाले. याबाबत त्यांनी पत्नीस फोनवरून सांगितले तसेच लोकेशनही पाठवले. परंतु दिनांक १६ जुलै रोजी त्यांचे खरगपूर येथे रेल्वे पटरीवर प्रेत आढळून आले. याबाबत पत्नीस काहीही माहिती नव्हते.इकडे त्यांच्या पत्नीने फोनवर वारंवार संपर्क साधण्याचा प्रयत्न केला परंतु फोन स्विच ऑफ लागत होता .त्यामुळे त्यांनी अंभोरे यांच्या युनिट मधील सहकाऱ्यांना फोन केला. त्यांच्याकडूनही अशी माहिती मिळाली की ,ज्ञानदेव अंभोरे हे युनिट मधून रेल्वेने प्रवासासाठी निघाले आहेत. सहकाऱ्यांनी महाराष्ट्र राज्यातील सैनिकी युनिटमध्ये संपर्क साधून यासंबंधीची माहिती दिली. त्यानुसार शोध मोहीम सुरू झाली. काल दुपारी पुन्हा ग्रुप वर प्रेताचा फोटो व्हायरल झाल्याने अंभोरे यांची पत्नी यांना दाखविला त्यानंतर मृताची ओळख पटली व गावात एकच कल्लोळ झाला. संपूर्ण गावावर शोककळा पसरली. ज्ञानदेव अंभोरे यांचे भाऊ व मेव्हणा हे सुद्धा सैनिकी सेवा बजावत असल्याने ते घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी प्रेत ताब्यात घेतले. परंतु अवस्था इतकी बिकट झाली होती की प्रेत गावाकडे आणणे मुश्किल झाले. त्यामुळे आज ज्ञानदेव अंभोरे यांच्या पत्नी, भाऊ व इतर नातेवाईक विमानाने तसेच रेल्वेने घटनास्थळी दाखल होत आहेत व तेथेच अंत्यसंस्कार होणार असल्याची माहिती मिळाली आहे. घुटेवाडी येथील जवानाचा अपघाती मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. गावातील सर्व नागरिकांमध्ये दुःखाची भावना पसरली आहे. कोळगाव, श्रीगोंदा व अहिल्यानगर येथील सैनिक बोर्डामधील सर्व आजी-माजी सैनिक संघटनेने या घटने बाबत तीव्र दुःख व्यक्त केले आहे. सदर घटनेमुळे घुटेवाडी गावावर शोककळा पसरली आहे.

# जर तुम्ही जमिनीवर झोपत असाल तर 'हे' नक्की वाचा

अनेकदा गादीवर झोपून कंटाळा आल्यामुळे किंवा गरम होत असल्याने आपण गादीवर न झोपता जमिनीवर झोपतो. यावेळी आपल्याला अनेकदा जमिनीवर झोपू नये असा सल्लाही मिळतो. पण जमिनीवर झोपण्याचे आपल्या शरीराला आणि आरोग्याला अनेक फायदेही आहेत. पण त्यासाठी तुम्हाला दररोज काही वेळ जमिनीवर झोपण्याची गरज असते. सुरुवातीला थोडं अवघड जाईल पण, त्यानंतर तुम्हाला याची सवय होईल. जाणून घेऊयात जमिनीवर झोपण्याचे आरोग्यदायी फायदे...



जमिनीवर झोपणं आपल्या आरोग्यासाठी फायदेशीर असतं. हाडांसाठी फायदेशीर ठरण्यासोबतच ते आपल्या शरीराचा थकवा, ताण दूर करण्यासाठीही फायदेशीर ठरतं.

**हाडांच्या संरचनेत सुधारणा**

जर तुम्हाला हाडांसंबधी काही समस्या झाली असेल तर त्यासाठी जमिनीवर झोपणं हा उत्तम पर्याय आहे. त्यासाठी काहीवेळ का होईना तुम्हाला जमिनीवर झोपणं गरजेचं आहे. त्यामुळे तुमची ही समस्या दूर होण्यास मदत होईल.

**पाठीच्या दुखण्यापासून सुटका**

जमिनीवर झोपल्यामुळे तुम्ही पाठीच्या दुखण्यापासून सुटका करून घेऊ शकता. त्यामुळे पाठीचं दुखणं नाहीसं करण्यासाठी जमिनीवर झोपणं सुरू करा.

**खांद्यांसाठी फायदेशीर**

जमिनीवर झोपणं तुमच्या खांद्यांसाठी फायदेशीर ठरेल. यामुळे तुमच्या खाद्यांच्या सर्व समस्या दूर होतील.

**तणाव दूर करण्यासाठी**

असं म्हटलं जातं की, जमिनीवर झोपल्यामुळे थकवा आणि तणावांसारख्या समस्या दूर होतात. तसेच जर काही मानसिक समस्या असतील तर त्यादेखील दूर होण्यास मदत होते.

■■■

# बचत करताना या गोष्टींकडे लक्ष द्या

गुंतवणुकीच्या दृष्टीने विचार केला, तर विशेषत: गृहिणी पैसा गुंतवणुकीसाठी काही पर्याय अवलंबतात. ही गुंतवणूक आपल्या घरासाठी असते, खास तर भविष्यासाठी.. मुलांच्या शिक्षणासाठी, अकस्मात उद्‌भवणारे खर्च असोत किंवा ती गुंतवणूक स्वत:साठी केलेली असो. कधी महिला आपल्याकडील खर्चातील उर्वरित रक्कम ही सेव्हिंग करताना दिसतात. आपल्या कुटुंबासाठी केलेली ही बचत त्यांना अपूर्व आनंद देणारी असते. यासाठी मग महिला आपल्याकडूनही कुटुंबासाठी हातभार लागावा म्हणून मग भिशी, फंडाच्या माध्यमातून पैसा गुंतवणूक करतात. बचत गटांच्या माध्यमातून होणारी गुंतवणूक असो किंवा एखाद्या संस्थेमार्फत केली जाणारी गुंतवणूक असो, ही गुंतवणूक करताना महिलांनी आपल्या आजूबाजूची परिस्थिती ही विश्वासदर्शक असेल, तर केलेली गुंतवणूक ही फायदेशीर ठरते. अन्यथा फसगतीचे प्रसंग आले, तर आपली गुंतवणूक ही आपले नुकसान करणारी ठरू शकते.

अनेक छोटय़ा-छोटय़ा संस्था पैसा गुंतवणुकीच्या माध्यमातून गृहिणींना पैसा गुंतवणुकीचं महत्त्व पटवून त्यांना बचत करण्यास भाग पाडतात. अनेक संस्था साखळी पद्धतीने पैसा गुंतवला, त्यात पुढे अनेक महिलांना या बचतीचे महत्त्व पटवून साखळी केली की त्याचा कसा फायदा होतो यासाठी महिलांना प्रोत्साहित करतात, अनेकदा पैसे गुंतवणुकीसाठी मनसुबे रचून महिलांना अनेक उदाहरणं देऊन श्रीमंतीची आस दाखवून पैसे?भरण्यास भाग पाडतात. यावेळी आपल्याकडील शिल्लक रक्कम असेल, तर ती घरातील माणसांच्या नकळत भरलीही जाते. याचा पतीला, मुलालाही मागमूस नसतो आणि आपली फसगत झाली की, आपली मूळ रक्कमही गेली याचं दु:ख तर होतंच, शिवाय फसगत करणाऱ्या माणसांनी पोबारा केला की आपलं दु:ख आपणच कवटाळून बसण्याशिवाय पर्याय उरत



नाही. यावेळी आपल्या खात्यावर असेल, नसेल तेवढी रक्कम गुंतवणे, सोन्याच्या वस्तू असतील, तर त्या विकून त्याची रक्कम गुंतवणे आदी पर्याय निवडताना दिसतात. मात्र, फसगत झाली की, मग पश्चातापाशिवाय हाती काही उरत नाही.

भिशी करतानाही खात्रीपूर्वक पैसे गुंतवावे. पैसा गुंतवणुकीसाठी अनेकजण आपले मेंबर्स होण्याकरिता गळ घालतात, मात्र आपल्या कष्टाचे पैसे गुंतवावे कुठे आणि कसे गुंतवावे, याचा विचार करणे गरजेचे आहे. शिवाय आपण एखाद्या संस्थेत, नवख्या माणसांकडे पैसे गुंतवले, तर आपल्या घरातील माणसांना याची कल्पना देणे गरजेचे आहे. दागिने गहाण ठेवताना, त्यांची विक्री करतानाही, पैशांचा व्यवहार करताना विश्वासू माणसांकडेच करणे हितावह.

फंडाच्या माध्यमातून अनेक महिला पैसे गुंतवतात. यावेळी वर्षभरानंतर आपल्या हाती येणारा पैसा, व्याज तपासून पाहणे आवश्यक. याशिवाय ज्यांना फंडाचा पैसा कर्ज म्हणून देत आहोत ती व्यक्ती विश्वासू, ओळखीची आहे का, ती ते कर्ज वेळेत फेडू शकते का, याचीही खात्री करून घेणे आवश्यक आहे.

जिथे आपले पैसे खऱ्या अर्थाने सुरक्षित राहू शकतात, जिथे विश्वासार्हता जपली जाते तेथेच पैसे गुंतवणे हिताचे ठरू शकते. महिला आपले पैसे बचत करण्यासाठी धडपडतात, मात्र पैसे गुंतवणुक करताना होणारे वादविवाद, कधी होणारी फसगत यातून मग त्या बाहेरही पडतात, मात्र नवीन पर्याय शोधला जातो. वर्षागाठी आपल्या हाती येणारा पैसा हा बचतीच्या रूपाने समाधान देणारा ठरतो.

आकस्मिक खर्चाला पर्याय ठरतो. कधी तर भिशी, फंडातून मिळणारा पैसा हा कुणाच्या सांगण्यावरून पुन्हा कुठेतरी गुंतवणे, कुठल्याही प्रलोभनाला भुलणे हा त्यावरील पर्याय ठरू शकत नाही. पैसा गुंतवताना मार्गदर्शन घेणे, जेथे पैसे गुंतवायचे आहेत त्या व्यक्तीची, संस्थेची संपूर्ण माहिती तसेच खात्री करून घेणे आवश्यक आहे. बचतीचा मार्ग अवलंबताना विश्वासार्हता महत्त्वाची ठरते हेच खरे!

■■■


# नखांचा आकार सांगतो, स्वभावातील खास गोष्टी...

**लांब नखे**

ज्या लोकांच्या नखांचा आकार लांब असतो. ते रोमँटिक स्वभावाचे असतात. लहान लहान गोष्टींवर चिडतात. यांची कल्पना शक्ती खूप चांगली असते. हे लोक प्रत्येक काम एकदम योग्य प्रकारे करु इच्छिता. या लोकांना त्या गोष्टी कळतात ज्या अधिक लोकांना कळत नाही. जीवनसाथीसोबत यांचे जीवन सुखी असते.

**रुंद नखे**

ज्या लोकांच्या नखांचा आकार रुंद असतो त्या लोकांना आरोग्यासंबंधीत श्रेष्ठ लाभ मिळतात. शारीरिक रुपात हे शक्तिशाली असतात. या लोकांना राग खूप लवकर येतो. हे लोक खूप विचार करतात आणि स्पष्ट बोलतात. खरे आणि खोट्यातला फरकदेखील त्यांना सहज समजतो.




**गोल आणि अंडाकार नखे**

ज्या व्यक्तिची नखे गोल किंवा अंडाकार असतात ते नेहमी आनंदी राहतात. हे लोक शांति प्रिय असतात. यांना वाद-विवाद आवडत नाही. हे लोक आपल्या कामांना नवीन पद्धतीने करणे पसंत करतात. या लोकांना गर्दीत चालणे आवडत नाही. आपल्या भावना हे दुसऱ्यांना लवकर सांगत नाहीत.

**चौकोनी नखे**

असे लोक साहसी असतात. हे चांगले लीडर असतात. यांचा स्वभाव गंभीर असतो. हे आपल्या आजुबाजूच्या लोकांना देखील आनंदी ठेवतात. आपली काम वेळेवर पुर्ण करतात.

**त्रिकोणाकार नखे**

ज्या लोकांची नखे त्रिकोणाकार असतात ते खुप चतुर असतात. ते प्रत्येक काम नवीन पध्दतीने करणे पसंत करतात. खूप समजुतदारपणे सगळी कामे करतात. यामुळे लोक यांच्याकडून योग्य कामांची अपेक्षा करतात. यांना नवीन कल्पना सुचतात. यांचे व्यक्तिमत्त्व आकर्षक असते.

**बदामाच्या आकाराची नखे**

ज्या व्यक्तिची नखे बदामाच्या आकाराची असतात. ती व्यक्ति इमानदार असते. हे लोक खूप चांगले मित्र असतात. लोक यांच्यावर पूर्ण विश्वास ठेवतात.

# छान छान गोष्टी... विचारच देतात हिंमत आणि हुशारी

गवताच्या दोन काड्या एका नदीत पडल्या. दोन्हीही वाऱ्याच्या एकाच झोताने उडून एकाच वेळी नदीत आल्या होत्या. दोघींचीही परिस्थिती सारखीच होती. पण, दोघांची मानसिक स्थिती समान नव्हती. एक काडी सुखाने पाण्यात वाहत होती, तर दुसरीला काठावर जाण्याची घाई होती. ती खूप प्रयत्न करीत होती.

आपली सारी शक्ती पणाला लावत होती. पण, नदीच्या जोरदार प्रवाहापुढे तिचे काहीही चालत नव्हते. तिचे सारे प्रयत्न वाया जात होते. तरी तीही पहिल्या काडीसारखी प्रवाहाच्या दिशेनेच वाहत होती. पण, पहिल्या काडीप्रमाणे सुखाने नव्हे, तर दु:खी मनाने. थोडे पुढे गेल्यानंतर नदीचा वेग कमी झाला.

पहिली काडी दुसरीला म्हणाली, 'चल, आता प्रयतन करायला योग्य वेळ आहे. आपण दोघीही मिळून प्रयत्न करुया. काठावर गवत उगवलेले आहे. ते नदीचा प्रवाह अडवतही आहे.

थोडेसे प्रयत्न करुन आपण आपल्या जगात पोहोचू शकतो.' पण, दुसरी काडी प्रयत्न एवढी दमून गेली होती, की आता ती प्रयत्न करु शकत नव्हती. पण, पहिली आपल्या मैत्रिणीला मागे ठेवून काठावर गेली नाही. तिने स्वत:ला दुसऱ्या काहीत गुंतविले. त्यामुळे तिची ताकदही वाढली. नंतर जोर लावला आणि एका लांब गवताला कसेबसे पकडले. जरा वेळ विश्रांती घेऊन दोघीही कशाबशा काठावरील कोरड्या जागेत पोहोचल्या. पहिली काठी जुन्या सोबत्यांच्या गोड आठवणी आठवत मजेत होती. काठावरील नव्या मैत्रिणींमध्ये आनंदात होती.

# चेहरा, मानेवरील चामखीळ व तीळ कायमचे काढण्यासाठी करा हे ७ घरगुती उपाय

काही लोकांच्या चेहरा आणि मानेवर नको तितके तीळ व चामखीळ असतात. तिळ तर सौंदर्यात भरच घालतात पण ते अतिप्रमाणात असतील तर त्रासही वाटतो. अशावेळी चामखीळ आणि तीळ कोणतंही ऑपरेशन न करता गळून पडावेत यासाठी आयुर्वेद तज्ञ डॉ. विभा वर्मा यांनी काही सोपे उपाय सुचवले आहेत ज्यांच्या मदतीने तीळ आणि चामखीळांपासून मुक्तता मिळू शकते.

आपल्या त्वचेवर अचानक आलेले तिळ किंवा चामखीळ म्हणजेच मस्से सौंदर्य आणि आत्मविश्वास दोन्हीवर परिणाम करू शकतात. अनेकदा हे सामान्य असतात, पण काही वेळा ते वाढत जातात आणि त्वचेमध्ये खोलवर जाऊन संसर्गही पसरवू शकतात. त्यामुळे अशा समस्या वेळीच



हाताळणं गरजेचं ठरतं. यासाठी ऑपरेशनही केले जाते.

पण सर्जरी किंवा महागड्या उपचारांऐवजी काही नैसर्गिक आणि आयुर्वेदिक उपाय नियमित केल्यास तिळ व मस्से सुरक्षित पद्धतीने कमी होऊ शकतात किंवा गळून पडू शकतात. आयुर्वेदिक तज्ज्ञ डॉ. विभा वर्मा यांनी सांगितलेल्या काही घरगुती पद्धती तुमच्यासाठी उपयुक्त ठरू शकतात.

**केळ्याच्या सालीचा जादूई उपयोग**

आपल्या दैनंदिन आहारात असलेलं साधं केळं त्वचेच्या चामखीळ व तिळांवर देखील परिणाम करू शकतो. केळीच्या सालीमध्ये असणारे ॲंटीऑक्सिडंट्स आणि नैसर्गिक एंजाइम्स मस्स्याची वाढ थांबवतात. केळ्याची साल आतील बाजूने मस्स्यावर ठेवावी आणि वरून सूती पट्टीने बांधावी. हे रोज रात्री झोपताना करून सकाळी काढून टाकल्यास हळूहळू फरक जाणवतो.

**कापलेला बटाटा**

शरीरातील अवांछित तीळ आणि चामखीळ काढून टाकण्यासाठी बटाटा खूप प्रभावी मानला जातो. यासाठी, चामखीळ असलेल्या ठिकाणी बटाट्याचा तुकडा ठेवा. त्यानंतर, तो चामखीळ असलेल्या भागावर हळूहळू घासून किंवा रगडून घ्या. ही प्रक्रिया दिवसातून ३ ते ४ वेळा करावी लागते. असे केल्याने चामखीळ सुकून गळून पडतात.

**कोरफड**

शरीरातील चामखीळ काढून टाकण्यासाठी कोरफड खूप उपयुक्त मानली जाते. खरं तर, कोरफडातील गुणधर्म तीळ आणि चामखीळ काढून टाकण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात.


**Truhome FINANCE**

**टूहोम फायनान्स लिमिटेड** (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात )

**मुख्य कार्यालय:** लेव्हल-३, वोक्खार्ड टॉवर्स, ईस्ट विंग, सी-२ ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१;

**दूरध्वनीः** १८०० १०२ ४३४५, **वेबसाइट:** http://www.truhomefinance.in

**नोंदणीकृत कार्यालय:** श्रीनिवास टॉवर, पहिला मजला, दरवाजा क्र.५,जुना क्र.११दुसरी लेन, सेनाटोफ रोड, अलवरपेट, तेनमपेट, चेन्नई-६०००१८; ;

**परिशिष्ट-४-ए [नियम ८(६) ची तरतूद पहा] स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचना**

**सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फिनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टेरेस्ट ॲक्ट, २००२ सहवाचिता सिक्युरिटी इन्टेरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स , २००२ च्या नियम ८ (६) तरतुदीअनव्ये स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई - लिलाव विक्री सूचना.**

सर्व सामान्य जनतेस व विशेषतः कर्जदार, तारणकर्ता / कर्ते आणि जामीनदाराना येथे सूचना देण्यात येत आहे कि, टूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)कडे तारण /अधिभारीत असलेल्या खाली नमूद केलेल्या स्थावर मालमत्तेचा प्रतीकात्मक ताबा **टूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात**) सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतलेला आहे आणि खाली तक्त्यात दिलेल्या तपशिलानुसार लिलावाच्या आधारावर **'जसे आहे जेथे आहे', 'जसे आहे जे आहे' आणि 'जसे जेथे आहे ' या तत्वावर दि २९.०८.२०२५ दुपारी १ ते २** या वेळेत विक्री केली जाईल. कर्जदार/जामीनदार / तारणकर्ता , देय रक्कम , स्थावर मालमत्तेचे लघु वर्णन राखीव किंमत आणि बयाणा रक्कम ठेव आणि तपासणीची तारीख देखील खालीलप्रमाणे दिली आहे: :

| कर्जदार/सहकर्जदार/ जमानतदार/ तारण ठेवण्याऱ्यांचे नाव | मागणी सूचनेची आणि वसुलीची रक्कम तारीख | राखीव किंमत (रु.) आणि वाढीव बोली | लिलावाची तारीख व वेळ | संपर्क व्यक्ती तपशील – (एओ व निवारण समूह ) |
|---|---|---|---|---|
| **१. श्रीमती शबाना नासिर काझी (कर्जदार) २. श्री. झुबैर नासिर काझी (सह-कर्जदार) निवासी पत्ता: फ्लॅट क्रमांक एफ/१०४, पहिला मजला, इमारत क्रमांक बी/३, जे.डी.सी. पार्क पीएच-२, येरवाडा, गणेश मंदिर जवळ, येरवाडा, पुणे, महाराष्ट्र-४११००६ तसेच येथे: मालमत्तेचा पत्ता: फ्लॅट क्रमांक एफ/१०४, पहिला मजला, इमारत क्रमांक बी/३, एसआर क्र २४३ १ १५५, प्रतीक नागा, जे.डी.सी. पार्क पीएच-२, येरवाडा, पुणे, महाराष्ट्र-४११००६ कर्ज खाते क्र. SLPHPUNH0001401** **ताबा दिनांक व ताबा प्रकार** ३० जून, २०२५ भौतिक ताबा **ज्ञात अधिभार** ज्ञात नाही | मागणी सूचना तारीख: १२/०८/२०२४ दिनांक ०८-०८-२०२४ रोजी कर्ज खाते क्र. SLPHPUNH0001401 अंतर्गत रु. २९,५३,५९६/- (रुपये एकोणतीस लाख त्रेपन्न हजार पाचशे छ्याण्णव फक्त) सदर सूचना मिळाल्यापासून ६० दिवसांच्या आत करारानुसार व्याजदराने पुढील व्याजासह . | रु.३०,८२,०२६/- (रुपये तीस लाख ब्याऐशीं हजार सव्वीस ) **बोली वाढविणे :** रु. १०,०००/- आणि त्यापटीने **बयाणा ठेव रक्कम (ईएमडी ) (रुपयात )** रु.३,०८,२०३/- (रुपये तीन लाख आठ हजार दोनशे तीन फक्त) **ईएमडी सादर करण्याची अंतिम तारीख : २८ ऑगस्ट २०२५ वेळ सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत.** | **२९ ऑगस्ट २०२५ वेळ. दुपारी १ ते २ वाजेपर्यंत.** | **अश्फाक पत्का- ९८१९४ १५४७७. सुनील मानेकर ८९९९३४४८९७ मयूर भोजने ८८९८५२७०७६ सचिन लकुळे ९८९०५१९९९७ निरीक्षण तारीख: १३.०८.२०२५ वेळ दुपारी १२.०० ते ३.०० वाजेपर्यंत.** |

**संपत्तीचे विवरण**

"जे.डी.सी. पार्क पीएच-१ को. ऑप. हाऊसिंग सो लिमिटेड" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रकल्पात, इमारत क्रमांक बी/३ प्रकार बी मध्ये, पहिल्या मजल्यावरील ५६.२२ चौ. मीटर क्षेत्रफळाचे फ्लॅट क्रमांक १०४ समाविष्ट आहे जे लँड बेअरिंग एसआर क्रमांक २४३/१ आणि १५५/१ वर बांधले गेले आहे, येरवडा गावात स्थित, तालुका हवेली, जिल्हा पुणे, महाराष्ट्र-४११००६ आणि खालीलप्रमाणे सीमा: पूर्व: मोकळी जागा, दक्षिण: मोकळी जागा, पश्चिम: प्रवेशद्वार,उत्तर: सपाट

**०१. विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तींसाठी, टूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वी श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) च्या वेबसाइटला देखील भेट देऊ शकता.**

**०२. इच्छुक बोलीदारांनी ईएमडी रक्कम आरटीजीएस / एनईएफटी स्वरूपात बँकेचे नाव- ॲक्सिस बँक लिमिटेड शाखा: वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई बँक खाते क्रमांक-चालू खाते क्रमांक ९११०२००४५६७७६३३ आयएफएससी कोड- यूटीआयबी ००००२३० येथे जमा करावी:**

ठिकाण - पुणे
दिनांक - २४-०७-२०२५

स्वाक्षरी /- प्राधिकृत अधिकारी
टूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात )

# मुसळधार पावसाने मुंबई बेहाल; नागरिकांना सतर्कतेचे आवाहन

जनप्रवास : प्रतिनिधी



मुंबई : मुंबई आणि उपनगरात काल(२२ जुलै) रात्रीपासून पावसाने जोर धरला आहे. मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर हवामान खात्याने राज्यातील काही जिल्ह्यांसाठी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. रायगड, मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि पालघर जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता आहे. मुंबईत रात्रभर झालेल्या पावसामुळे पाणी साचल्याने अंधेरी सबवे वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. पुढील आठवड्यात राज्यात आणखी पाऊस वाढण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

२८ जुलैपर्यंत कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्रातील घाट आणि मराठवाड्यात जोरदार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. यामुळे प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचा इशारा दिला आहे. दरम्यान, मुंबई वाहतूक पोलिसांनी अंधेरी सबवे बंद असल्याची माहिती दिली. सबवेमध्ये १ ते १.५ फूट पाणी साचले आहे. त्यामुळे गोखले पूल आणि ठाकरे पुलावरून वाहतूक वळवण्यात आली आहे.

पावसामुळे मध्य रेल्वे आणि हार्बर मार्गावरील गाड्या उशिराने धावत आहेत. मात्र, पश्चिम रेल्वे मार्गावरील गाड्या वेळेवर आहेत. मुंबईत भायखळा, लालबाग, सीएसएमटी आणि चर्चगेट भागात जास्त पाऊस झाला. घाटकोपर आणि आसपासच्या भागात सकाळी १० वाजेपर्यंत जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. मुंबईत पुन्हा मुसळधार पावसाची शक्यता असल्याने खचऊ ने आज (२३ जुलै) रोजी 'यलो' इशारा दिला आहे. पुढील २४ ते ३६ तासांत १५० मिमी पेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे. यामुळे सखल भागात राहणाऱ्या नागरिकांना सतर्क राहण्याचा इशारा देण्यात आला आहे. मुंबई, उपनगरे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि ठाणे जिल्ह्यांमध्ये पुढील तीन तासांत मध्यम ते मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. अधिकाऱ्यांनी सांगितले की, गुरुवारी मुंबई, ठाणे आणि पालघरच्या काही भागात जोरदार पाऊस पडू शकतो. बीएमसी ने मान्सून नियंत्रण कक्ष सुरु केले आहेत. तसेच, पूरग्रस्त भागात जास्त मनुष्यबळ तैनात केले आहे. सायन, किंग्ज सर्कल, हिंदमाता, कुर्ला, अंधेरी सबवे, दहिसर आणि मालाड अंडरपासमध्ये पाणी साचण्याची शक्यता आहे.


# महाराष्ट्राच्या सहकार क्षेत्राला गौरवशाली इतिहास : सहकार राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : महाराष्ट्राच्या सहकार क्षेत्राला गौरवशाली इतिहास आहे. देशाच्या सहकार क्षेत्रात महाराष्ट्राचा ६० टक्के वाटा आहे. महाराष्ट्र राज्याच्या प्रगतीमध्ये या सहकारी संस्थाचा मोलाचा वाटा आहे. आंतरराष्ट्रीय सहकारीता वर्षानिमित्त सहकार क्षेत्रातील उत्कृष्टरित्या काम केलेल्या संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा सत्कार हा अत्यंत चांगला उपक्रम असल्याचे गौरवोद्गार सहकार राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी काढले. यशवंतराव चव्हाण सेंटर येथे दि.महाराष्ट्र राज्य सहकारी बँक असोसिएशनतर्फे २६ वा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ कार्यक्रम झाला. या कार्यक्रमात राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर बोलत होते.यावेळी कोकण विभागीय आयुक्त डॉ.विजय सुर्यवंशी, दि.महाराष्ट्र राज्य सहकारी बँक असोसिएशनचे अध्यक्ष भाऊ कड, उपाध्यक्ष प्रंचित पोरेड्डीवार, सह मुख्य कार्यकारी अधिकारी विजय शंकरराव घोणसे यासह राज्यातील विविध सहकारी बँकाचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

सहकार राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर म्हणाले की,सहकाराच्या माध्यमातून साखर उद्योग सह शेतीला पूरक विकास झालेला आहे.सहकार क्षेत्रातील अनेक संस्थांनी अत्यंत उत्कृष्टरित्या काम केलेले आहे. शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी अनेक सहकारी संस्था काम करत आहेत ही अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे. अनेक संस्था शेतकऱ्यांसाठी शेती भवनची निर्मिती, शेतकऱ्यांच्या मुलांसाठी विविध उपक्रम राबवत आहेत हे कौतुकास्पद आहे. चांगले काम करणाऱ्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप दिल्यामुळे समाजोपयोगी कामे होत राहतील. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांच्या नेतृत्वाखाली सहकार क्षेत्राला बळकटी मिळत आहे.

# कला विश्व



## शाहिद कपूरचा छत्रपती शिवाजी महाराजांवरील चित्रपट रद्द

एखाद्या नाटकात किंवा सिनेमात छत्रपती शिवाजी महाराजांची भूमिका करायला मिळणं ही कलाकारासाठी भाग्याचीच गोष्ट आहे. आजवर अनेक कलाकारांनी विविध कलाकृतींतून छत्रपती शिवाजी महाराजांची भूमिका साकारली आहे. अशातच काही दिवसांपूर्वी बॉलीवूड अभिनेता शाहिद कपूरही छत्रपती शिवाजी महाराजांवर आधारित चित्रपट घेऊन येणार असल्याची माहिती होती; मात्र आता हा चित्रपट थांबवण्यात आला आहे. अमित राय दिग्दर्शित आणि शाहिद कपूरची मुख्य भूमिका असलेला छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित ऐतिहासिक चित्रपट सध्या थांबवण्यात आला आहे. त्याचं नेमकं कारण गुलदस्त्यात ठेवत, राय यांनी एका मुलाखतीत याबद्दल माहिती दिली. यावेळी त्यांनी इंडस्ट्रीतील काही गंभीर समस्यांवर आपली नाराजीही व्यक्त केली. राय म्हणाले, इथे दिग्दर्शकानं कसं काम करायचं? कास्टिंग, प्रॉडक्शन, स्टार्स आणि त्यांचं मॅनेजमेंट या सगळ्या गोष्टी खूप कठीण आहेत. एखाद्या कथेवर तुम्ही पाच वर्षं काम करता आणि अचानक कुणीतरी फक्त पाच पानांत काय चूक आणि काय बरोबर आहे, हे ठरवतो. अमित राय यांच्या 'जचऋ२'ने १८० कोटींचा गल्ला जमवला. तरी ते पुरेसं नाही. त्याद्वारे त्यांनी त्यांचं कौशल्य सिद्ध केलं असलं तरीही त्यांना पुढील चित्रपटासाठी साथ मिळाली नाही. शिवाजी महाराजांवरील चित्रपटाची कथा त्यांनी स्वत: लिहिली होती; पण ती पुढे नेण्याची संधी त्यांना मिळाली नाही. याबद्दल त्यांनी, कधी कधी वाटतं की, फक्त दिग्दर्शक होऊन काहीच होणार नाही. त्यासाठी निर्माताच बनावं लागेल, असं म्हटलं. अमित राय यांनी त्यांच्या या संवादातून शाहिद कपूरबरोबरचा हा चित्रपट बंद होण्याचं नेमकं कारण सांगितलं नाही. पण, आता अनेक चाहते शाहिद कपूरला छत्रपती शिवाजी महाराजांच्या भूमिकेत पाहू शकणार नाहीत हे निश्चित झालं आहे.




## विद्या मोठ्या पडद्यापासून लांब असली तरी तिचा स्वत:वर विश्वास कायम

विद्या बालन बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेत्री आहे. आजवर तिने हिंदी चित्रपटांमधून वैविध्यपूर्ण भूमिका साकारत प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. अशातच आता तिनं इंडस्ट्रीतून ब्रेक घेण्याबद्दल सांगितलं आहे. विद्या बालनने इंडस्ट्रीतून ब्रेक घेण्याबद्दल सांगितलं आहे. विद्या म्हणाली, आयुष्यात पहिल्यांदाच मी कुठल्याच गोष्टीची काळजी करत नाहीये. विद्या पुढे म्हणाली, कळत नकळत आपण खूप काळजी करीत असतो. मी सध्या खूप आनंदी आहे. आता मी चित्रपटाच्या स्क्रिप्ट्स वाचत आहे. नवीन लोकांना भेटत आहे आणि आता मी दोन चित्रपट करण्याचं ठरवलं आहे; पण सध्या मी त्याबाबत काहीही सांगू शकत नाही. विद्या मोठ्या पडद्यापासून लांब असली तरी तिचा स्वत:वर विश्वास कायम असल्याचं तिच्या मुलाखतीमधून पाहायला मिळतं. अभिनेत्री म्हणाली, मी निर्लज्जासारखी आशावादी आहे. माझा स्वत:वर खूप विश्वास आहे. मी स्वत:ला प्राधान्य देते. पुढे अभिनेत्रीने तिला काही जण तिच्या वजनावरूनही बोलत असल्याचं म्हटलं आहे. विद्या तिच्या वजनाबाबत म्हणाली, काही जण मला माझ्या वजनावरून बोलतात. मी स्वत:वर काम करायला हवं, वजन घटवायला हवं, असं सागतात. पण, मला माझ्यामध्ये काहीही चुकीचं वाटत नाही. मी अजूनही मुख्य भूमिका साकारत होते. त्यामुळे मला वाटत नाही की, वजनाबाबत मी काळजी करण्याची गरज आहे. विद्या शेवटचं कार्तिक आर्यनची मुख्य भूमिका असलेल्या 'भूल भुलैया ३' चित्रपटात महत्त्वपूर्ण भूमिकेत झळकली होती. हा चित्रपट सुपरहिट ठरला. बॉक्स ऑफिसवर चित्रपटाने ४०० कोटींचा गल्ला जमावला होता. या चित्रपटापूर्वी विद्या 'दो और दो प्यार' या चित्रपटात काम केलं होतं. त्यामध्ये प्रतीक गांधी, इलियाना डिक्रूझ हेदेखील पाहायला मिळाले होते. त्यानंतर आता विद्या रितेश देशमुखच्या 'राजा शिवाजी' चित्रपटातून झळकणार आहे. या चित्रपटाचं दिग्दर्शन त्यानं स्वत: केलं आहे. त्यामध्ये रितेशसह, जिनिलीया देशमुख, संजय दत्त, महेश मांजरेकर, जितेंद्र जोशी, फरदीन खान, भाग्यश्री,अभिषेक बच्चन यांसारखी मंडळी झळकणार आहेत. विद्याने नुकत्याच दिलेल्या मुलाखतीमध्ये याबात सांगितलं आहे. ती म्हणाली, हो मी नुकतंच 'राजा शिवाजी' चित्रपटाचं चित्रीकरण पूर्ण केलं आहे. मला त्या संपूर्ण प्रवासात खूप मजा आली.

# 'वडाळा - गेट वे भुयारी मेट्रो ११'साठी २,२०० हून अधिक झाडांवर कुऱ्हाड, तर ७९६ बांधकामांवर हातोडा


जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसी) वडाळा - गेट वे ऑफ इंडिया भुयारी मेट्रो ११' मार्गिकेचे सरेखन आणि पर्यावरणीय, सामाजिक प्रभाव मूल्यांकन अहवाल प्रसिद्ध केला आहे. या अहवालानुसार १७.५१ किमीच्या या मार्गिकेसाठी २ हजार २०० हून अधिक झाडे कापावी अथवा पुनर्रोपित करावी लागणार आहेत. त्याचवेळी दुसरीकडे या मार्गिकेच्या कामात आणिक आगार ते भेंडी बाजारदरम्यानच्या तब्बल ७९६ बांधकामांवर हातोडा पडणार असून यात ८०१ कुटुंबे बाधित होणार आहेत. बाधित होणारी सर्वाधिक बांधकामे वडाळ्यातील आहे. वडाळ्यातील ३२४ बांधकामे पूर्णत: बाधित होणार आहेत. त्याचबरोबर भेंडी बाजारातील २०५ बांधकामे बाधित होणार आहे.

एमएमआरसीकडून मेट्रो ११ मार्गिकेची उभारणी केली जाणार आहे. त्यानुसार या मार्गिकेचा प्रस्ताव राज्य सरकारकडे याआधीच मंजुरीसाठी पाठविण्यात आला आहे. या प्रस्तावास मंजुरीची प्रतीक्षा आहे. आता एमएमआरसीने या मार्गिकेचे सरेखन आणि पर्यावरणीय, समाजिक प्रभाव मूल्यांकन अभ्यासाचा अहवाल सर्वसामान्यांसाठी आपल्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध केला आहे. या अहवालावर नागरिक, संस्थांकडून सूचना-हरकती मागविण्यात आल्या आहेत. २० ऑगस्टपर्यंत नागरिकांना सूचना-हरकती नोंदविता येणार आहेत. एमएमआरसीच्या मेट्रो ११ च्या अहवालानुसार मेट्रो स्थानक, कारशेड, लॉन्चिंग शाफ्ट अशा विविध कामांसाठी १७.५१ किमी दरम्यानची २ हजार २०० हून अधिक झाडे बाधित होणार आहेत. यातील काही झाडे कापावी लागणार असून काही झाडे पुनर्रोपित केली जाण्याची शक्यता आहे. स्थानकांच्या प्रवेशद्वारासाठी आणि आणिक आगार येथील कारशेडसाठी सर्वाधिक झाडे कापली जाण्याची शक्यता आहे. बाधित होणाऱ्या झाडांच्या बदल्यात एमएमआरसीकडून नियमानुसार वृक्षारोपण, वनीकरण आणि पुनर्रोपण केले जाणार आहे. मेट्रो ११ मार्गिकेत २ हजार २०० हून अधिक झाडांबरोबरच ७९६ बांधकामेही बाधित होणार आहेत.

# राष्ट्रीय क्रीडा प्रशासन विधेयक २०२५ लोकसभेत सादर; आता बीसीसीआय वर असेल केंद्राचे नियंत्रण

जनप्रवास : प्रतिनिधी



नवी दिल्ली: केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय यांनी बुधवारी(दि.२३) लोकसभेत राष्ट्रीय क्रीडा प्रशासन विधेयक २०२५ सादर केले. हे विधेयक भारतीय खेळांमध्ये पारदर्शकता, जबाबदारी आणि चांगल्या प्रशासनाच्या दिशेने एक मोठे पाऊल मानले जात आहे. या विधेयकाअंतर्गत, एक राष्ट्रीय क्रीडा मंडळ तयार केले जाईल, ज्याला भारतीय क्रिकेट नियामक मंडळ सह राष्ट्रीय क्रीडा महासंघ वर नियम बनवण्याचे आणि देखरेख करण्याचे व्यापक अधिकार असतील.

या विधेयकात राष्ट्रीय क्रीडा महासंघांसाठी जबाबदारी प्रणाली स्थापित करण्याचा प्रस्ताव आहे. सर्व मान्यताप्राप्त क्रीडा महासंघांना केंद्र सरकारकडून निधी मिळविण्यासाठी छड्ड कडून मान्यता घ्यावी लागेल. छड्ड मध्ये एक अध्यक्ष आणि सदस्य असतील, ज्यांची नियुक्ती केंद्र सरकार करेल. यांना सार्वजनिक प्रशासन, क्रीडा प्रशासन, क्रीडा कायदा आणि संबंधित क्षेत्रात विशेष ज्ञान किंवा अनुभव असेल. त्यांची नियुक्ती कॅबिनेट सचिव किंवा क्रीडा सचिव, भारतीय क्रीडा प्राधिकरणाचे महासंचालक, दोन क्रीडा प्रशासक आणि द्रोणाचार्य, खेलरत्न किंवा अर्जुन पुरस्कार विजेते यांचा समावेश असलेल्या समितीच्या शिफारशीवर होईल.

या विधेयकात राष्ट्रीय क्रीडा न्यायाधिकरण स्थापन करण्याची तरतूद आहे, ज्याला दिवाणी न्यायालयाचे अधिकार असतील. हे न्यायाधिकरण क्रीडा महासंघ आणि खेळाडूंशी संबंधित सर्व प्रकारचे वाद सोडवेल. न्यायाधिकरणाच्या निर्णयाला फक्त सर्वोच्च न्यायालयात आव्हान देता येईल. खेळांमध्ये दीर्घकाळ चालणाऱ्या कायदेशीर लढाया कमी करण्यासाठी आणि जलद न्याय सुनिश्चित करण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे.

# भिमाशंकर येथे येणाऱ्या भाविकांना सर्व आवश्यक सोयी सुविधा पुरवाव्यात : जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी

जनप्रवास : प्रतिनिधी



पुणे : सोमवारपासून श्रावण महिना सुरु होत असून श्रावणी महिन्यात होणारी गर्दी व विविध सुविधा यांचा विचार करून प्रशासन व मंदिर समितीने अधिकृत संकेत स्थळ स्थापन करुन श्री क्षेत्र भीमाशंकर येथे येणाऱ्या भाविकांना सर्व आवश्यक सोयी सुविधा तात्काळ मिळतील अशी व्यवस्था करावी, अशी सूचना जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी केली.

जिल्हाधिकारी कार्यालया येथे श्रावणी सोमवार यात्रा नियोजन बाबत आढावा बैठक, जिल्हाधिकारी श्री.डुडी यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी भीमाशंकर देवस्थान अध्यक्ष ॲड. सुरेश कौदरे, व्यवस्थापक चंद्रकांत कौदरे, प्रशासकीय व्यवस्थापक प्रमोद शिर्के, सह-कार्यकारी विश्वस्त मधुकर गवांदे, जिल्हा नियोजन अधिकारी किरण इंदलकर, जुन्नरचे उपविभागीय अधिकारी गोविंद शिंदे, खेडचे उपविभागीय अधिकारी अनिल दौंडे, खेडचे तहसिलदार प्रशांत बेढ्रे, आंबेगावचे तहसीलदार संजय नागटिळक व अन्य विभागाचे संबधीत अधिकारी उपस्थित होते.

श्री क्षेत्र भीमाशंकरला श्रावण महिन्यात येत्या सोमवारपासून दर्शनासाठी येणाऱ्या भावीकांची मोठी गर्दी लक्षात घेता एक रांग व्ही.आय.पी. दर्शन व दुसरी साधी दर्शन रांग अशा दोन रांगेत दर्शन घेता येईल अशी व्यवस्था करावी. तसेच दर्शन, पुजा करण्यासाठी निश्चित टप्पा तयार करावे. वाहनतळाची ठिकाणे पोलिस विभागाने निश्चित करुन त्या ठिकाणी चार्जिगची सुविधा उपलब्ध करुन द्यावी. वन विभागानेही पाहणी करुन रस्त्यातील अडथळे दुर करावेत. भाविकांची गैरसोय होवू नये व त्यांना चांगल्या सुविधा देता याव्यात. यासाठी प्रत्येक विभागाने नियोजन करुन दक्ष राहण्याच्या सूचनाही जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिल्या.

या कामास प्राधन्य देवून येत्या रविवार पर्यंत सर्व कामे पूर्ण करावीत. तसेच मंदिर परिसर, भिमाशंकर गाव, मंचर या ठिकाणी क्यूआर कोड बाबत माहिती देणारे फलक लावण्यात यावेत. क्यूआर कोडच्या माध्यमातून व्ही.आय.पी. दर्शन सुविधा उपलब्ध करुन द्यावी. तसेच क्यूआर कोडद्वारे मंदीर संस्थानमार्फत भाविकांना देण्यात येणाऱ्या सर्व सुविधांची माहिती उपलब्ध होईल त्या दृष्टीने व्यवस्था करावी, असे त्यांनी सांगितले.

# नितीन गडकरी यांना यंदाचा लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार

जनप्रवास : प्रतिनिधी

पुणे : लोकमान्य टिळक स्मारक ट्रस्टच्या (हिंद स्वराज्य संघ) वतीने देण्यात येणारा यंदाचा ४३ वा लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार, केंद्रीय भूपृष्ठ मंत्री नितीन गडकरी यांना जाहीर झाला आहे. टिळक स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. रोहित टिळक यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत पुरस्काराची घोषणा केली. शुक्रवारी (१ ऑगस्ट) टिळक स्मारक मंदिरात सकाळी १०.३० वाजता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या उपस्थितीत पुरस्काराचे वितरण होणार असल्याचे डॉ. टिळक यांनी सांगितले.

डॉ. टिळक म्हणाले, लोकमान्यांच्या चतु:सूत्रीतील स्वदेशीचा स्वीकार करत गडकरी यांनी रस्त्यांच्या माध्यमातून राष्ट्र उभारणीत मोठे कार्य सुरू केले आहे. विविध प्रकारच्या वाहन निर्मितीत स्वदेशीचा पुरस्कार व प्रसार त्यांच्याकडून होत आहे. देशाच्या विकासासाठी त्यांनी दिलेले योगदान लक्षात घेऊन त्यांची ४३ व्या लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.' यावेळी लोकमान्य टिळक राष्ट्रीय सन्मान देऊन गौरविलेल्या आजवरच्या पुरस्कारार्थींच्या जीवन कार्याचा आढावा घेणारा इंग्रजी ग्रंथ तयार करण्यात आला आहे.

# 'रामदास कदम फॅमिली तोंडपाणी गँग'

## ठाकरेसेनेचे अनिल परब यांनी तोफ डागली

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : रामदास कदम व त्यांचे पुत्र योगेश कदम ही फॅमिली तोडपाणी गँग आहे, असा घणाघात माजी मंत्री आणि ठाकरेसेनेचे आमदार अनिल परब यांनी केला. ते प्रसार माध्यमांशी बोलत होते.

अनिल परब म्हणाले की, पहिला विषय हाच की रामदास कदम सातत्यानं सांगत आहेत, माझ्या बायकोची बदनामी केली. पण खरंतर तुम्हाला लाज वाटली पाहिजे की आपल्या बायकोच्या नावे असे बार उघडून त्या ठिकाणी बायका नाचवता. शरम वाटली पाहिजे, महाराष्ट्राची मान खाली घातली तुम्ही. योगेश कदम तुम्ही गृहराज्यमंत्री आहात, तुम्हाला या गोष्टीची लाज वाटते तर मग अशी कृत्ये कशासाठी करता? असा सवालही यावेळी अनिल परब यांनी केला.

जगबुडी नदीतील वाळू उपसा दुसरा विषय आहे . या नदीच्या बाबतीत मी आरोप केला होता की, ६७ कि.मी. च्या जगबुडी नदीबाबत गाळ आणि वाळू उपसा करायचा जो काही उपक्रम आहे. त्यात फक्त १०० ते १५० मीटर पर्यंत गाळ उपसला जातो. सरकारनं आपल्या पैशानं उपसलेला गाळ शेतकऱ्यांना दिला पाहिजे असा नियम आहे. वाळू असेल तर नव्या नियमानुसार शेतकऱ्याला घर बांधणीसाठी ५ ब्रास वाळू दिली पाहिजे.



पण येथील सगळी वाळू ही योगिता डेन्टल महाविद्यालयाच्या आवारात टाकली आहे. हे कॉलेज गृहराज्यमंत्र्यांच्या बहिणींच्या नावानं आहे. या महाविद्यालयाच्या आवारात वाळूचे ढिगारे आहेत. जर ही वाळू कुणी घेऊन जात नाही तर ती तुमच्या स्वतःच्या कॉलेजमध्ये का आहे? तुम्हाला याची गरज काय? असा सवाल अनिल परब यांनी केला आहे. ही गाळमिश्रीत वाळू आहे ती नंतर चाळली जाते, त्यातून वाळू आणि गाळाची माती वेगळी केली जाते आणि त्यानंतर यांचे चट्टेबट्टे ती विकून टाकतात. बिपिन पाटणे हा कोण शेतकरी आहे? कदम हा कोण शेतकरी आहे? म्हणजे जिथं जिथं वाळू पडली आहे, त्याला जिओ टॅग लावून आम्ही ड्रोन सर्व्हे करुन त्याचा व्हिडिओ पेनड्राईव्हच्या माध्यमातून मुख्यमंत्र्यांकडे देणार आहे.

शिवतेज आरोग्य सेवा संघटना हा ट्रस्ट आहे, या ट्रस्टचं योगिता डेन्टल कॉलेज आहे. या ट्रस्टमध्ये गृहराज्यमंत्री योगेश कदम यांची आई आहे, बहिण आहे, भाऊ आहे ते स्वतः आहेत.

परब म्हणाले, तिसरा विषय म्हापरन गावातील महादेव नाला याचं उत्खनन करण्यासाठी अकीब मुकादम या माणसानं मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना पत्र लिहिलं, पालकमंत्री उदय सामंत यांना पत्र लिहिलं आणि योगेश कदम यांनाही त्यानं गाळ काढण्याच्या परवानगीसाठी पत्र दिलं. अख्ख्या महाराष्ट्रात एकाच माणसाला गाळ स्वतःच काढायचा आणि त्याची विल्हेवाट लावायचं काम दिलं. हे महसूलमंत्र्यांच्या आदेशानं दिलं. पण या महादेव नाल्याच्या ऐवजी त्यानं सावित्री नदीतील गाळ काढला. हा अकीद मुकादम कदम कुटुंबियांच्या घरातील नोकर माणूस आहे. त्यानंतर दगड आणि जांभा याच्या उत्खननात महसूल मंत्र्यांकडून शासनाची करोडो रुपयांची रॉयल्टी बुडली आहे.

ज्यांना हे उत्खनन करायला परवानगी दिली आहे हे त्यांचे खास लोक आहेत. यातही किती उत्खनन झालंय याचा अहवाल अद्याप आलेला नाही कारण यात राज्यमंत्र्यांचा दबाव आहे. याचे पुरावे मी आता मुख्यमंत्र्यांना देणार आहे, असंही अनिल परब यांनी म्हटलं आहे.

* संपादक - संजय प्रल्हाद भोकरे * सरव्यवस्थापक - सुरेखा खानोरे हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय प्रल्हाद भोकरे यांनी दैनिक जनप्रवास, सर्व्हे नंबर ३११/१/अ/२ कासार अंबोली, तालुका मुळशी, जि.पुणे येथे छापून चिनार हाईटस्, ४ था मजला, प्रभात रोड, गल्ली नं.५, पुणे-४११ ००४ येथे प्रकाशित केले. येथे प्रकाशित केले. एम्बसी सेंटर, प्लॉट नं. २०७, जमनालाल बजाज मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई, ४०००२१. RNI NO. MAHMAR/2013/57952. मो. ८६०५६४१११३. पुणे कार्यालय : फोन - ०२०-२५४२४२३२ E-mail : sanjmaha@gmail.com